भाग ९

प्रथम मंडलम्
सूक्त १४६ ते १९१



ऋग्वेद

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥ भाग ९

प्रथम मंडलम्

सूक्त १४६ ते १९१

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – श्री. श्रीपाद काळे

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥भाग ९

प्रथम मंडलम्

सूक्त १४६ ते १९१

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २ डिसेंबर २०२५

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व "शांखायन" अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला "शाकल संहिता" असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी

भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळामध्ये १९१ सूक्त असून १९७६ ऋचा आहेत ऋग्वेदातील हे सर्वात मोठे मंडळ आहे.

“मधुच्छन्दा वैश्वामित्र” विश्वामित्र ऋषींच्या शंभर पुत्रांपैकी एक्कावनावे पुत्र होते

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,
सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे
संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

प्रारंभिक भाग (वाचण्यासाठी लिंकवर क्लिक करा)

https://www.esahity.com/230923432381235123662340238123 50.html

















ऋग्वेदाचे प्रथम मंडल
छापील स्वरूपात
उपलब्ध आहे. संपर्क

श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि क्रमांक
9869447431

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१५ ००२. फोन नं. : २५४१४५४/२५४०३६२.
E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

विश्वावसु वर्षे श्रावण शुद्ध द्वादशी सोमवार
दि. ७/८/२०२४

श्री. डॉ. विजय हेमंत लक्ष्मण
मुंबई.
मो. 7678091629

वीरस्थ देवतेचे उत्तम आशिर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात तेही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय सुरुवाही आहे.

खरे तर आपण ॲलोपॅथीचे सर्जन. अनेकांची ऑपरेशन करून आपण त्या त्या लोकांनी आरोग्य प्राप्ती करून दिली. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृध्दांचे आशीर्वाद ही घेतले. फलीभाव असा झाला की व्यावहारिक, निवृत्तीनंतर ही आपण आपला आयुष्याचा उत्तरार्ध सार्थकी लावणे वेदाचे भाषांतर करण्यास लावला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व संतांच्या भाषेतील आहोरात्र सुख आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुध्दा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुलकर्णी यांनी यशस्वी केला. व ऋग्यजु. साम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या ग्रंथरूप आले. आजही देश-परदेश प्रवास करून (७५ देशांत) ते अध्ययनार्थ भाषांतर करत होते. असो. कदाचित ही कोणी गरजेपेक्षा असेल पण आवश्यकता नाही कधी नव्हे.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच वीरस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा वीरस्थ देवतेचे अनेक आशिर्वाद व आमचे नारायण स्मरण सर्वांस विदीत व्हावे

महानुशासनम् वरीवर्ति
श्री. जगद्गुरु शंकराचार्य.
करवीर पीठ.
कोल्हापूर.

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४६

ऋषी- दीर्घतमा औचथ्य । **देवता**- अग्नि **छन्द-** १-४जगती ५ त्रिष्टुप्

त्रिमूर्धानं सप्तरश्मिं गृणीषेऽनूनमग्निं पित्रोरुपस्थे ।
निषत्तमस्य चरतो ध्रुवस्य विश्वा दिवो रोचनापप्रिवांसम् ॥१॥

हे यज्ञकर्त्यांनो पृथ्वी आणि स्वर्ग अशा माता-पित्यांच्या मांडीवर विराजमान असलेल्या तीन मस्तके असणाऱ्या सप्त ज्वाळा असणाऱ्या सर्वांना पूर्णत्व देणाऱ्या अग्निदेवांची प्रार्थना करा अग्निदेवांचे दिव्यतेज सर्व सजीव आणि निर्जीव सृष्टी मध्ये पसरले आहे ॥१॥

(तीन मस्तके: सकाळ, मध्यान्ह आणि संध्याकाळ)

(काली-काळसर रंग, 'कराली'-उग्र, 'मनोजवा'-मनाच्या गतीसारखा वेगवान, 'सुलोहित'-रक्तरंग, 'सुधुम्रवर्ण'-धुरासारखा करडारंग, 'स्फुलिंगिनी'- विकसित तेज, 'विश्वरुचि'-सर्व-सुंदर, ह्या अग्निदेवांच्या सप्त ज्वाळा आहेत)

उक्षा महाँ अभि ववक्ष एने अजरस्तस्थावितऊतिऋष्वः ।
उर्व्याः पदो नि दधाति सानौ रिहन्त्यूधो अरुषासो अस्य ॥२॥

महान, पराक्रमी, चिरतरुण, आदरणीय अग्निदेवांनी स्वर्ग आणि पृथ्वीला सर्व बाजूंनी व्यापून टाकले आहे. संरक्षण साधनांनी सुसज्ज पृथ्वीवर, विराजमान झालेल्या अग्निदेवांच्या ज्वाळा आकाशात सर्वत्र पसरल्या आहेत ॥२॥

समानं वत्समभि संचरन्ती विष्वग्धेनू वि चरतः सुमेके ।

अनपवृज्याँ अध्वनो मिमाने विश्वान्केताँ अधि महो दधाने॥३॥

अग्निदेवांच्या बाल्यरूपातील वासराची, भक्त आणि भक्तांच्या पत्नीच्या रूपात दोषरहित दोन गायी(रात्री आणि दिवस) कुशलतेने सेवा करतात. अग्निदेवांचा अशुद्ध मार्ग शुद्ध करत सर्व दिशांना फिरणाऱ्या या दोन्ही गायींना व्यापक स्वरूपात ज्ञान प्राप्त होते ॥३॥

धीरासः पदं कवयो नयन्ति नाना हृदा रक्षमाणा अजुर्यम् ।
सिषासन्तः पर्यपश्यन्त सिन्धुमाविरेभ्यो अभवत्सूर्यो नृन्॥४॥

बुद्धिमान आणि ज्ञान संपन्न यज्ञकर्ते, भक्तगण अग्निदेवांचे रक्षण करत त्यांना यज्ञवेदी मध्ये सुरक्षितपणे प्रज्वलित करतात. अशाप्रकारे सेवा करणाऱ्या, समुद्राच्या पाण्यावरती अग्निदेवांच्या दर्शनाची इच्छा बाळगणाऱ्या भक्तगणांना अग्निदेव सूर्यदेवांच्या रूपात दर्शन देतात ॥४॥

दिदृक्षेण्यः परि काष्ठासु जेन्य ईळेन्यो महो अर्भाय जीवसे ।
पुरुत्रा यदभवत्सूरहैभ्यो गर्भेभ्यो मघवा विश्वदर्शतः॥५॥

सर्व दिशांना पसरलेले आणि नेहमीच विजयी असलेले अग्निदेव स्तुतीस पात्र आहेत. अग्निदेव लहान मोठ्या सर्व प्राणिमात्रांना जीवनशक्ती प्रदान करतात. सर्व गोष्टींच्या उत्पन्नाचे बीजरूप हे विविध संपत्तीचे स्वामी आणि सर्वांना प्रकाशमान करणारे अग्निदेव आहेत ॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४७

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता-** अग्नि **छन्द-** त्रिष्टुप्

कथा ते अग्ने शुचयन्त आयोर्ददाशुर्वाजेभिराशुषाणाः ।
उभे यत्तोके तनये दधाना ऋतस्य सामन्रणयन्त देवाः॥१॥
हे अग्निदेवा ! यज्ञांद्वारे वातावरण शुद्ध करणाऱ्या आणि सर्वत्र पसरलेल्या आपल्या ज्वाळा यज्ञकार्यांमध्ये स्तोत्रांचे पठण करणाऱ्या भक्तगणांना आणि त्यांच्या पुत्र-पौत्रांना पौष्टिक अन्नाद्वारे दीर्घायुष्य कसे प्राप्त करून देतात?॥१॥

बोधा मे अस्य वचसो यविष्ठ मंहिष्ठस्य प्रभृतस्य स्वधावः ।
पीयति त्वो अनु त्वो गृणाति वन्दारुस्ते तन्वं वन्दे अग्ने ॥२॥
उत्कृष्ट तारुण्य असलेल्या, वैभवाने भरलेल्या हे अग्निदेवा ! आम्ही सतत करत असलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे श्रवण करावे. काहीजण आपली निंदा करतात तर काहीजण आपली स्तुती करतात. परंतु आम्ही भक्तगण आपल्या ज्योतींची पूजा करतो ॥२॥

ये पायवो मामतेयं ते अग्ने पश्यन्तो अन्धं दुरितादरक्षन् ।
ररक्ष तान्त्सुकृतो विश्ववेदा दिप्सन्त इद्रिपवो नाह देभुः॥३॥
हे अग्निदेवा ! आपल्या संरक्षणात्मक किरणांनी ममतेचे पुत्र दीर्घतमा ऋषींचे अंधत्व दूर केले. ज्ञानाने परिपूर्ण असलेल्या भक्तगणांचे आपण रक्षण करता. अहंकारी दुष्ट लोक आपला पराभव करू शकणार नाहीत ॥३॥

यो नो अग्ने अररिवाँ अघायुररातीवा मर्चयति द्वयेन ।

मन्त्रो गुरुः पुनरस्तु सो अस्मा अनु मृक्षीष्ट तन्वं दुरुक्तैः॥४॥

हे अग्निदेवा! पापीकर्मांमध्ये गुंतलेल्या, आपल्याला दान देण्यापासून रोखणाऱ्या, यज्ञ कार्यामध्ये सहभागी न होणाऱ्या, वाईट कृत्यांनी स्वतःचे पोषण करणाऱ्या लोकांचा डाव उलटवून त्यांचा विनाश करावा ही विनंती. जे लोक इतरांची कठोर शब्दांमध्ये निंदा नालस्ती करतात त्यांचे शरीर आपण नष्ट करावे ही विनंती ॥४॥

उत वा यः सहस्य प्रविद्वान्मर्तो मर्तं मर्चयति द्वयेन ।

अतः पाहि स्तवमान स्तुवन्तमग्ने माकिर्नो दुरिताय धायीः॥५॥

हे शक्तिपुत्र अग्निदेवा ! कपटी आणि कारस्थानी मनोवृत्तीच्या लोकांपासून आम्हा भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती. हे स्तुतिपात्र अग्निदेवा ! वाईट कृत्ये करणाऱ्या पापी लोकांच्या दुःखाच्या आगीत आम्हाला लोटू नका ही विनंती॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४७

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता-** अग्नि **छन्द-** त्रिष्टुप्

कथा ते अग्ने शुचयन्त आयोर्ददाशुर्वाजेभिराशुषाणाः ।
उभे यत्तोके तनये दधाना ऋतस्य सामन्रणयन्त देवाः॥१॥
हे अग्निदेवा ! यज्ञांद्वारे वातावरण शुद्ध करणाऱ्या आणि सर्वत्र पसरलेल्या आपल्या ज्वाळा यज्ञकार्यांमध्ये स्तोत्रांचे पठण करणाऱ्या भक्तगणांना आणि त्यांच्या पुत्र-पौत्रांना पौष्टिक अन्नाद्वारे दीर्घायुष्य कसे प्राप्त करून देतात ?॥१॥

बोधा मे अस्य वचसो यविष्ठ मंहिष्ठस्य प्रभृतस्य स्वधावः ।
पीयति त्वो अनु त्वो गृणाति वन्दारुस्ते तन्वं वन्दे अग्ने ॥२॥
उत्कृष्ट तारुण्य असलेल्या, वैभवाने भरलेल्या हे अग्निदेवा ! आम्ही सतत करत असलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे श्रवण करावे. काहीजण आपली निंदा करतात तर काहीजण आपली स्तुती करतात. परंतु आम्ही भक्तगण आपल्या ज्योतींची पूजा करतो ॥२॥

ये पायवो मामतेयं ते अग्ने पश्यन्तो अन्धं दुरितादरक्षन् ।
ररक्ष तान्त्सुकृतो विश्ववेदा दिप्सन्त इद्रिपवो नाह देभुः॥३॥
हे अग्निदेवा ! आपल्या संरक्षणात्मक किरणांनी ममतेचे पुत्र दीर्घतमा ऋषींचे अंधत्व दूर केले. ज्ञानाने परिपूर्ण असलेल्या भक्तगणांचे आपण रक्षण करता. अहंकारी दुष्ट लोक आपला पराभव करू शकणार नाहीत ॥३॥

यो नो अग्ने अररिवाँ अघायुररातीवा मर्चयति द्वयेन ।

मन्त्रो गुरुः पुनरस्तु सो अस्मा अनु मृक्षीष्ट तन्वं दुरुक्तैः॥४॥

हे अग्निदेवा! पापीकर्मांमध्ये गुंतलेल्या, आपल्याला दान देण्यापासून रोखणाऱ्या, यज्ञ कार्यामध्ये सहभागी न होणाऱ्या, वाईट कृत्यांनी स्वतःचे पोषण करणाऱ्या लोकांचा डाव उलटवून त्यांचा विनाश करावा ही विनंती. जे लोक इतरांची कठोर शब्दांमध्ये निंदा नालस्ती करतात त्यांचे शरीर आपण नष्ट करावे ही विनंती ॥४॥

उत वा यः सहस्य प्रविद्वान्मर्तो मर्तं मर्चयति द्वयेन ।

अतः पाहि स्तवमान स्तुवन्तमग्ने माकिर्नो दुरिताय धायीः॥५॥

हे शक्तिपुत्र अग्निदेवा ! कपटी आणि कारस्थानी मनोवृत्तीच्या लोकांपासून आम्हा भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती. हे स्तुतिपात्र अग्निदेवा ! वाईट कृत्ये करणाऱ्या पापी लोकांच्या दुःखाच्या आगीत आम्हाला लोटू नका ही विनंती॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१४९

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- अग्नि **छन्द-** विराट्

महः स राय एषते पतिर्दन्निन इनस्य वसुनः पद आ । उप ध्रजन्तमद्रयो विधन्नित्॥१॥

महान संपत्तीचे आणि धनधान्यआदि वस्तूंचे दाते अग्निदेव इच्छित वस्तु देण्यासाठी यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित होतात तेव्हा दगडाच्या सहाय्याने सोमरस तयार करणारे यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांची सेवा करतात ॥१॥

स यो वृषा नरां न रोदस्योः श्रवोभिरस्ति जीवपीतसर्गः ।
प्र यः सस्राणः शिश्रीत योनौ॥२॥

शक्तिशाली पुरुषांप्रमाणे अग्निदेव, पृथ्वीदेवते मध्ये आणि आकाशदेवते मध्ये कीर्तीने सुशोभित होऊन निवास करतात. यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित होऊन अन्नपाण्याच्या सहाय्याने अग्निदेव जीवित प्राण्यांसाठी योग्य सृष्टीची निर्मिती करतात ॥२॥

आ यः पुरं नार्मिणीमदीदेदत्यः कविर्नभन्यो नार्वा ।
सूरो न रुरुक्वाञ्छतात्मा॥३॥

क्षितिजापर्यंत दूरचे पाहू शकणारे, द्रुतगतीने धावणाऱ्या घोड्यांसारखे, वाऱ्याप्रमाणे आकाशात फिरणारे, यज्ञकर्त्या भक्तांच्या यज्ञवेदीमध्ये प्रज्वलित

होणारे अग्निदेव अनेक रूपांनी (विद्युत्, प्रकाश, ऊर्जा आदि) सूर्यदेवांसारखे तेजस्वी आहेत ॥३॥

अभि द्विजन्मा त्री रोचनानि विश्वा रजांसि शुशुचानो अस्थात् ।
होता यजिष्ठो अपां सधस्थे॥४ ॥

द्विजन्मी, (दोन अरणींच्या मंथनातून निर्माण झालेला) तीन स्वरूपात(सूर्य, विद्युत आणि सर्वसाधारण अग्नि) असलेले संपूर्ण जगाला प्रकामान करणारे अग्निदेव पाण्यामध्ये देखील उपस्थित असतात ॥४ ॥

अयं स होता यो द्विजन्मा विश्वा दधे वार्याणि श्रवस्या । मर्तो यो अस्मै सुतुको ददाश ॥५॥

द्विजन्मी अग्निदेव, यज्ञामध्ये उत्तम संपत्ती प्रदान करणारे, सर्वोत्तम यज्ञकर्ते आहेत. अग्निदेवांना जे यज्ञकर्ते भक्तगण हविअन्नाची आहुती अर्पण करतात त्यांना अग्निदेव सुपुत्र प्रदान करतात॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५०

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- अग्नि **छन्द-** उष्णिक्

पुरु त्वा दाश्वान्वोचेऽरिरग्ने तव स्विदा ।
तोदस्येव शरण आ महस्य ॥१॥

हे अग्निदेवा ! श्रीमंतव्यक्तीचा आश्रय घेतलेल्या सेवकाप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञस्थळी निवास करत आहोत. आम्ही यज्ञकर्ते आपल्याला आवडत्या नैवेद्याची आहुती देत, स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत आहोत ॥१॥

व्यनिनस्य धनिनः प्रहोषे चिदररुषः ।
कदा चन प्रजिगतो अदेवयोः॥२॥

हे अग्निदेवा! जे कंजूष श्रीमंत लोक आपल्याला स्वामी मानत नाहीत, आणि जे देवतांची उपासना करत नाहीत अशा मनमानी करणाऱ्या नास्तिकांना आपल्या कृपादृष्टीपासून वंचित ठेवावे ही विनंती॥२॥

स चन्द्रो विप्र मर्त्यो महो व्राधन्तमो दिवि ।
प्रप्रेत्ते अग्ने वनुषः स्याम ॥३॥

हे ज्ञानी अग्निदेवा ! आपली उपासना करणारे ज्ञानी यज्ञकर्ते आपल्या दिव्य तेजामुळे चंद्रासारखे आनंददायी होतात आणि श्रेष्ठत्व प्राप्त करतात. म्हणून हे अग्निदेवा ! आम्हाला उत्कृष्ट भक्त होण्यासाठी आशीर्वाद द्यावा ही विनंती॥३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५१

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- १ मित्र ; २-९ मित्रावरूण । **छन्द**- जगती

मित्रं न यं शिम्या गोषु गव्यवः स्वाध्यो विदथे अप्सु जीजनन् ।
अरेजेतां रोदसी पाजसा गिरा प्रति प्रियं यजतं जनुषामवः॥१॥

मनुष्य मात्रांच्या रक्षणासाठी आणि गायींच्या प्राप्तीसाठी श्रेष्ठ, ज्ञानी यज्ञकर्त्या भक्तांनी अत्यंत जवळच्या मित्रासारख्या पूजनीय आणि प्रिय अग्निदेवांची निर्मिती केली. अग्निदेवांच्या सामर्थ्याने आणि गर्जनेने आकाशलोक आणि पृथ्वीलोक थरथर कापतात॥१॥

यद्ध त्यद्वां पुरुमीळ्हस्य सोमिनः प्र मित्रासो न दधिरे स्वाभुवः ।
अध क्रतुं विदतं गातुमर्चत उत श्रुतं वृषणा पस्त्यावतः॥२॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांना मित्रासारखे शुभचिंतक असलेल्या यज्ञकर्त्यांनी शक्तिवर्धक आणि विविध सुख देणारा सोमरस अर्पण केला आहे. आपण दोघांनी यज्ञकर्ते यज्ञामध्ये पठण करत असलेल्या स्तोत्रांचे गुण आणि स्वरूप समजून घेऊन त्यांच्या प्रार्थना ऐकाव्या ही विनंती ॥२॥

आ वां भूषन्क्षितयो जन्म रोदस्योः प्रवाच्यं वृषणा दक्षसे महे ।
यदीमृताय भरथो यदर्वते प्र होत्रया शिम्या वीथो अध्वरम्॥३॥

हे शक्तिशाली मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आकाशदेवते पासून आणि पृथ्वीदेवते पासून जन्म झालेल्या तुम्हा दोघांसाठी, सामर्थ्य आणि प्रावीण्य

मिळवण्याच्या इच्छेने यज्ञकर्ते स्तोत्रांचे पठण करतात. चांगल्या कर्मांनी आपल्या दोघांचे आवाहन केलेल्या भक्तगणांना आपण दोघेही इच्छित फळ देता ॥३॥

प्र सा क्षितिरसुर या महि प्रिय ऋतावानावृतमा घोषथो बृहत् ।
युवं दिवो बृहतो दक्षमाभुवं गां न धुर्युप युञ्जाथे अपः॥४॥
हे शक्तिशाली, निर्भयपणे सत्याच्या प्रचार करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांना अत्यंत प्रिय असलेली यज्ञभूमी सुंदरपणे सुशोभित केली आहे. नांगराच्या जोखडाला जोडलेल्या बैलांप्रमाणे आपण दोघेही शुभकर्म करण्यामध्ये जोडले जाता॥४॥

मही अत्र महिना वारमृण्वथोऽरेणवस्तुज आ सद्मन्धेनवः ।
स्वरन्ति ता उपरताति सूर्यमा निम्रुच उषसस्तक्ववीरिव॥५॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघांनी उदारतेने विशाल पृथ्वीवर गायी प्रदान केल्या आहेत. ज्याप्रमाणे लोक चोर पाहिल्यावर सावधगिरीचा इशारा देण्यासाठी ओरडतात, त्याप्रमाणे सकाळी आणि संध्याकाळी सूर्यदेवांना पाहून ह्या गायी हंबरतात आणि चोरांच्या अपहरणपासून सुरक्षितपणे गोठ्यात परत येतात ॥५॥

आ वामृताय केशिनीरनूषत मित्र यत्र वरुण गातुमर्चथः ।
अव त्मना सृजतं पिन्वतं धियो युवं विप्रस्य मन्मनामिरज्यथः॥६॥
विद्वान आणि ज्ञानी लोकांचे शासक असलेल्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ज्या यज्ञस्थळी आपल्यासाठी स्तोत्रांचे पठण केले जाते त्या ठिकाणी अग्निदेवांच्या ज्वाळा आपणा दोघांनाही यज्ञ करण्यास मदत करतात.

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आमची क्षमता वाढवावी आणि आम्हाला शक्तिशाली करावे ही विनंती॥६॥

यो वां यज्ञैः शशमानो ह दाशति कविर्होता यजति मन्मसाधनः ।
उपाह तं गच्छथो वीथो अध्वरमच्छा गिरः सुमतिं गन्तमस्मयू॥७॥
स्तोत्रांचे पठण करत यज्ञामध्ये आपणा दोघांना आहुती देणाऱ्या विद्वान यज्ञकर्त्या भक्तांच्या यज्ञामध्ये स्वतःहून जाणाऱ्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आमच्या प्रार्थना श्रवण कराव्यात आणि आम्हाला आशीर्वाद द्यावेत ही विनंती ॥७॥

युवां यज्ञैः प्रथमा गोभिरञ्जत ऋतावाना मनसो न प्रयुक्तिषु ।
भरन्ति वां मन्मना संयता गिरोऽदृप्यता मनसा रेवदाशाथे॥८॥
हे सत्यप्रिय मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ज्याप्रमाणे मन इंद्रियांमध्ये सर्वोत्तम आहे, त्याचप्रमाणे यज्ञकर्ते भक्तगण देवतांमध्ये सर्वोत्तम असलेल्या आपणा दोघांना दूध, तूप आणि हविअन्नाची आहुति अर्पण करून तृप्त करतात. अशा भक्तगणांना आपण संपत्ती आणि समृद्धी द्यावी ही विनंती. ॥८॥

रेवद्वयो दधाथे रेवदाशाथे नरा मायाभिरितऊति माहिनम् ।
न वां द्यावोऽहभिर्नोत सिन्धवो न देवत्वं पणयो नानशुर्मघम्॥९ ॥
हे नेतृत्व करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघेही आपल्या शक्तीने आमचे रक्षण करता आणि आम्हाला उपयुक्त संपत्ती प्रदान करता. आपल्याकडे असलेली अद्वितीय दैवी क्षमता आणि संपत्ती, दिवस आणि रात्र, नद्या आणि "पणी " नावांचे असुर सुद्धा प्राप्त करू शकले नाहीत ॥९॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५२

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- मित्रावरूण । **छन्द**- त्रीष्टुप्

युवं वस्त्राणि पीवसा वसाथे युवोरच्छिद्रा मन्तवो ह सर्गाः ।
अवातिरतमनृतानि विश्व ऋतेन मित्रावरुणा सचेथे॥१॥

हे तेजस्वी वस्त्र परिधान करणाऱ्या मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण दोघांनी निर्माण केलेल्या सर्व गोष्टी निर्दोष आणि सुंदर आहेत. आपण दोघेही भक्तगणांमधील असत्य विचारांना दूर करून सत्याच्या मार्गावर नेता ॥१॥

एतच्चन त्वो वि चिकेतदेषां सत्यो मन्त्रः कविशस्त ऋघावान् ।
त्रिरश्रिं हन्ति चतुरश्रिरुग्रो देवनिदो ह प्रथमा अजूर्यन्॥२॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांपैकी प्रत्येकजण अत्यंत ज्ञानी आणि सत्यवादी आहे. ज्ञानी,विद्वान(कविशस्त) लोकांनी आपली स्तुती केलेली आहे. आपण शक्तीने परिपूर्ण आहात. सर्व द्रष्ट्याऋषीमुनींना माहिती आहे की एखादा शत्रु कितीही शक्तिशाली असला आणि त्रिधारी किंवा चतुर्धारी शस्त्रांनी सुसज्ज असला तरी त्याचा नाश होतो.॥२॥

अपादेति प्रथमा पद्वतीनां कस्तद्वां मित्रावरुणा चिकेत ।
गर्भो भारं भरत्या चिदस्य ऋतं पिपर्त्यनृतं नि तारीत्॥३॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्या दोघांच्या शक्तीमुळे चरणहीन उषादेवता पाय असलेल्या प्राण्यांसाठी अवतीर्ण होतात . आपल्या गर्भातून

जन्मलेल्या बाल सूर्यदेवांना जगाचे पालन पोषण करण्याचे, असत्याचा नाश करण्याचे आणि सत्याचे पोषण करण्याचे सामर्थ्य आपल्या दोघांच्या शक्तीमुळे प्राप्त होते ॥३॥

प्रयन्तमित्परि जारं कनीनां पश्यामसि नोपनिपद्यमानम् ।
अनवपृग्णा विततता वसानं प्रियं मित्रस्य वरुणस्य धाम॥४॥
सर्व विश्व व्यापलेले, तेजस्वी प्रकाश असलेले, सुंदर उषादेवतेचे प्रियकर ,सूर्यदेव कधीही स्थिर न राहता नेहमीच गतिमान असतात. विशाल तेज असलेले सूर्यदेव, मित्रदेवांचे आणि वरुणदेवांचे आवडते आहेत ॥४॥

अनश्वो जातो अनभीशुरर्वा कनिक्रदत्पतयदूर्ध्वसानुः ।
अचित्तं ब्रह्म जुजुषुर्युवानः प्र मित्रे धाम वरुणे गृणन्तः॥५॥
अश्व आणि लगामाच्या सहाय्याविना सूर्यदेव वेगाने फिरत, गर्जना करत, उंच शिखरांवर किरणे पसरवत, मित्रदेवांचे आणि वरुणदेवांचे गुणगान करतात. अशा तेजस्वी मित्रदेवांची आणि वरुणदेवांची आम्ही यज्ञकर्ते स्तुती करतो ॥५॥

आ धेनवो मामतेयमवन्तीर्ब्रह्मप्रियं पीपयन्त्सस्मिन्नूधन् ।
पित्वो भिक्षेत वयुनानि विद्वानासाविवासन्नदितिमुरुष्येत्॥६॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ममतेचे पुत्र दीर्घतमा ऋषींचे गायी संरक्षण करतात आणि विपुल दूध प्रदान करून तृप्त करतात. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो यज्ञविधी जाणून घेणाऱ्या दीर्घतमा ऋषींना अन्नदान करावे आणि त्यांना मृत्यूवर विजय मिळवण्यासाठी आशीर्वाद द्यावा ही विनंती॥६॥

आ वां मित्रावरुणा हव्यजुष्टिं नमसा देवाववसा ववृत्याम् ।
अस्माकं ब्रह्म पृतनासु सह्या अस्माकं वृष्टिर्दिव्या सुपारा ॥७॥

हे तेजस्वी मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते नम्रतेने स्तोत्रांचे पठण करत नैवेद्य अर्पण करत आहोत. तो आपण स्वीकारावा ही विनंती. आपण आम्हाला युद्धात विजयी करावे आणि आपल्या दिव्यदृष्टीने आम्हाला दुष्काळाचे दुःख आणि दारिद्र्य यापासून वाचवावे ही विनंती ॥७॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५३

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- मित्रावरूण । **छन्द**- त्रिष्टुप्

यजामहे वां महः सजोषा हव्येभिर्मित्रावरुणा नमोभिः ।
घृतैर्घृतस्नू अध यद्वामस्मे अध्वर्यवो न धीतिभिर्भरन्ति॥१॥
हे परस्परां वर प्रेम करणाऱ्या, तेजस्वी, महान मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते आपल्यासाठी स्तोत्रांचे पठण करीत आहोत. आम्ही यज्ञकर्ते आपल्याला भक्तिभावाने नमस्कार करत हविअन्नाची आहुति अर्पण करत आहोत ॥१॥

प्रस्तुतिर्वां धाम न प्रयुक्तिरयामि मित्रावरुणा सुवृक्तिः ।
अनक्ति यद्वां विदथेषु होता सुम्नं वां सूरिर्वृषणावियक्षन्॥२॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते ध्यान मग्न होऊन, घरगुती आणि सुंदर स्तोत्रांच्या पठणाने आपली स्तुती करतो. आपल्यासाठी यज्ञकर्म करणारे ज्ञानी, यज्ञकर्ते भक्तगण आनंदाचे भागीदार होतात ॥२॥

पीपाय धेनुरदितिऋताय जनाय मित्रावरुणा हविर्दे ।
हिनोति यद्वां विदथे सपर्यन्त्स रातहव्यो मानुषो न होता॥३॥
हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! "रातहव्य" नावाच्या राजाने सामान्य यज्ञकर्त्यांप्रमाणे आपल्याला प्रसन्न करून गायी दुभत्या केल्या. त्याचप्रमाणे

आम्हा सत्याच्या मार्गावर दृढ राहणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तांच्या गायी दुभत्या करून आम्हाला संतुष्ट करावे ही विनंती ॥३॥

उत वां विक्षु मद्यास्वन्धो गाव आपश्च पीपयन्त देवीः ।
उतो नो अस्य पूर्व्यः पतिर्दन्वीतं पातं पयस उस्रियायाः॥४॥
यज्ञकर्त्या भक्तांनी हविअन्नाची आहुति देऊन, गायींच्या दुधाने प्रसन्न केलेल्या हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! भूतकाळातील यज्ञाचे रक्षणकर्ते अग्निदेव आम्हाला वैभव प्राप्त करुन देवोत आणि त्यानंतर सर्व यज्ञकर्ते ऐश्वर्यसंपन्न होऊन आपल्याला तूप मिश्रित आहुति अर्पण करोत ही विंनती ॥४॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५४

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- विष्णु । **छन्द**- त्रिष्टुप्

विष्णोर्नु कं वीर्याणि प्र वोचं यः पार्थिवानि विममे रजांसि ।
यो अस्कभायदुत्तरं सधस्थं विचक्रमाणस्त्रेधोरुगायः॥१॥
पृथ्वी, अवकाश आणि स्वर्ग यांचे निर्माते, देवांचे निवासस्थान, स्वर्ग स्थिर करणाऱ्या, तीन पावलांनी तिन्ही लोक व्यापून टाकणाऱ्या भगवान विष्णुदेवांच्या वीर कृत्यांचे आम्ही गुणगान करतो ॥१॥

प्र तद्विष्णुः स्तवते वीर्येण मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः ।
यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा॥२॥
आपल्या महाकाय तीन पावलांनी संपूर्ण त्रैलोक्य व्यापून टाकणाऱ्या, पर्वतांच्या गुहांमध्ये राहणाऱ्या, भयानक हिंसक प्राण्यांप्रमाणे संचार करणाऱ्या आणि पराक्रमी विष्णुदेवांच्या पराक्रमाची स्तुती संपूर्ण जग करत आहे ॥२॥

प्र विष्णवे शूषमेतु मन्म गिरिक्षित उरुगायाय वृष्णे ।
य इदं दीर्घं प्रयतं सधस्थमेको विममे त्रिभिरित्पदेभिः॥३॥
आपल्या तीन पावलांनी अतिविशाल विश्वाचे मोजमाप केलेल्या, पर्वतासारख्या उच्च स्थानावर निवास करणाऱ्या, अनेक मान्यवरांनी स्तुती केलेल्या, समर्थ, इच्छापूर्ती करणाऱ्या विष्णुदेवांना आमची शक्तिवर्धक स्तोत्रे आम्ही अर्पण करत आहोत ॥३॥

यस्य त्री पूर्णा मधुना पदान्यक्षीयमाणा स्वधया मदन्ति ।
य उ त्रिधातु पृथिवीमुत द्यामेको दाधार भुवनानि विश्वा॥४॥
मधुररसाने भरलेल्या आपल्या तीन पावलांनी सर्व मानवांना अन्नाचा पुरवठा करून आनंद देणारे विष्णुदेव, पृथ्वीलोक, आकाशलोक आणि समस्त विश्वाला आधार देतात ॥४॥

तदस्य प्रियमभि पाथो अश्यां नरो यत्र देवयवो मदन्ति ।
उरुक्रमस्य स हि बन्धुरित्था विष्णोः पदे परमे मध्व उत्सः॥५॥
सर्व देवांच्या उपासकांचा बंधु असणाऱ्या विष्णुदेवांच्या प्रिय निवासस्थानी जाऊन आपण विशेष आनंद अनुभवूया. विष्णुदेवांच्या या उत्कृष्ट निवासस्थानी सतत अमृताचा वर्षाव होत असतो॥५॥

ता वां वास्तून्युश्मसि गमध्यै यत्र गावो भूरिशृङ्गा अयासः ।
अत्राह तदुरुगायस्य वृष्णः परमं पदमव भाति भूरि ॥६॥
हे यज्ञकर्त्या दाम्पत्यांनो सुंदर शिंगे असलेल्या, दूध देणाऱ्या गायी उपस्थित असतील अशा, उत्कृष्ट अनेकांनी स्तुती केलेल्या विष्णुदेवांचे सर्वोच्च स्थान आपल्याला प्राप्त होवो ॥६ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५५

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- १-३ इंद्र आणि विष्णु, ४-६ विष्णु। **छन्द**- जगती

प्र वः पान्तमन्धसो धियायते महे शूराय विष्णवे चार्चत।
या सानुनि पर्वतानामदाभ्या महस्तस्थतुरर्वतेव साधुना॥१॥
हे यज्ञकर्त्यांनो ! अजिंक्य, महान, पर्वताच्या शिखरावर राहणाऱ्या, सद्बुद्धी मिळवण्यासाठी प्रेरित करणाऱ्या इंद्रदेवांना आणि विष्णुदेवांना सोमरस आणि हविष्यान्न अर्पण करावे ॥१॥

त्वेषमित्था समरणं शिमीवतोरिन्द्राविष्णू सुतपा वामुरुष्यति।
या मर्त्याय प्रतिधीयमानमित्कृशानोरस्तुरसनामुरुष्यथः ॥२॥
हे इंद्रदेवा आणि विष्णुदेवा ! आपण दोघेही शत्रूंचा नाश करणाऱ्या अग्निदेवांच्या तेजस्वी ज्वालांचा विस्तार करता. सोमरसाची आहुती प्रदान करणारे यज्ञकर्ते भक्तगण आपल्या आगमनाची प्रतीक्षा करत असतात ॥२॥

ता ईं वर्धन्ति मह्यस्य पौंस्यं नि मातरा नयति रेतसे भुजे।
दधाति पुत्रोऽवरं परं पितुर्नाम तृतीयमधि रोचने दिवः॥३॥
यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सोमरसांच्या अर्पणामुळे इंद्रदेव, पृथ्वीदेवतेमध्ये आणि आकाशदेवतेमध्ये, सर्व प्राण्यांमध्ये प्रजोत्पादनासाठी आवश्यक अशी शक्ति निर्माण करतात. ज्याप्रमाणे एखादा पुत्र आपल्या वडिलांचे उत्तम,मध्यम

आणि कनिष्ठ असे गुण आत्मसात करतो त्याप्रमाणे विष्णुदेव आपले सर्व गुण पृथ्वीदेवते मध्येआणि आकाशदेवते मध्ये निर्माण करतात. ॥३॥

तत्तदिदस्य पौंस्यं गृणीमसीनस्य त्रातुरवृकस्य मीळ्हुषः ।
यः पार्थिवानि त्रिभिरिद्विगामभिरुरु क्रमिष्टोरुगायाय जीवसे ॥४ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, तीन पावलां मध्ये सर्व विशाल विश्व व्यापून टाकणाऱ्या, रक्षक, अहिंसक आणि सदैव तरुण विष्णुदेवांच्या पराक्रमी कृत्यांची स्तुती करत असतो ॥४ ॥

द्वे इदस्य क्रमणे स्वर्दृशोऽभिख्याय मर्त्यो भुरण्यति ।
तृतीयमस्य नकिरा दधर्षति वयश्चन पतयन्तः पतत्रिणः॥५॥
दैवी शक्तींचे वर्णन करताना, मानवांना स्वर्गीय विष्णुदेवांच्या दोन पावलांची माहिती असणे शक्य आहे, परंतु केवळ मनुष्यच नाही तर आकाशात उडणारे मजबूत पंख असलेले पक्षी देखील तिसऱ्या पावलाची माहिती मिळवू शकत नाहीत. ॥५॥

चतुर्भिः साकं नवतिं च नामभिश्चक्रं न वृत्तं व्यतीँरवीविपत् ।
बृहच्छरीरो विमिमान ऋक्वभिर्युवाकुमारः प्रत्येत्याहवम्॥६॥
विविध रूपधारी, महाकाय, स्तुतीने भरलेले, तरुण विष्णुदेव आपल्या विशेष हालचालींद्वारे काळाच्या चौऱ्याण्णव भागांना चक्राप्रमाणे वर्तुळाकार पद्धतीने फिरत ठेवतात॥६॥
(१ वर्ष, २उत्तरायण आणि दक्षिणायन आयने, ५ ऋतू, १२महिने, २४शुक्लपक्ष आणि कृष्णपक्ष, ३० दिवस आणि रात्र,८ प्रहरे, १२राशी, १+२+५+१२+२४+३०+८+१२=९४)

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५६

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- विष्णु । **छन्द**- जगती

भवा मित्रो न शेव्यो घृतासुतिर्विभूतद्युम्न एवया उ सप्रथाः ।
अधा ते विष्णो विदुषा चिदर्ध्यः स्तोमो यज्ञश्च राध्यो हविष्मता॥१॥
हे विष्णुदेवा ! आपण आनंददायी, तूप अर्पण करण्यास पात्र, भरपूर अन्न देणाऱ्या अत्यंत तेजस्वी मित्रांसारखे सुखकारक आहात म्हणून यज्ञकर्ते आपली वारंवार स्तुती करत असतात. आपल्यासाठी यज्ञकर्ते करत असलेल्या यज्ञाचा आपण स्वीकार करावा ही विनंती॥१॥

यः पूर्व्याय वेधसे नवीयसे सुमज्जानये विष्णवे ददाशति ।
यो जातमस्य महतो महि ब्रवत्सेदु श्रवोभिर्युज्यं चिदभ्यसत्॥२॥
जे यज्ञकर्ते भक्तगण, ज्ञानाचे अविनाशी(नित्य) स्वरूप असलेल्या, विश्वाची निर्मिती करणाऱ्या, नित्य नवीन दिसणाऱ्या विष्णुदेवांना हविष्यान्न अर्पण करतात ते यज्ञकर्ते भक्तगण कीर्तिमान होत श्रेष्ठ पद प्राप्त करतात ॥२॥

तमु स्तोतारः पूर्व्यं यथा विद ऋतस्य गर्भं जनुषा पिपर्तन ।
आस्य जानन्तो नाम चिद्विवक्तन महस्ते विष्णो सुमतिं भजामहे ॥३॥
हे स्तुतिकर्त्या यज्ञकर्त्यांनो ! यज्ञाच्या गर्भाचे प्राचीन रूप असलेल्या विष्णुदेवांच्या असलेल्या ज्ञानानुसार आपण त्यांची स्तुती करा. विष्णुदेवांच्या

पराक्रमाची चांगल्या प्रकारे स्तुती करा हे सर्वव्यापी विष्णुदेवा ! आपल्या महान प्रेरणेमुळे आम्ही आपले भक्त झालो आहोत ॥३॥

तमस्य राजा वरुणस्तमश्विना क्रतुं सचन्त मारुतस्य वेधसः ।
दाधार दक्षमुत्तममहर्विदं व्रजं च विष्णुः सखिवाँ अपोर्णुते॥४॥
यज्ञकर्त्या भक्तांच्या यज्ञामध्ये, तेजस्वी वरुणदेव आणि अश्विनीकुमार देखील सर्वज्ञ विष्णुदेवांसोबत सक्रिय असतात. आपल्या सर्वोत्तम सामर्थ्याने विष्णुदेव, सूर्यदेवांच्या सहाय्याने ढगांवरील आवरण दूर करतात ॥४॥

आ यो विवाय सचथाय दैव्य इन्द्राय विष्णुः सुकृते सुकृत्तरः ।
वेधा अजिन्वत्त्रिषधस्थ आर्यमृतस्य भागे यजमानमाभजत् ॥५॥
दिव्य लोकांमध्ये निवास करणाऱ्या, उत्तमकर्म करणाऱ्यांमध्ये सर्वोत्तम विष्णुदेव, इंद्रदेवांच्या सहाय्याने सत्कर्म करणाऱ्या भक्तांना श्रेष्ठफळ देतात. त्रैलोक्यात उपस्थित असलेले विष्णुदेव श्रेष्ठ यज्ञकर्त्या भक्तांना संतुष्ट करत स्वतःहून यज्ञस्थळी पोहोचतात ॥५ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५७

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- अश्विनीकृमार । **छन्द**- जगती५-६ त्रिष्टुप्

अबोध्यग्निर्ज्म उदेति सूर्यो व्युषाश्चन्द्रा मह्यावो अर्चिषा ।
आयुक्षातामश्विना यातवे रथं प्रासावीद्देवः सविता जगत्पृथक् ॥१॥
यज्ञवेदीमध्ये अग्निदेव प्रज्वलित झाले आहेत. सूर्यदेव उगवले आहेत. उषादेवता अंधाराचा नाश करून आपल्या तेजाने सर्व प्राणिमात्रांना आनंदित करत आहेत. अश्विनीकुमारांनी अश्व जोडून आपला रथ यज्ञस्थळी जाण्यासाठी सज्ज केला आहे. सूर्यदेवांनी संपूर्ण जगातील प्राणिमात्रांना त्यांचे काम करण्यासाठी प्रवृत्त केले आहे ॥१॥

यद्युञ्जाथे वृषणमश्विना रथं घृतेन नो मधुना क्षत्रमुक्षतम् ।
अस्माकं ब्रह्म पृतनासु जिन्वतं वयं धना शूरसाता भजेमहि॥२॥
उत्कृष्ट रथाने सुसज्ज असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! जलाचा वर्षाव करून आमचे क्षात्रबल वृद्धिंगत करावे ही विनंती. आमच्या परिवाराचे ज्ञान वाढवून, युद्धामध्ये आम्हाला यशस्वी करावे आणि आम्हाला विपुल संपत्ती द्यावी ही विनंती॥२॥

अर्वाङ्त्रिचक्रो मधुवाहनो रथो जीराश्वो अश्विनोर्यातु सुष्टुतः ।
त्रिवन्धुरो मघवा विश्वसौभगः शं न आ वक्षद्द्विपदे चतुष्पदे ॥३॥

तीन चाकांचा, तीन आसनांचा, गोड अमृतासारख्या पोषक तत्त्वांनी भरलेल्या, ऐश्वर्ययुक्त, शीघ्रगामी अश्वांनी सुसज्ज, मध वाहून नेणाऱ्या रथावर आरूढ होऊन हे अश्विनीकुमारांनो ! आपण आमच्या यज्ञस्थळी यावे आणि द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांना आनंदित करावे ही विनंती ॥३॥

आ न ऊर्जं वहतमश्विना युवं मधुमत्या नः कशया मिमिक्षतम् ।
प्रायुस्तारिष्टं नी रपांसि मृक्षतं सेधतं द्वेषो भवतं सचाभुवा॥४॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी आम्हाला प्रचुर मात्रेमध्ये अन्न द्यावे. आपल्या मधासारख्या मधुर रसाने आम्हाला आनंदित करावे. आम्हाला दीर्घायुषी करून आमचे पाप दूर करावे ही विनंती. आमच्या शत्रूंचा नाश करून आमच्या सर्व कामांमध्ये साथीदार व्हावे ही विनंती॥४॥

युवं ह गर्भं जगतीषु धत्थो युवं विश्वेषु भुवनेष्वन्तः ।
युवमग्निं च वृषणावपश्च वनस्पतींरँश्विनावैरयेथाम्॥५॥
गायींमध्ये किंवा संपूर्ण जगात गर्भ-उत्पादक क्षमता स्थापित करण्यास सक्षम असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण अग्नि, पाणी आणि वनस्पतींना सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठी प्रेरित करता॥५॥

युवं ह स्थो भिषजा भेषजेभिरथो ह स्थो रथ्या राथ्येभिः ।
अथो ह क्षत्रमधि धत्थ उग्रा यो वां हविष्मान्मनसा ददाश॥६॥
हे अश्विनीकुमारांनो ! औषधांच्या सखोल ज्ञानामुळे आपण उत्तम वैद्य आहात. रथाला ओढण्यास अश्व सक्षम असल्याने आपणास उत्तम सारथी म्हणून ओळखले जाते. जे यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला श्रद्धापूर्वक हविष्यान्न अर्पण करतात त्यांना क्षात्रधर्माचे पालन करण्यासाठी आपण बल प्रदान करता॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५८

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- अश्विनीकृमार । **छन्द**- त्रिष्टुप् ६ अनुष्टुप्

वसू रुद्रा पुरुमन्तू वृधन्ता दशस्यतं नो वृषणावभिष्टौ ।
दस्रा ह यद्रेक्ण औचथ्यो वां प्र यत्सस्राथे अकवाभिरूती॥१॥

औंचथ्यऋषींचे पुत्र दीर्घतमा ऋषींनी धनाची इच्छा करताच, सर्वोत्तम संरक्षण शक्ति देणाऱ्या, हे शत्रूंचे शक्तिशाली संहारक, सर्वांचे आश्रयस्थान, दुष्टांसाठी भयंकर, ज्ञानाने परिपूर्ण, समृद्धीचे भांडार असलेल्या, हे अश्विनीकुमारांनो ! आम्हाला इच्छित वरदान द्यावे ही विनंती. ॥१॥

को वां दाशत्सुमतये चिदस्यै वसू यद्धेथे नमसा पदे गोः ।
जिगृतमस्मे रेवतीः पुरंधीः कामप्रेणेव मनसा चरन्ता ॥२॥

सर्वांना आश्रय देणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! नतमस्तक होऊन, आपल्या दोघांची उपासना करणारे आपल्या महान ज्ञानाला तृप्त करण्यासाठी कोण नैवेद्य अर्पण करू शकेल? हे सर्वत्र फिरणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आमचे शरीर मजबूत करणाऱ्या, गोड आणि दूध देणाऱ्या अनेक गायी आम्हाला प्रदान कराव्यात ही विनंती॥२॥

युक्तो ह यद्वां तौग्र्याय पेरुर्वि मध्ये अर्णसो धायि पज्रः ।
उप वामवः शरणं गमेयं शूरो नाज्म पतयद्भिरेवैः॥३॥

हे अश्विनीकुमारांनो ! राजा तुग्राचा पुत्र, भुज्यूच्या रक्षणासाठी आपण आपल्या सामर्थ्याने समुद्राच्या मध्यभागी शक्तिशाली आणि वेगवान रथ समुद्राच्या मध्यभागी स्थापित केला. हे अश्विनीकुमारांनो ! द्रुतगती अश्वांच्या साहाय्याने युद्ध जिंकणारे शूर पुरुष ज्याप्रमाणे युद्धात प्रवेश करतात त्याचप्रमाणे आम्ही भक्तगण आपल्याकडे आश्रयासाठी आणि संरक्षणासाठी आलो आहोत ॥३॥

उपस्तुतिरौचथ्यमुरुष्येन्मा मामिमे पतत्रिणी वि दुग्धाम् ।
मा मामेधो दशतयश्चितो धाक्प्र यद्वां बद्धस्त्मनि खादति क्षाम् ॥४॥

औचथ्यऋषींचे पुत्र दीर्घतमा ऋषी म्हणतात, "हे अश्विनीकुमारांनो ! आम्ही केलेल्या प्रार्थनांनी प्रसन्न होऊन आमचे जळण्या पासून रक्षण करावे. दिवस आणि रात्र सतत हालचाल करून मला ग्रासून टाकत आहेत. दहापट लाकडे टाकून प्रज्वलित झालेले अग्निदेव माझी राख करत आहेत. आपल्या दोघांचा मी भक्त, दोरीने बांधलेल्या अवस्थेत जमिनीवर असहाय्य अवस्थेत, पडून आहे ॥४॥

न मा गरन्नद्यो मातृतमा दासा यदीं सुसमुब्धमवाधुः ।
शिरो यदस्य त्रैतनो वितक्षत्स्वयं दास उरो अंसावपि ग्ध॥५॥

औंचथ्यऋषींचे पुत्र दीर्घतमा ऋषी म्हणतात, "हे अश्विनीकुमारांनो ! ज्यावेळी चोर-लुटारूंनी (दस्यु) मला साखळ्यांनी घट्ट बांधून नदीत फेकले, तेव्हा मातेच्या रूपातील त्या नद्यांनी संरक्षण दिले. त्रैतन नावाच्या लुटारूने जेव्हा माझे डोके, छाती आणि खांदे कापण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आपल्या दोघांच्या कृपेने आणि दोघांनी दिलेल्या संरक्षणामुळे मी सुरक्षित राहिलो; आणि त्या लुटारूचे अवयव कापले गेले" ॥५॥

दीर्घतमा मामतेयो जुजुर्वान्दशमे युगे ।

अपामर्थं यतीनां ब्रह्मा भवति सारथिः॥६॥

ममतेचा पुत्र दीर्घतमा ऋषि अश्विनीकुमारांच्या कृपाप्रसादाने दहाव्या युगामध्ये शारीरिक दृष्ट्या वृद्ध झाले. ब्रह्मज्ञानाने परिपूर्ण अशा दीर्घतमा ऋषींच्या चांगल्या धीराच्या कर्माचे फळ म्हणून कुशल सारथ्या प्रमाणे मानवलोकी श्रेष्ठत्वाला पोहोचले ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१५९

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता**- देवता- द्यावा- पृथ्वी । **छन्द**- जगती

प्र द्यावा यज्ञैः पृथिवी ऋतावृधा मही स्तुषे विदथेषु प्रचेतसा ।
देवेभिर्ये देवपुत्रे सुदंससेत्था धिया वार्याणि प्रभूषतः॥१॥
यज्ञाची महती वाढवणाऱ्या, विस्तृत यज्ञकार्यांमध्ये आम्हाला सावध करणाऱ्या, भक्तगणांना श्रेष्ठ ऐश्वर्य देणाऱ्या, देवतांच्या कन्या आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता यांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रार्थना करतो. ॥१॥

उत मन्ये पितुरद्रुहो मनो मातुर्महि स्वतवस्तद्धवीमभिः ।
सुरेतसा पितरा भूम चक्रतुरुरु प्रजाया अमृतं वरीमभिः॥२॥
यज्ञकर्ते भक्तगण, प्रजेचे रक्षण करणाऱ्या, आणि प्रजेला प्रगतिशील बनवणाऱ्या, पृथ्वी रूपातील मातेला आणि आकाशाच्या रूपातील पित्याला स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न करतात ॥२॥

ते सूनवः स्वपसः सुदंससो मही जज्ञुर्मातरा पूर्वचित्तये ।
स्थातुश्च सत्यं जगतश्च धर्मणि पुत्रस्य पाथः पदमद्वयाविनः॥३॥
उत्कृष्ट, मेहनती आणि सद्गुणी मुलांना पृथ्वी रूपातील मातेची आणि आकाशाच्या रूपातील पित्याची वैशिष्ट्ये परिचित असतात. पृथ्वी रूपातील

मातांनी आणि आकाशाच्या रूपातील पित्यांनी चराचर सृष्टिमध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या मुलांच्या श्रेष्ठ निवासस्थानाचे रक्षण करावे ही विनंती ॥३॥

ते मायिनो ममिरे सुप्रचेतसो जामी सयोनी मिथुना समोकसा ।
नव्यंनव्यं तन्तुमा तन्वते दिवि समुद्रे अन्तः कवयः सुदीतयः॥४॥
आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता या दोन्ही सख्ख्या बहिणींच्या चेतना संपन्न अभेद्य जोडीला सूर्यदेवांची क्रांतिकारी आणि ज्ञानी किरणे विभक्त करतात. ही काम करणारी तेजस्वी किरणे आकाश आणि पृथ्वीवर तंतुरूपात सर्वत्र पसरतात ॥४॥

तद्राधो अद्य सवितुर्वरेण्यं वयं देवस्य प्रसवे मनामहे ।
अस्मभ्यं द्यावापृथिवी सुचेतुना रयिं धत्तं वसुमन्तं शतग्विनम्॥५॥
आम्ही भक्तगण चांगल्या कर्मांच्या कामगिरीसाठी संपूर्ण जगाचा निर्माता सूर्यदेवांकडे परम संपत्तीची मागणी करतो. आमच्यावर कृपादृष्टीदाखवून पृथ्वीदेवता आणि आकाशदेवता आम्हाला सर्वोत्तम निवासस्थान आणि पशुधन प्रदान करोत ही विनंती ॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६०

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता-**द्यावा- पृथ्वी । **छन्द**- जगती

ते हि द्यावापृथिवी विश्वशम्भुव ऋतावरी रजसो धारयत्कवी ।
सुजन्मनी धिषणे अन्तरीयते देवो देवी धर्मणा सूर्यः शुचिः॥१॥
सर्व विश्वाचे सुखकारक, त्यागाने संपन्न, बुद्धिमान, सुंदर जन्म असलेले, कार्यकुशल, पावसाच्या निर्मितीत गुंतलेले, पवित्र आणि तेजस्वी सूर्यदेव, आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता यांच्यामधून भ्रमण करत आणि त्यांच्या विशेष गुणांचे रक्षण करतात ॥१॥

उरुव्यचसा महिनी असश्चता पिता माता च भुवनानि रक्षतः ।
सुधृष्टमे वपुष्ये न रोदसी पिता यत्सीमभि रूपैरवासयत्॥२॥
परस्परांपासून वेगळे असलेले, मनुष्यमात्रांचे संरक्षणकर्ते, विशाल, महान अशा पृथ्वीमाता आणि आकाशपिता सर्व प्राण्यांचे रक्षण करतात. सर्वशक्तिमान पृथ्वीमाता आणि आकाशपिता पालकांच्या अनंत रूपात समस्त सजीव प्राण्यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील असतात ॥२॥

स वह्निः पुत्रः पित्रोः पवित्रवान्पुनाति धीरो भुवनानि मायया ।
धेनुं च पृश्निं वृषभं सुरेतसं विश्वाहा शुक्रं पयो अस्य दुक्षत॥३ ॥
पृथ्वीमाता आणि आकाशपिता या माता-पित्यांचे पवित्र, तेजस्वी, धीर देणारे, फळ देणारे सुपुत्र सूर्यदेव आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत पृथ्वीमातेच्या

रूपातील श्वेत गायीला आणि आकाशपित्याच्या रूपातील वृषभाला (बैलाला) प्रकाशमान करतात आणि पर्जन्यरूपी तेजस्वी दूध काढतात ॥३॥

अयं देवानामपसामपस्तमो यो जजान रोदसी विश्वशम्भुवा ।
वि यो ममे रजसी सुक्रतूययाजरेभिः स्कम्भनेभिः समानृचे ॥४॥
सर्व जगाला आनंद देणारे पृथ्वीमाता आणि आकाशपिता यांना निर्माण करणारे आणि दोघांनाही दृढ बंधनांनी स्थिरता देणाऱ्या कुशल कर्म करणाऱ्या परमात्म्याला आम्ही वंदन करतो ॥४॥

ते नो गृणाने महिनी महि श्रवः क्षत्रं द्यावापृथिवी धासथो बृहत् ।
येनाभि कृष्टीस्ततनाम विश्वहा पनाय्यमोजो अस्मे समिन्वतम्॥५॥
प्रशंसनीय, महान पृथ्वीमाता आणि आकाशपित्यांनो ! उत्तम प्रजाजन करण्याकरता पर्याप्त अन्न आणि बल आम्हाला द्यावे ही विनंती ॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६१

ऋषी- दीर्घतमा औचथ्य । **देवता-** ऋभुगण **छंद**-जगती १४ त्रिष्टुप्

किमु श्रेष्ठः किं यविष्ठो न आजगन्किमीयते दूत्यं कद्यदूचिम ।
न निन्दिम चमसं यो महाकुलोऽग्ने भ्रातर्द्रुण इद्भूतिमूदिम॥१॥

अग्निदेवांना पाहून ऋभुदेवांनी विचारले " आमच्या आधी आलेल्या आपण, ज्येष्ठ की कनिष्ठ बंधु आहात ? की आपण देवतांचे दूत म्हणून आला आहात? आम्ही हे कसे ठरवू शकू?" त्यानंतर ऋभुदेव अग्निदेवांना म्हणाले," हे बंधु अग्निदेवा !आम्ही महान कुटुंबात तयार झालेल्या चमसाची निंदा करणार नाही. लाकडापासून बनलेल्या चमसाच्या प्राप्तीचे आम्ही वर्णन करणार आहोत"॥१॥

एकं चमसं चतुरः कृणोतन तद्वो देवा अब्रुवन्तद्व आगमम् ।
सौधन्वना यद्येवा करिष्यथ साकं देवैर्यज्ञियासो भविष्यथ॥२॥

यावर अग्निदेवांनी उत्तर दिले, "हे सुधन्वापुत्रा ऋभुदेवा ! चमसाचे चार भाग करण्याची देवतांची आज्ञा सांगण्यासाठी मी आलो आहे. असे केल्यास आहुती दिल्या जाणाऱ्या हविष्यान्नातील वाटा मिळवण्याचा अधिकार तुम्हाला देवतांसोबत मिळेल." ॥२॥

अग्निं दूतं प्रति यदब्रवीतनाश्वः कर्त्वो रथ उतेह कर्त्वः ।
धेनुः कर्त्वा युवशा कर्त्वा द्वा तानि भ्रातरनु वः कृत्व्येमसि ॥३॥

ह्यावर दीर्घतमा ऋषि म्हणाले, " हे ऋभुदेवानो आपण अग्निदेवांना सांगितले की, अश्व, रथ आणि गायी तयार करण्याच्या आणि वृद्ध माता-पित्यांना तरुण करण्याच्या कामामध्ये आपण गर्क आहात. ही सर्व कामे संपल्यानंतर यज्ञस्थळी येऊ असे आश्वासन अग्निदेवांना दिलेत " ॥३॥

चकृवांस ऋभवस्तदपृच्छत क्वेदभूद्यः स्य दूतो न आजगन् ।
यदावाख्यच्चमसाञ्चतुरः कृतानादित्त्वष्टा ग्नास्वन्तर्न्यानजे ॥४॥
दीर्घतमा ऋषि पुढे म्हणाले, "ऋभुदेवानो, काम पूर्ण केल्यावर, तुम्ही दूताच्या रूपात आलेले अग्निदेव कुठे गेले याचा शोध घेऊ लागला, तेव्हा त्वष्टदेवांनी चमसाच्याचार भागाच्या जवळील स्त्रीसमुदायात अग्निदेवांना पाहिले ॥४॥

हनामैनाँ इति त्वष्टा यदब्रवीच्चमसं ये देवपानमनिन्दिषुः ।
अन्या नामानि कृण्वते सुते सचाँ अन्यैरेनान्कन्या नामभिः स्परत् ॥५॥
देवतांना प्रिय असणाऱ्या चमसाची निंदा करणाऱ्या ऋभुदेवांना मारणार असे त्वष्टदेवांनी सांगताच सिद्ध झालेला सोमरस प्राशन करताना यज्ञकर्ते ऋभुदेवांचे नाव न घेता त्यांना वेगळ्या नावाने हाक मारू लागले. ऋभुदेवांची आई सुद्धा ऋभुदेवांना अन्य नावाने हाक मारते आणि आनंद व्यक्त करते ॥५॥

इन्द्रो हरी युयुजे अश्विना रथं बृहस्पतिर्विश्वरूपामुपाजत ।
ऋभुर्विभ्वा वाजो देवाँ अगच्छत स्वपसो यज्ञियं भागमैतन॥६॥
इंद्रदेवांनी अश्वांना, अश्विनीकुमारांनी तयार केलेल्या रथाला जोडले आणि बृहस्पतीदेव विश्वरूपा नावाच्या गायीला नवीन रथ देण्यासाठी तयार झाले, म्हणून ऋभुदेव, विभु(सर्वव्यापी) आणि वाज (सामर्थ्य) ह्या यज्ञकुशल बंधूंना देवत्व प्राप्त झाले आणि यज्ञातील हविष्यान्नाचा भाग प्राप्त होऊ लागला ॥६॥

निश्चर्मणो गामरिणीत धीतिभिर्या जरन्ता युवशा ताकृणोतन ।
सौधन्वना अश्वादश्वमतक्षत युक्त्वा रथमुप देवाँ अयातन॥७॥
हे सुधन्वाच्या पुत्रांनो!(ऋभुदेवांनो) आपण आपल्या बुद्धीचातुर्याने कातडी नसलेल्या गायीला नवीन जीवन दिलेत, वृद्ध माता-पित्यांना तारुण्य दिलेत, एका अश्वा पासून दुसरा अश्व निर्माण केलात. त्याला आपल्या रथाला जोडून देवतांसमोर सादर केलेत ॥७॥

इदमुदकं पिबतेत्यब्रवीतनेदं वा घा पिबता मुञ्जनेजनम् ।
सौधन्वना यदि तन्नेव हर्यथ तृतीये घा सवने मादयाध्वै॥८॥
हे देवतांनो ! आपण ऋभुदेवांना बोलला होता की, " हे सुधन्वाच्या पुत्रांनो! तुम्ही हे सोमरसाच्या रूपात पाणी प्राशन कराकिंवा मुंज नावाच्या गवताने शुद्ध केलेले पाणी प्राशन करा. जर तुम्हाला हे पाणी प्राशन करण्याची इच्छा नसेल तर यज्ञाच्या तृतीय सवना मध्ये म्हणजे तिसऱ्या प्रहरी प्राशन करून आनंदी व्हा॥८॥

आपो भूयिष्ठा इत्येको अब्रवीदग्निर्भूयिष्ठ इत्यन्यो अब्रवीत् ।
वधर्यन्तीं बहुभ्यः प्रैको अब्रवीदृता वदन्तश्चमसाँ अपिंशत॥९॥
तीन ऋभुदेवांपैकी एकाने म्हटले, "पाणी हे सर्वोत्तम आहे, दुसऱ्याने अग्नी सर्वोत्तम आहे म्हटले, आणि तिसऱ्याने पृथ्वी सर्वोत्तम आहे असे म्हटले." अशा प्रकारे सत्य बोलून त्यांनी चमसाचे चार भाग केले. ॥९॥

श्रोणामेक उदकं गामवाजति मांसमेकः पिंशति सूनयाभृतम् ।
आ निम्रुचः शकृदेको अपाभरत्किं स्वित्पुत्रेभ्यः पितरा उपावतुः॥१०॥
तीन ऋभुदेवांपैकी एकाने विकारी गायीला पाण्याकडे जाण्यास प्रेरित केले, दुसऱ्यांनी गायीचे अतिरिक्त वाढलेले मांस यज्ञकार्यासाठी कापून काढले आणि तिसऱ्याने संपूर्ण साफ करून गायीला स्वच्छ केले. असे ऋषितुल्य पुत्र, माता-पित्यांची यापेक्षा अधिक काय सेवा करू शकतील? ॥१०॥

उद्वत्स्वस्मा अकृणोतना तृणं निवत्स्वपः स्वपस्यया नरः ।
अगोह्यस्य यदसस्तना गृहे तदद्येदमृभवो नानु गच्छथ॥११॥
हे प्रतिष्ठित, नेतृत्वकुशल ऋभुदेवांनो ! आपल्या सर्वोत्तम प्रयत्नांनी आपण पृथ्वीच्या पर्वतमय प्रदेशावर उपयुक्त तृणधान्य वाढवले. सखल प्रदेशात पाणी गोळा केलेत. सूर्यमंडळात फिरत असताना तुम्ही लपून राहू नका ही विनंती ॥११॥

सम्मील्य यद्भुवना पर्यसर्पत क्व स्वित्तात्या पितरा व आसतुः ।
अशपत यः करस्नं व आददे यः प्राब्रवीत्प्रो तस्मा अब्रवीतन॥१२॥
सर्व भक्तगणांना झाकून टाकणाऱ्या हे ऋभुदेवांनो ! आपला हात धरणाऱ्या राक्षसांचा नाश करताना आणि स्तुति करणाऱ्या भक्तांना वरदान देताना आपले चंद्र-सूर्य रुपी माता-पिता कुठे लपले होते? ॥१२॥

सुषुप्वांस ऋभवस्तदपृच्छतागोह्य क इदं नो अबूबुधत् ।
श्वानं बस्तो बोधयितारमब्रवीत्संवत्सर इदमद्या व्यख्यत॥१३॥

हे ऋभुदेवांनो ! आपण सूर्यदेवांच्या निवासस्थानी निद्रा घेत असताना सूर्यदेवांना विचारले, "आम्हाला निद्रिस्त अवस्थेतून कर्म करण्यासाठी कोणी जागृत केले". त्यावर सूर्यदेवांनी उत्तर दिले," वायुदेवांनी तुम्हाला जागृत केले असताना, वर्ष बदललेले असताना तुम्ही जगाला प्रकाशमान केले "॥१३॥

दिवा यान्ति मरुतो भूम्याग्निरयं वातो अन्तरिक्षेण याति ।
अद्भिर्याति वरुणः समुद्रैर्युष्माँ इच्छन्तः शवसो नपातः॥१४॥

हे शक्तिशाली ऋभुदेवांनो ! आपल्याला पाहण्यासाठी स्वर्गातून मरुद्गण, पृथ्वीवरून अग्निदेव, आकाशातून वायुदेव आणि पाण्यातून वरुणदेव येत आहेत॥१४॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६२

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता-** अश्व **छंद-** त्रिष्टुप्,३-६ जगती

मा नो मित्रो वरुणो अर्यमायुरिन्द्र ऋभुक्षा मरुतः परि ख्यन् ।
यद्वाजिनो देवजातस्य सप्तेः प्रवक्ष्यामो विदथे वीर्याणि॥१॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण दैवी गुणांनी संपन्न असलेल्या गतिमान, पराक्रमी आणि शक्तिशाली अश्वाचे (वाजी) गुणगान करत आहोत म्हणून मित्रदेव , वरुणदेव, अर्यमा, आयुर्देव, इंद्रदेव , मरुद्गण, ऋभुक्षा आणि वायुदेव यांनी आम्हाला दुर्लक्षित करू नये; आणि आमच्यापासून दूर जाऊ नये ही विनंती॥१॥

(वेदांमध्ये वाजीचा अर्थ अश्व आहे. याला चौतिसावा देव म्हणून ही ओळखले जाते)

यन्निर्णिजा रेक्णसा प्रावृतस्य रातिं गृभीतां मुखतो नयन्ति ।
सुप्राङजो मेम्यद्विश्वरूप इन्द्रापूष्णोः प्रियमप्येति पाथः॥२॥

सुवर्ण अलंकारांनी सजवलेल्या यज्ञातील अश्वाला अर्पण करण्यासाठी यज्ञकर्ते बकऱ्याला(अजा) घेऊन जातात. इंद्रदेवांना आणि पूषन् देवांना प्रिय असलेले हविष्यान्न असलेला बकरा अश्वापुढे आला पाहिजे॥२॥

एष च्छागः पुरो अश्वेन वाजिना पूष्णो भागो नीयते विश्वदेव्यः ।
अभिप्रियं यत्पुरोळाशमर्वता त्वष्टेदेनं सौश्रवसाय जिन्वति ॥३॥

सर्व देवांसाठी उपयुक्त असलेला, बळी म्हणून त्वष्टदेवांनी पाठवलेला आणि पूषन् देवांना एक भाग अर्पण केलेला देवतांना हविष्यान्न म्हणून प्रिय असलेला बकरा अश्वाला दिल्याने उत्तम यश प्राप्त करतो॥३॥

यद्धविष्यमृतुशो देवयानं त्रिर्मानुषाः पर्यश्वं नयन्ति ।
अत्रा पूष्णः प्रथमो भाग एति यज्ञं देवेभ्यः प्रतिवेदयन्नजः ॥४॥
यज्ञकर्ते भक्तगण देवातांनी स्वीकारलेला आणि अर्पण करण्यास योग्य अशा अश्वाला यज्ञवेदीतील अग्निदेवां भोवती तीन वेळा प्रदक्षिणा करवीत असताना, पूषन् देवांना अर्पण केलेला बकरा यज्ञाची घोषणा करत फिरतो ॥४॥

होताध्वर्युरावया अग्निमिन्धो ग्रावग्राभ उत शंस्ता सुविप्रः ।
तेन यज्ञेन स्वरंकृतेन स्विष्टेन वक्षणा आ पृणध्वम् ॥५॥
होता , अध्वर्यू , प्रतिप्रस्थाता, अग्निध, ग्रावग्राभ, आवाया,शंस्ता त्याच प्रमाणे सुविप्र नावाच्या ऋषींनो आमच्या प्रसिद्ध आणि सुशोभित यज्ञाने प्रसन्न होऊन सर्व जलप्रवाह पाण्याने भरून टाकावे ही विनंती॥५॥

यूपव्रस्का उत ये यूपवाहाश्चषालं ये अश्वयूपाय तक्षति ।
ये चार्वते पचनं सम्भरन्त्युतो तेषामभिगूर्तिर्न इन्वतु॥६॥
जे यूपासाठी (खांब किंवा खुंटी)झाडे तोडतात, जे यूपासाठी कापलेली झाडे वाहून नेतात, जे घोडे बांधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या यूपासाठी खांब बनवतात किंवा जे घोड्याचे मांस शिजवण्यासाठी लाकडी भांडी तयार करतात, त्या सर्वांचे प्रयत्न आमच्यासाठी हितकारी होऊ देत ॥६॥

उप प्रागात्सुमन्मेऽधायि मन्म देवानामाशा उप वीतपृष्ठः ।
अन्वेनं विप्रा ऋषयो मदन्ति देवानां पुष्टे चकृमा सुबन्धुम्॥७॥
देवतांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी सुडौल अश्व यज्ञस्थळी येण्याची आम्ही यज्ञकर्ते इच्छा करत आहोत. आम्हाला सर्वोत्तम परिणाम मिळवण्यासाठी आम्ही त्या अश्वाला बांधू हे पाहून बुद्धिमान यज्ञकर्ते प्रसन्न होतील ॥७॥

यद्वाजिनो दाम संदानमर्वतो या शीर्षण्या रशना रज्जुरस्य ।
यद्वा घास्य प्रभृतमास्ये तृणं सर्वा ता ते अपि देवेष्वस्तु ॥८ ॥
बलवान अश्वाच्या गळ्यात आणि पायात बांधलेल्या दोऱ्या, तोंडाला लावलेले लगाम आणि त्याच्या मुखात दिलेला गवताचा घास अश्वाच्या समवेत देवलोकी जाऊ देत ॥८ ॥

यदश्वस्य क्रविषो मक्षिकाश यद्वा स्वरौ स्वधितौ रिप्तमस्ति ।
यद्धस्तयोः शमितुर्यन्नखेषु सर्वा ता ते अपि देवेष्वस्तु ॥९ ॥
यज्ञातील अश्वाला देण्यात येणाऱ्या मांसाचा माशीने खाल्लेला भाग, कापताना चाकू वर लागलेला मांसाचा भाग आणि हाताला लागलेल्या मांसाचा भाग अश्वासमवेत देवलोकी जाऊ दे ॥९ ॥

यदूवध्यमुदरस्यापवाति य आमस्य क्रविषो गन्धो अस्ति ।
सुकृता तच्छमितारः कृण्वन्तूत मेधं शृतपाकं पचन्तु ॥१०॥
यज्ञातील अश्वाच्या पोटातील अर्धवट पचलेल्या गवताला, न शिजवलेल्या मांसाचा भाग, मांस कापणाऱ्यांनी शुद्ध करून यज्ञ करण्यासाठी देवतांसाठी शिजवावे ॥१०॥

यत्ते गात्रादग्निना पच्यमानादभि शूलं निहतस्यावधावति ।
मा तद्भूम्यामा श्रिषन्मा तृणेषु देवेभ्यस्तदुशद्भ्यो रातमस्तु ॥११॥
हे अश्वा ! अग्निवर शिजवताना खाली गळून पडलेले किंवा सुरीला लागलेले तुझे मांस जमिनीवर किंवा गवतावर चिकटून न राहता देवतांना प्राप्त होवो॥११॥

ये वाजिनं परिपश्यन्ति पक्वं य ईमाहुः सुरभिर्निर्हरेति ।
ये चार्वतो मांसभिक्षामुपासत उतो तेषामभिगूर्तिर्न इन्वतु ॥१२॥
जे लोक घोड्याचे काही भाग शिजवलेले पाहतात आणि म्हणतात, "मांस खूप सुगंधी आहे, आम्हालाही थोडे द्या." अशा लोकांच्या इच्छा आमच्यासाठी फलदायी होवोत ॥१२॥

यन्नीक्षणं माँस्पचन्या उखाया या पात्राणि यूष्ण आसेचनानि ।
ऊष्मण्यापिधाना चरूणामङ्काः सूनाः परि भूषन्त्यश्वम्॥१३॥
अश्वाचे मांस शिजवण्यासाठी लागणारी भांडी(उखा) , मांसाचा रस साठवण्यासाठी लागणारी भांडी, वाफ जाऊ नये म्हणून भांड्यावरती झाकण्यासाठी वापरल्या जाणारी झाकणे त्याचप्रमाणे अश्वाच्या वधासाठी उपयोगी पडणाऱ्या चाकू,सुऱ्या या सर्वांना सिद्ध करावे ॥१३॥

निक्रमणं निषदनं विवर्तनं यच्च पड्बीशमर्वतः ।
यच्च पपौ यच्च घासिं जघास सर्वा ता ते अपि देवेष्वस्तु॥१४॥

अश्वाला चालण्यासाठी, बसण्यासाठी आणि लोळण्यासाठी लागणारे स्थान, त्याचे पाय बांधण्याचे साधन, त्याला पिण्यासाठी लागणारे पाणी आणि त्याने खाल्लेले गवत, हे सर्व देवतांना उपलब्ध होवो.॥१४॥

मा त्वाग्निर्ध्वनयीद्धूमगन्धिर्मोखा भ्राजन्त्यभि विक्त जघ्रिः ।
इष्टं वीतमभिगूर्तं वषट्कृतं तं देवासः प्रति गृभ्णन्त्यश्वम्॥१५॥
हे अश्वा ! अग्नीच्या धुरामुळे तुला त्रास होऊ नये, मांस शिजवण्याचे भांडे अग्नीच्या अति उष्णतेमुळे फुटू नये, यज्ञामध्ये आहुतीत अर्पण केलेले (वषट्कार) मांस देवता आनंदाने ग्रहण करोत ॥१५॥

यदश्वाय वास उपस्तृणन्त्यधीवासं या हिरण्यान्यस्मै ।
संदानमर्वन्तं पड्बीशं प्रिया देवेष्वा यामयन्ति ॥१६॥
यज्ञासाठी वापरण्यात येणारे अश्वाला पांघरण्यासाठी आणलेले वस्त्र, सजवण्यासाठी वापरलेले सोन्याचे दागिने, पाय आणि मान बांधण्यासाठी वापरलेली उपकरणे, या सर्व दिव्यवस्तु यज्ञकर्त्यांनी देवतांना अर्पण कराव्यात. ॥१६॥

यत्ते सादे महसा शूकृतस्य पाष्ण्र्या वा कशया वा तुतोद ।
स्रुचेव ता हविषो अध्वरेषु सर्वा ता ते ब्रह्मणा सूदयामि ॥१७॥
हे अश्वा ! यज्ञस्थळी येताना तुझ्या नाकातून मोठा आवाज येत होता, मंद गतीने चालत असल्यामुळे तुला चाबकाने मारले जात होते, तुला झालेले हे दुःख आम्ही यज्ञकर्ते ज्या प्रमाणे स्रुवाच्या सहाय्याने अग्नि मध्ये हविष्यान्न अर्पण केले जाते त्याचप्रमाणे मंत्रांच्या मदतीने आम्ही तुझे दुःख नाहीसे करतो ॥१७॥

चतुस्त्रिंशद्वाजिनो देवबन्धोर्वङ्क्रीरश्वस्य स्वधितिः समेति ।
अच्छिद्रा गात्रा वयुना कृणोत परुष्परुरनुघुष्या वि शस्त ॥१८॥
हे अश्वांना कापणाऱ्यांनो ! देवतांना आवडणाऱ्या अश्वांच्या चौतीस बरगड्या कापण्यासाठी वापरावयाचा चाकू खूप काळजीपूर्वक वापरा. अश्वाचे सारे अवयव काळजीपूर्वक आणि नामोच्चारण करत अखंड कापून काढा॥१८॥

एकस्त्वष्टुरश्वस्या विशस्ता द्वा यन्तारा भवतस्तथ ऋतुः ।
या ते गात्राणामृतुथा कृणोमि ताता पिण्डानां प्र जुहोम्यग्नौ॥१९॥
तेजस्वी अश्वाला बळी देणारा एकच आहे. अश्वाला घट्ट पकडून ठेवणारे दोघे आहेत. हे अश्वा! वेळोवेळी कापलेल्या तुझ्या मांसाचा पिंड करून प्रज्वलित अग्नीमध्ये आम्ही यज्ञकर्ते अर्पण करू॥१९॥

मा त्वा तपत्प्रिय आत्मापियन्तं मा स्वधितिस्तन्व आ तिष्ठिपत्ते ।
मा ते गृध्नुरविशस्तातिहाय छिद्रा गात्राण्यसिना मिथू कः॥२०॥
हे अश्वा ! स्वर्गलोकी जाताना तुझे प्रिय शरीर तुला त्रास न देवो अथवा कापणाऱ्यांचे चाकू तुझ्या शरीरात अधिक काळ वास्तव्य न करोत. मांस खाण्याची इच्छा असलेल्या आणि अवयव कापण्यात अकुशल असलेल्या व्यक्तीने वेगवेगळ्या अवयवांव्यतिरिक्त भाग वाकडेतिकडे उगीचच न कापावेत ॥२०॥

न वा उ एतन्म्रियसे न रिष्यसि देवाँ इदेषि पथिभिः सुगेभिः ।
हरी ते युञ्जा पृषती अभूतामुपास्थाद्वाजी धुरि रासभस्य ॥२१॥

यज्ञामध्ये अशा प्रकारे बलिदान दिलेल्या हे अश्वा ! तुझा नाश होत नाही किंवा तुला कोणी इजा करू शकत नाही. स्वर्गलोकात जाताना तुझ्या रथाला इंद्रदेवांचे अश्व, मरुद्गणांची ठिपकेदार हरणे किंवा अश्विनीकुमारांची रासभे (गाढवे) जोडली आहेत ॥२१॥

सुगव्यं नो वाजी स्वश्व्यं पुंसः पुत्राँ उत विश्वापुषं रयिम् ।
अनागास्त्वं नो अदितिः कृणोतु क्षत्रं नो अश्वो वनतां हविष्मान् ॥२२॥

बळी दिल्या जाणाऱ्या हे अश्वा ! आम्हाला गायी आणि घोडे, आमच्या पुत्र-पौत्रांचे, पत्नीचे रक्षण करणारी संपत्ती प्रदान कर. हे गौरवशाली अश्वा ! आम्हाला पापांपासून मुक्त कर आणि आम्हाला क्षत्रियांचे तेज आणि शक्ती दे ही विनंती ॥२२ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६३

ऋषी- दीर्घतमा औचथ्य । **देवता-** अश्व **छंद**-जगती १३ त्रिष्टुप्

यदक्रन्दः प्रथमं जायमान उद्यन्त्समुद्रादुत वा पुरीषात् ।
श्येनस्य पक्षा हरिणस्य बाहू उपस्तुत्यं महि जातं ते अर्वन् ॥१॥
जन्मत:च गरुडासारखे पंख असलेल्या, हरणासारखे सारखे पाय असलेल्या, समुद्राच्या पाण्यातून किंवा चिखलातून जन्माला आलेल्या, गर्जना करणाऱ्या हे अर्वन्(चंचल गतिशील) अश्वा तुझा जन्म स्तुतीस पात्र आहे ॥१॥

यमेन दत्तं त्रित एनमायुनगिन्द्र एणं प्रथमो अध्यतिष्ठत् ।
गन्धर्वो अस्य रशनामगृभ्णात्सूरादश्वं वसवो निरतष्ट॥२॥
अष्टवसूंनी सूर्यदेवांपासून निर्मिती केलेल्या, तिन्ही लोकांमध्ये भ्रमण करणाऱ्या वायुदेवांनी, यमदेवांनी दिलेल्या अश्वाला आपल्या रथाला पहिल्यांदा जोडले. या रथावर इंद्रदेव पहिल्यांदा आरूढ झाले आणि गंधर्वांनी अश्वांचे लगाम आपल्या हातात पहिल्यांदा धरले ॥२॥

असि यमो अस्यादित्यो अर्वन्नसि त्रितो गुह्येन व्रतेन ।
असि सोमेन समया विपृक्त आहुस्ते त्रीणि दिवि बन्धनानि ॥३॥
हे अश्वा (अर्वन्)! तुझ्या गुप्त प्रतिज्ञांमुळे तू यम, आदित्य आणि वायु होऊन तिन्ही लोकांमध्ये उपस्थित आहेस आणि पोषण करणाऱ्या सोमरसाशी

एकरूप झाला आहेस. स्वर्गलोकात तुला तीन बंध आहेत असे म्हटले जाते. ॥३॥

(ऋक् -स्तुति करणे, यजु - बलीदान करणे, साम - सामोपचार अशी तीन बंधने)

त्रीणि त आहुर्दिवि बन्धनानि त्रीण्यप्सु त्रीण्यन्तः समुद्रे ।
उतेव मे वरुणश्छन्त्स्यर्वन्यत्रा त आहुः परमं जनित्रम् ॥४ ॥

हे अश्वा (अर्वन्)! स्वर्गलोकात, अवकाशात आणि पाण्यामध्ये अशी तुझी तीन बंधने आहेत. तुझे श्रेष्ठ जन्मस्थान कोठे आहे हे आम्हाला कथन कर ॥४ ॥

इमा ते वाजिन्नवमार्जनानीमा शफानां सनितुर्निधाना ।
अत्रा ते भद्रा रशना अपश्यमृतस्य या अभिरक्षन्ति गोपाः ॥५ ॥

हे अश्वा (वाजीन्)! तुझ्या शुद्धीकरणाने आणि हालचालीने पुनीत झालेले स्थान आम्हाला माहित आहे. तुझे शुभ्र लगाम यज्ञाचे रक्षण करणाऱ्या भक्तांकडून नियंत्रित केले जातात ॥५ ॥

आत्मानं ते मनसारादजानामवो दिवा पतयन्तं पतंगम् ।
शिरो अपश्यं पथिभिः सुगेभिररेणुभिर्जेहमानं पतत्रि॥६॥

हे अश्वा (अर्वन्)! ! पृथ्वीवरून आकाशात सूर्याच्या दिशेने जाणारा आणि धूळ रहित आरामदायी मार्गाने वेगाने जाणारा तुझा आत्मा आणि डोके वर जाताना आम्ही पाहिले आहे॥६॥

अत्रा ते रूपमुत्तममपश्यं जिगीषमाणमिष आ पदे गोः ।

यदा ते मर्तो अनु भोगमानळादिद्ग्रसिष्ठ ओषधीरजीगः॥७॥
हे अश्वा (अर्वन्)! ! यज्ञ करण्याची इच्छा असणाऱ्यांनी तुझी उत्कृष्ट प्रतिमा पाहिली आहे. यज्ञकर्ते ज्यावेळेस तुला हविष्यान्न अर्पण करतात तेव्हा तू ते ग्रहण करतोस ॥७॥

अनु त्वा रथो अनु मर्यो अर्वन्ननु गावोऽनु भगः कनीनाम्।
अनु व्रातासस्तव सख्यमीयुरनु देवा ममिरे वीर्यं ते॥८॥
मानव, मुलींचे सौभाग्य आणि गायी ज्याचे अनुसरण करतात अशा, मित्रतुल्य अश्वा (अर्वन्)! तुझ्या पराक्रमाचे वर्णन समस्त देवतांनी केले आहे ॥८॥

हिरण्यशृङ्गोऽयो अस्य पादा मनोजवा अवर इन्द्र आसीत्।
देवा इदस्य हविरद्यमायन्यो अर्वन्तं प्रथमो अध्यतिष्ठत्॥९॥
सुवर्णमय डोके असलेल्या, लोखंडासारखे सुदृढ पाय असलेल्या, मनाइतक्या वेगवान अश्वावर इंद्रदेव पहिल्यांदा आरूढ झाले. देवतांनी या अश्वाचे हविष्यान्न भक्षण केले ॥९॥

ईर्मान्तासः सिलिकमध्यमासः सं शूरणासो दिव्यासो अत्याः।
हंसा इव श्रेणिशो यतन्ते यदाक्षिषुर्दिव्यमज्ममश्वाः॥१०॥
मजबूत मांड्या आणि छाती असलेले, कटीभाग बारीक असलेले, एका ओळीत हंसां प्रमाणे सतत धावणारे अश्व स्वर्गाच्या मार्गावर जाताना दिव्यत्व प्राप्त करतात ॥१०॥

तव शरीरं पतयिष्ण्वर्वन्तव चित्तं वात इव ध्रजीमान्।

तव शृङ्गाणि विष्ठिता पुरुत्रारण्येषु जर्भुराणा चरन्ति॥११॥
हे अंतरिक्षात जाणाऱ्या अश्वा (अर्वन्) तुझे मन वाऱ्याइतके वेगवान आहे. तुझी अग्निसारखी विखुरलेली आयाळ (डोक्यावरचे केस)अरण्यात सर्वत्र पसरली आहे ॥११॥

उप प्रागाच्छसनं वाज्यर्वा देवद्रीचा मनसा दीध्यानः ।
अजः पुरो नीयते नाभिरस्यानु पश्चात्कवयो यन्ति रेभाः॥१२॥
श्रद्धापूर्वक मनाने देवतांचे मनन करणारा अश्व आपल्या प्रिय मित्रांसमवेत अजां(बकऱ्या) समवेत यज्ञवेदीच्या मध्यभागी जात आहेत.यज्ञकर्ते भक्तगण स्तोत्रांचे पठण करत त्याच्या पाठोपाठ जातात ॥१२॥

उप प्रागात्परमं यत्सधस्थमर्वाँ अच्छा पितरं मातरं च ।
अद्या देवाञ्जुष्टतमो हि गम्या अथा शास्ते दाशुषे वार्याणि ॥१३॥
चालण्यात कुशल अश्व सर्व लोक एकत्र राहू शकतील अशा स्वर्गीय ठिकाणी आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी जात आहेत. हे अश्वा ! आनंदाने देवतांकडे जाऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अपार वैभव प्रदान करावे ही विनंती ॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६४

ऋषी- दीर्घतमा औचथ्य। **देवता-**१-४१ विश्वेदेव, ४२ पूर्वार्ध वाक् उत्तरार्ध आप, ४३ पूर्वार्ध धूम उत्तरार्ध सोम,४४ अग्नी सूर्य आणि वायू , ४५ वाक् ४६-४७ सूर्य ४८ संवत्सरात्मककाळ ४९ सरस्वती५० साध्य५१ सूर्य अथवा पर्जन्य आणि अग्नी५२ सरस्वत् अथवा सूर्य

छंद- त्रिष्टुप्१२,१५,२३, २९, ३६,४१ जगती,४२ प्र स्ता र पंक्ति ५१ अनुष्टुप्

अस्य वामस्य पलितस्य होतुस्तस्य भ्राता मध्यमो अस्त्यश्नः।
तृतीयो भ्राता घृतपृष्ठो अस्यात्रापश्यं विश्पतिं सप्तपुत्रम् ॥१॥

आरोग्यासाठी उपयुक्त, जगाचे पालक असलेल्या सूर्यदेवांचे (होता) मधले भाऊ सर्वव्यापी वायुदेव आहेत. तिसरे भाऊ आहुती स्वीकारणारा तेजस्वी अग्निदेव(घृतपृष्ठ)आहेत. या भावांबरोबर, राजा (विश्वपती) सात पुत्रांसह दिसतो.॥१॥

सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा ।
त्रिनाभि चक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः॥२॥

सात अश्वांकडून किंवा सात रंगांच्या एकाच अश्वाकडून सूर्यदेवांचा रथ ओढला जातो. तीन केंद्रे किंवा अक्ष(आरे) असलेला एक चक्री रथ सतत गतिमान, अविनाशी, चपळ आणि उपयुक्त आहे. पूर्णजग या चक्रामध्ये वसले आहे. ॥२॥

इमं रथमधि ये सप्त तस्थुः सप्तचक्रं सप्त वहन्त्यश्वाः ।
सप्त स्वसारो अभि सं नवन्ते यत्र गवां निहिता सप्त नाम॥३॥
सात चाकांच्या सात अश्वांकडून ओढल्या जाणाऱ्या रथावर सूर्यदेव आरूढ आहेत. त्याप्रसंगी गायींच्या रूपातील सात बहिणी(रात्री) त्यांची स्तुती करतात ॥३॥

को ददर्श प्रथमं जायमानमस्थन्वन्तं यदनस्था बिभर्ति ।
भूम्या असुरसृगात्मा क्व स्वित्को विद्वांसमुप गात्प्रष्टुमेतत् ॥४॥
स्वतः अस्थिहीन असलेल्या अस्थियुक्त शरीरधारी प्राण्यांचे पालनपोषण करणाऱ्या त्या स्वयंभूला पहिल्यांदा कोणी पाहिले आहे? पृथ्वीमध्ये जीवन, रक्त आणि आत्मा कुठून आले? याबद्दल कोण विद्वानाकडे जाऊन हा प्रश्न विचारेल?॥४॥

पाकः पृच्छामि मनसाविजानन्देवानामेना निहिता पदानि ।
वत्से बष्कयेऽधि सप्त तन्तून्वि तत्निरे कवय ओतवा उ५॥
अपरिपक्व बुद्धी असलेले आम्ही, देवतांच्या गूढ रूपाविषयी जाणून घेण्यासाठी उत्सुकतेने विचारत आहोत. नवजात बालकाच्या शरीराला गुंडाळण्यासाठी वापरलेल्या वस्त्रासाठी ज्ञानीदेवांनी कोणते सात धागे वापरले आहेत ? ॥५॥

अचिकित्वाञ्चिकितुषश्चिदत्र कवीन्पृच्छामि विद्मने न विद्वान् ।
वि यस्तस्तम्भ षळिमा रजांस्यजस्य रूपे किमपि स्विदेकम् ॥६॥

अज्ञानी असलेले आम्ही, जाणून घेण्याच्या इच्छेने, ज्ञानी प्रजापतींना विचारतो की ज्या जन्मरहित तत्त्वाने सहालोक स्थापित केले त्याचे स्वरूप काय आहे? ॥६॥

इह ब्रवीतु य ईमङ्ग वेदास्य वामस्य निहितं पदं वेः ।
शीर्ष्णः क्षीरं दुह्रते गावो अस्य वव्रिं वसाना उदकं पदापुः ॥७॥
ज्याला या सुंदर आणि गतिमान सूर्याच्या उत्पत्तीचे स्थान आणि रहस्य माहित आहे, त्याने हे रहस्य येथे स्पष्ट करावे की या सर्वोत्तम सूर्यदेवांच्या किरणांच्या रूपातील गायी, पावसाचे पाणी दुधासारखे कसे पाडतात आणि त्या उन्हाळ्यात खूप तीव्रतेने गरम होऊन खालच्या भागातील पाणी कशा सुकवतात. ॥७॥

माता पितरमृत आ बभाज धीत्यग्रे मनसा सं हि जग्मे ।
सा बीभत्सुर्गर्भरसा निविद्धा नमस्वन्त इदुपवाकमीयुः ॥८ ॥
पृथ्वीरूपातील मातेने आकाशात स्थित असलेल्या सूर्यदेवांच्या रूपातील पित्याला आपले सर्वस्व मनोभावे अर्पण केले. गर्भधारणेची इच्छा असलेल्यांनी गर्भधारणा करून एकमेकाचा आदर करत सुंदर वचने आदान प्रदान केली॥८ ॥
(सूर्यदेवाने पृथ्वीवर पाऊस पाडून विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन केले)

युक्ता मातासीद्धुरि दक्षिणाया अतिष्ठद्गर्भो वृजनीष्वन्तः ।
अमीमेद्वत्सो अनु गामपश्यद्विश्वरूप्यं त्रिषु योजनेषु॥९॥

माता (पृथ्वी) ही सक्षम सूर्यदेवांच्या पालनपोषणाच्या क्षमतेवर आधारित आहे. गर्भरूपातील पाणी ढगांच्या मध्ये राहते. त्यानंतर, ढग, हवा आणि सूर्यकिरणांच्या सहकार्याने, पृथ्वीदेवी पिकांनी भरली जाऊन रूपवान बनली॥९॥

तिस्रो मातॄस्त्रीन्पितॄन्बिभ्रदेक ऊर्ध्वस्तस्थौ नेमव ग्लापयन्ति ।
मन्त्रयन्ते दिवो अमुष्य पृष्ठे विश्वविदं वाचमविश्वमिन्वाम्॥१०॥
तीन माता आणि तीन पिता असलेल्या ब्रह्मांडाचा निर्माता, आपल्या खांद्यावर प्रचंड ओझे घेऊन ताठ मानेने उभा आहे. या प्रचंड ओझ्याचा ब्रह्मांडाच्या निर्मात्याला कधीही कंटाळा येत नाही. अंतरिक्षातील सर्व माहिती असलेल्या ब्रह्मांडाचा निर्माता सर्वव्यापी देवतांशी संपर्क करू शकतो॥१०॥

द्वादशारं नहि तज्जराय वर्वर्ति चक्रं परि द्यामृतस्य ।
आ पुत्रा अग्ने मिथुनासो अत्र सप्त शतानि विंशतिश्च तस्थुः ॥११॥
सत्यरुपी सूर्यदेवांचे बारा आऱ्यांनी जोडलेले रथचक्र अव्याहतपणे, कधीही जीर्ण न होता आकाशाभोवती भ्रमण करत असते. हे सूर्यदेवांचे रूप असलेल्या अग्निदेवा ! या रथ चक्रावर एकत्र राहणारे सातशे-वीस मुले-मुली विराजमान आहेत ॥११॥
(रात्र आणि दिवस मुले -मुली चक्राचे तीनशे साठ अंश म्हणून सातशे-वीस)

पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् ।
अथेमे अन्य उपरे विचक्षणं सप्तचक्रे षळर आहुरर्पितम् ॥१२॥

पाच पाय असलेले आणि बारा विविध रुपांतील (बारा महीने) विपुल पर्जन्यवृष्टी करणारे सूर्यदेव जगाच्या अर्ध्या भागामध्ये वास्तव्य करतात. इतर विद्वानांच्या मतानुसार सूर्यदेव सहा आरे असलेल्या आणि या सात चाकांच्या रथावर स्वार आहेत ॥१२॥

(पाच पाय १ अयन{गट} , २ महिना, ३ ऋतू,४ शुक्ल आणि कृष्ण पक्ष, ५ दिवस आणि रात्र) (सहा ऋतु वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत और शिशिर.) (सात -अयन, महिना, ऋतू, पंधरवडा, दिवस,रात्र आणि मुहूर्त)

पञ्चारे चक्रे परिवर्तमाने तस्मिन्ना तस्थुर्भुवनानि विश्वा ।
तस्य नाक्षस्तप्यते भूरिभारः सनादेव न शीर्यते सनाभिः॥१३॥

सूर्यादेवांचे कालचक्र, ज्याचे पाच आरे आहेत, ते सतत फिरत राहते. इतक्या जगांचे भार वाहत असूनही, या चक्राचा अक्ष गरम होत नाही किंवा तुटत नाही. ॥१३॥

सनेमि चक्रमजरं वि वावृत उत्तानायां दश युक्ता वहन्ति ।
सूर्यस्य चक्षू रजसैत्यावृतं तस्मिन्नार्पिता भुवनानि विश्वा॥१४॥

एकाच अक्षाला जोडलेले, कधीही क्षय न होणारे सृष्टीचे चक्र नित्य एकाच मार्गाने फिरत असते. पाच लोकपाल आणि पाच वर्ण विशाल पृथ्वीचे नियंत्रण करतात. ढगांनी वेढलेल्या सूर्यदेवांचे नेत्र, चक्रा भोवती भ्रमण करीत असून साऱ्या विश्वाचे अस्तित्व त्या चक्रावर अवलंबून आहे . ॥१४॥

(पाच लोकपाल सूर्यदेव पूर्व दिशा रक्षक, गणपती उत्तर दिशा रक्षक, वायु पश्चिम दिशा रक्षक, अश्विनीकुमार उत्तर दिशा रक्षक, आकाश वरच्या दिशेचा रक्षक, पाच वर्ण: ब्राह्मण क्षत्रिय वैश्य निषाद शूद्र)

साकंजानां सप्तथमाहुरेकजं षळिद्यमा ऋषयो देवजा इति ।
तेषामिष्टानि विहितानि धामशः स्थात्रे रेजन्ते विकृतानि रूपशः॥१५॥
एकाच वेळी जन्मलेल्या सहा जोड्यांमध्ये राहणारे आणि सातवे हे सर्व एकाच चैतन्यातून (सूर्यदेवांपासून) जन्माला आले . हे देवत्वातून जन्मलेले ऋषी आहेत. ते सर्वजण त्यांच्या उद्देशामध्ये सक्रिय आहेत ॥१५॥
(दोन महिन्यांचा एक ऋतू सहा ऋतू आणि सात अधिक महिना)

स्त्रियः सतीस्ताँ उ मे पुंस आहुः पश्यदक्षण्वान्न वि चेतदन्धः ।
कविर्यः पुत्रः स ईमा चिकेत यस्ता विजानात्स पितुष्पितासत्॥१६॥
या स्त्रिया गर्भधारणा करण्यासाठी समर्थ आहेत. हे तथ्य ज्यांच्याकडे सूक्ष्मदृष्टी आहे असेच जाणू शकतात. दूरदृष्टी मुलाला हे अनुभवास येते. त्यामुळे तो आपल्या पित्याच्या पित्याला सुद्धा जाणू शकतो ॥१६॥

अवः परेण पर एनावरेण पदा वत्सं बिभ्रती गौरुदस्थात् ।
सा कद्रीची कं स्विदर्धं परागात्क्व स्वित्सूते नहि यूथे अन्तः॥१७॥
एका पायाने खालच्या बाजूला सृष्टीला आणि दुसऱ्या पायाने वरच्या बाजूला अंतरिक्षाला पेलून धरणारी पृथ्वीरुपी गाय उदयास आली आहे. ही गाय वासराला घेऊन कोणत्या ध्येयाकडे जात आहे? ती (सूर्यदवांच्या) कोणत्या अर्ध्या भागातून भ्रमण करीत आहे? गायींच्या कळपात न राहणारी ती गाय कुठे प्रसवते? तिचा निवास कुठे आहे ? ॥१७॥

अवः परेण पितरं यो अस्यानुवेद पर एनावरेण ।
कवीयमानः क इह प्र वोचद्देवं मनः कुतो अधि प्रजातम् ॥१८॥

जे लोक खाली असलेल्या या पृथ्वीच्या पित्याला सूर्यदेवांना आणि पृथ्वीच्या वर असलेल्या अग्निदेवांना जाणतात किंवा त्यांची पूजा करतात, ते निश्चितच ज्ञानी असतात. या रहस्याची माहिती देणारी ज्ञानी व्यक्ती कोण आहे? हे आम्हाला कोणीतरी येऊन सांगावे ॥१८॥

ये अर्वाञ्चस्ताँ उ पराच आहुर्ये पराञ्चस्ताँ उ अर्वाच आहुः ।
इन्द्रश्च या चक्रथुः सोम तानि धुरा न युक्ता रजसो वहन्ति॥१९॥
ज्यांना काळाची जाणीव आहे त्यांनी, सृष्टीचक्र जवळ येत आहे ते खूप दूर जात आहे, आणि जे खूप दूर जात आहे ते जवळ येत आहे असे अनुभवले आहे. हे सोमदेवांनो आणि इंद्रदेवांनो ! आपण चक्राच्या अक्षाला जुंपलेल्या अश्वांप्रमाणे साऱ्या विश्वाला आधार देता ॥१९॥

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परि षस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभि चाकशीति ॥२०॥
शांततेत राहणाऱ्या मित्रांप्रमाणे, दोन पक्षी (गतिमान आत्मा आणि परमात्मा) एकाच झाडावर (प्रकृती किंवा शरीर) स्थित आहेत. त्यापैकी एक (आत्मा) पिंपळाच्या झाडाची स्वादिष्ट फळे खातो. दुसरा (परमात्मा) फळे न खाता फक्त पाहत राहतो ॥२०॥

यत्रा सुपर्णा अमृतस्य भागमनिमेषं विदथाभिस्वरन्ति ।
इनो विश्वस्य भुवनस्य गोपाः स मा धीरः पाकमत्रा विवेश॥२१॥

निसर्गाच्या झाडावर बसून सर्व जगात सामावलेला आत्मा, सुख आणि दुःखाची फळे उपभोगत परमेश्वराची (परमात्म्याची) स्तुती करत असतो. जगाचा स्वामी आणि रक्षक ज्ञानमय परमेश्वर(परमात्मा) माझ्यामध्ये सुद्धा उपस्थित आहे ॥२१॥

यस्मिन्वृक्षे मध्वदः सुपर्णा निविशन्ते सुवते चाधि विश्वे ।
तस्येदाहुः पिप्पलं स्वाद्वग्रे तन्नोन्नशद्यः पितरं न वेद ॥२२॥
विश्वाच्या स्वरूपातील झाडावर जीवनाचे सार पिणारे आणि वंशवृद्धी करणारे जीव राहतात. या ज्ञानरूपी वृक्षाची फळे देखील गोड असतात. जे पितृरूपी पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराला ओळखत नाहीत, त्यांना ही फळे चाखावयास मिळत नाहीत ॥२२॥

यद्गायत्रे अधि गायत्रमाहितं त्रैष्टुभाद्वा त्रैष्टुभं निरतक्षत ।
यद्वा जगज्जगत्याहितं पदं य इत्तद्विदुस्ते अमृतत्वमानशुः ॥२३॥
पृथ्वीवर अग्नीची स्थापना कशी झाली? अंतरिक्षात वायूची स्थापना कशी झाली? आणि आकाशामध्ये सूर्यरूपी परमेश्वर कसा स्थापित झाला याचे ज्ञान असलेल्या मनुष्याला मृत्यूपासून भय नसते आणि त्याला अमरत्व लाभते. ॥२३॥
(गायत्री छंदाला अग्नि म्हणून त्रिष्टुप्छंदाला वायु म्हणून आणि जगती छंदाला सूर्यदेव म्हणून संबोधिले आहे)

गायत्रेण प्रति मिमीते अर्कमर्केण साम त्रैष्टुभेन वाकम् ।
वाकेन वाकं द्विपदा चतुष्पदाक्षरेण मिमते सप्त वाणीः॥२४॥

गायत्री छंदाच्या माध्यमातून प्राण्यांच्या उपासने संबंधी मंत्रांची निर्मिती झाली. ऋचांच्या किंवा मंत्रांच्या मदतीने समवेदाची निर्मिती झाली. त्रिष्टुप् छंदाच्या माध्यमातून यजुर्वेदाची निर्मिती झाली. द्विपदी आणि चतुष्पदी अक्षरांच्या निर्मितीतून सात प्रकारचे छंद निर्माण झाले॥२४॥

जगता सिन्धुं दिव्यस्तभायद्रथंतरे सूर्यं पर्यपश्यत् ।
गायत्रस्य समिधस्तिस्र आहुस्ततो मह्ना प्र रिरिचे महित्वा ॥२५॥

जगती नावाच्या छंदाने (सूर्यदेवांने) समुद्राच्या पाण्याची आकाशात स्थापना केली. जगाला आधार देणाऱ्या, दिव्यरथावर आरूढ झालेल्या सूर्यदेवांचे दर्शन झाले. गायत्री छंदाचे अग्नि वायु आणि सूर्य हे तीन भाग आहेत म्हणून गायत्री छंदाची महती वाढते॥२५॥

उप ह्वये सुदुघां धेनुमेतां सुहस्तो गोधुगुत दोहदेनाम् ।
श्रेष्ठं सवं सविता साविषन्नोऽभीद्धो घर्मस्तदु षु प्र वोचम् ॥२६॥

कुशल भक्ताने काढलेल्या दुधाचे आणि उत्तम दूध देणाऱ्या गायींचे आम्ही आवाहन करतो. आमच्यासाठी या दुधामध्ये सर्वोत्तम जीवनशक्ती वाढवण्यासाठी आम्ही सूर्यदेवांची प्रार्थना करतो॥२६॥

हिङ्कृण्वती वसुपत्नी वसूनां वत्समिच्छन्ती मनसाभ्यागात् ।
दुहामश्विभ्यां पयो अघ्न्येयं सा वर्धतां महते सौभगाय ॥२७ ॥

वासरांच्या वात्सल्याने हंबरणारी, मानवांना अन्न, दूध, तूप इत्यादी प्रेमाने देणारी अश्विनीकुमारांच्या कृपेने आरोग्यवर्धक दूध प्रदान करणारी संरक्षणयोग्य गाय आमच्यावर प्रसन्न होऊन आमचे ऐश्वर्य वृद्धिंगत करो ॥२७ ॥

गौरमीमेदनु वत्सं मिषन्तं मूर्धानं हिङ्ङकृणोन्मातवा उ ।
सृक्वाणं घर्ममभि वावशाना मिमाति मायुं पयते पयोभिः ॥२८॥
डोळे झाकून स्वतःच्या वासराला पाहून लटक्या रागाने त्याचे डोके चाटीत दुधाचा पान्हा फुटणारी गाय मोठ्याने आवाज करत वासराला तृप्त करते ॥२८॥

अयं स शिङ्क्ते येन गौरभीवृता मिमाति मायुं ध्वसनावधि श्रिता ।
सा चित्तिभिर्नि हि चकार मर्त्यं विद्युद्भवन्ती प्रति वव्रिमौहत ॥२९॥
भाव व्यक्त करणारे वासरू आवाज काढताच रवंथ करणारी गाय गोठ्यामध्ये हंबरते. ती गाय पशु असूनही आपल्या बुद्धीने माणसाला पराभूत करून वासराला तेजस्वी दूध देऊन आपल्या भावना प्रकट करते॥२९॥

अनच्छये तुरगातु जीवमेजद्ध्रुवं मध्य आ पस्त्यानाम् ।
जीवो मृतस्य चरति स्वधाभिरमर्त्यो मर्त्येना सयोनिः ॥३०॥
श्वासोच्छवासाच्या प्रक्रियेने अस्तित्वात असलेला जीव शरीररूपी घरातून निघून गेल्यावर शरीर गतिहीन होते. शरीरात राहणारा आत्मा अमर असतो, म्हणून अमर आत्मा, कोणत्याही अडथळ्याशिवाय सर्वत्र फिरतो. ॥३०॥

अपश्यं गोपामनिपद्यमानमा च परा च पथिभिश्चरन्तम् ।
स सध्रीचीः स विषूचीर्वसान आ वरीवर्ति भुवनेष्वन्तः ॥३१॥
आम्ही विविध मार्गाने प्रवास करणाऱ्या, न थकणाऱ्या, कधीही दु:खी न होणाऱ्या विश्वाच्या रक्षकाला (सूर्यदेवांना) पहात असतो॥३१॥

य ईं चकार न सो अस्य वेद य ईं ददर्श हिरुगिन्नु तस्मात् ।
स मातुर्योना परिवीतो अन्तर्बहुप्रजा निर्ऋतिमा विवेश ॥३२॥
ज्याने (परमेश्वराने) मनुष्य प्राण्यास जन्म दिला, त्याचे मनुष्यांना ज्ञान नाही. जो मनुष्य प्राण्यांवरती लक्ष ठेवून असतो दिसत नाही तो मातेच्या गर्भाशयात निवास करणाऱ्या वेदना भोगणाऱ्या मातेला तो भारावून टाकतो॥३२॥

द्यौर्मे पिता जनिता नाभिरत्र बन्धुर्मे माता पृथिवी महीयम् ।
उत्तानयोश्चम्वोर्योनिरन्तरत्रा पिता दुहितुर्गर्भमाधात् ॥३३॥
अंतरिक्षात असलेलेल सूर्यदेव माझे पालनपोषणकर्ते आणि जन्मदाते आहेत; आणि त्यांच्या पोटी आम्ही जन्म घेतला. विशाल पृथ्वी आमची माता आहे. आकाशाच्या दोन गोलार्धात असलेले सूर्यदेव, पृथ्वीरूपी मातेच्या गर्भामध्ये जीवन स्थापित करतात॥३३॥

पृच्छामि त्वा परमन्तं पृथिव्याः पृच्छामि यत्र भुवनस्य नाभिः ।
पृच्छामि त्वा वृष्णो अश्वस्य रेतः पृच्छामि वाचः परमं व्योम ॥३४॥
(यज्ञकर्ते विचारतात) पृथ्वीचा शेवट कुठे आहे? सर्व जगाचा मध्यबिंदू कुठे आहे? अश्वाची शक्ती कुठे आहे?वाणीचा उगम कुठे झाला ? ॥३४॥

इयं वेदिः परो अन्तः पृथिव्या अयं यज्ञो भुवनस्य नाभिः ।
अयं सोमो वृष्णो अश्वस्य रेतो ब्रह्मायं वाचः परमं व्योम ॥३५॥

ऋषी म्हणतात, “ही यज्ञाची वेदी पृथ्वीचा शेवट आहे आणि हा यज्ञच जगाचा केंद्रबिंदू आहे. यज्ञातील सोमरस हीअश्वाची शक्ती आहे, ब्रह्मदेवाचे शब्द वाणीचे मूळ स्थान आहे ॥३५॥

सप्तार्धगर्भा भुवनस्य रेतो विष्णोस्तिष्ठन्ति प्रदिशा विधर्मणि ।
ते धीतिभिर्मनसा ते विपश्चितः परिभुवः परि भवन्ति विश्वतः ॥३६॥
संपूर्ण जग, मन, आत्मा आणि पाच तत्वांच्या रूपात(अग्नि, वायु, आकाश पृथ्वी आणि जल) भौतिक जगाच्या सात पुत्रांनी निर्माण केले आहे. हे सर्व तत्व सर्वव्यापी प्रजापतीच्या सूचनेनुसार त्यांचे कर्तव्य पार पाडतात. ते त्यांच्या ज्ञानाने, विशालतेने आणि त्यांच्या संकल्पशक्तीने संपूर्ण जगाला व्यापून टाकतात.॥३६॥

न वि जानामि यदिवेदमस्मि निण्यः संनद्धो मनसा चरामि ।
यदा मागन्प्रथमजा ऋतस्यादिद्वाचो अश्नुवे भागमस्याः ॥३७ ॥
ऋषी म्हणतात ,"संपूर्ण विश्व हा माझाच आविष्कार आहे. हे गुणतत्व माझ्या मूर्खतेमुळे आणि अज्ञानाने मला कळलेच नाही. सत्याचा पहिल्यांदा अनुभव आल्यानंतर मला शब्दाचा अर्थ समजला" ॥३७ ॥

अपाङ्प्राङेति स्वधया गृभीतोऽमर्त्यो मर्त्येना सयोनिः ।
ता शश्वन्ता विषूचीना वियन्ता न्यन्यं चिक्युर्न नि चिक्युरन्यम् ॥३८॥
हा आत्मा अमर असला तरी, तो नश्वर शरीराशी बांधला गेल्यामुळे, उच्च-नीच योनिंमध्ये जन्म घेतो. मर्त्य शरीरात आत्मा येतो आणि शरीरांपासून वेगळा राहतो. हे शरीर आणि आत्मा दोन्ही, सतत एकमेकांशी संबंधित,

सहनिवासी आणि सहप्रवासी असतात. त्यापैकी एक, लोकांना दृश्यमान असतो तर दुसरा अदृश्य असतो ॥३८॥

ऋचो अक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः ।
यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥३९॥
सर्व देवतांमध्ये निवास करणाऱ्या वेदांतील ऋचा आकाशासारख्या विशाल आहेत, हे ज्याला समजले तो ज्ञानीपुरुष आनंदाने जगतो. ज्याला हे ज्ञान नाही मिळाले त्याचे जीवन व्यर्थ आहे॥३९॥

सूयवसाद्भगवती हि भूया अथो वयं भगवन्तः स्याम ।
अद्धि तृणमघ्न्ये विश्वदानीं पिब शुद्धमुदकमाचरन्ती ॥४०॥
हे सर्वत्र संचार करणाऱ्या अवध्य, पूज्य गोमाते तू सर्वोत्तम पौष्टिक शुद्ध गवत खाऊन सौभाग्य शालिनी हो आणि आम्हाला सुखी कर ही विनंती॥४०॥

गौरीर्मिमाय सलिलानि तक्षत्येकपदी द्विपदी सा चतुष्पदी ।
अष्टापदी नवपदी बभूवुषी सहस्राक्षरा परमे व्योमन् ॥४१॥
गाय (वाणी) एका अक्षराचा आवाज करते. वेळोवेळी ते एक अक्षर द्विपदि, चतुष्पदि , अष्टाअक्षरी किंवा नवाअक्षरी बनते. कधीकधी ते सहस्राक्षर बनते. गायीचे काव्यमय हंबरणे विशाल आकाशात घुमते ॥४१॥

तस्याः समुद्रा अधि वि क्षरन्ति तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः ।
ततः क्षरत्यक्षरं तद्विश्वमुप जीवति ॥४२॥

त्या वाणीच्या प्रभावामुळे सर्वत्र जलवृष्टी होऊन प्रवाह बनतात. जलप्रवाहामुळे सर्व दिशा आनंदी होतात आणि संपूर्ण जगाला "जीवन" मिळते॥४२॥

शकमयं धूममारादपश्यं विषूवता पर एनावरेण ।
उक्षाणं पृश्निमपचन्त वीरास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ॥४३॥
गायीच्या वाळलेल्या शेणातून तयार झालेल्या गोवऱ्यांच्या सर्वत्र पसरलेल्या धुरामध्ये आम्ही अग्नि पाहिला आहे. प्रत्येक शुभकार्यापूर्वी यज्ञकर्ते या अग्नीच्या साहाय्याने श्वेत सोमरस सिद्ध करतात. प्राचीन काळापासून ते, हेच काम करत आहेत॥४३॥

त्रयः केशिन ऋतुथा वि चक्षते संवत्सरे वपत एक एषाम् ।
विश्वमेको अभि चष्टे शचीभिर्ध्राजिरेकस्य ददृशे न रूपम् ॥४४ ॥
केसांसारखे किरण असलेले तीन प्राणी - अग्निदेव , आदित्यदेव आणि वायुदेव - वर्षभर वेळोवेळी पृथ्वीचे निरीक्षण करतात. पहिले अग्निदेव पृथ्वीला भाजून टाकतात . दुसरे , आदित्य (सूर्यदेव)पृथ्वीचे पोषण करतात आणि तिसऱ्या वायुदेवांना फक्त अनुभवता येते ॥४४ ॥

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ।
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥४५॥
वाणीची चाररूपे असून ती ज्ञानी ब्राह्मणांना अवगत असतात. त्यापैकी तीन रूपे परा (सूक्ष्म) पश्यन्ती (मानसिक कल्पना) मध्यमा (चिंतन) गुप्त असून, उच्चारलेली वाणी म्हणजे वैखरीरूप (बोली) हे लोकांमध्ये प्रचारात आहेत ॥४५॥

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥४६॥
इंद्रदेव, मित्रदेव, वरुणदेव आणि अग्निदेव या साऱ्या देवता एकाच परमेश्वराची विभिन्न रूपे आहेत. त्या परमेश्वराला विद्वान लोक अग्निदेव, यमदेव, मातरिश्व या विभिन्न नावाने संबोधतात॥४६॥

कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति ।
त आववृत्रन्त्सदनादृतस्यादिद्धृतेन पृथिवी व्युद्यते ॥४७॥
सुंदर गती असलेली सूर्यदेवांची किरणे, पाणी शोषून घेऊन, कृष्णवर्णीय आणि नियमितपणे फिरणाऱ्या ढगांमध्ये ते पाणी भारतात. ते पाण्याने भरलेले ढग पाण्याचा वर्षाव करून पृथ्वीचे सिंचन करतात ॥४७॥

द्वादश प्रधयश्चक्रमेकं त्रीणि नभ्यानि क उ तच्चिकेत ।
तस्मिन्त्साकं त्रिशता न शङ्कवोऽर्पिताः षष्टिर्न चलाचलासः ॥४८॥
एक चक्र, बारा धावा आणि तीन अक्ष असलेले चक्र कोणाला माहिती आहे? या चक्राला तीनशे साठ आऱ्या बसवल्या आहेत॥४८॥

यस्ते स्तनः शशयो यो मयोभूर्येन विश्वा पुष्यसि वार्याणि ।
यो रत्नधा वसुविद्यः सुदत्रः सरस्वति तमिह धातवे कः ॥४९॥
हे सरस्वतीदेवते ! आपले सुखदायक, आनंददायी, संपत्तीरक्षक, ऐश्वर्यवर्धक, स्तन (स्वरूप) जगाच्या पोषणासाठी प्रकट करावे ही विनंती ॥४९ ॥

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥५०॥
यज्ञाच्या मदतीने देवतांनी केलेली यज्ञातील पूजा धर्मातील प्रथम कर्म म्हणून ओळखले जाते. अशा यज्ञात उपस्थित असलेल्या भक्तगणांना स्वर्गलोक प्राप्त झाला ॥५०॥

समानमेतदुदकमुच्चैत्यव चाहभिः ।
भूमिं पर्जन्या जिन्वन्ति दिवं जिन्वन्त्यग्नयः ॥५१॥
एकाच स्वरूपातील पाणी, गरम वाफेच्या रूपात वर जाते आणि पर्जन्याच्या रूपात खाली येते आणि पृथ्वीदेवतेला प्रसन्न करते. स्वर्गलोकातील रहिवासी अग्निदेवांना दिलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीने प्रसन्न होतात ॥५१॥

दिव्यं सुपर्णं वायसं बृहन्तमपां गर्भं दर्शतमोषधीनाम् ।
अभीपतो वृष्टिभिस्तर्पयन्तं सरस्वन्तमवसे जोहवीमि ॥५२॥
आकाशलोकी असलेल्या, दिव्यस्वरूपी, गतिमान, तेजस्वी, जलउत्पादक, औषधांचे पोषण करणाऱ्या, पावसाच्या वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाने पृथ्वीदेवतेला तृप्त करणाऱ्या सूर्यदेवांना आम्ही आमच्या रक्षणासाठी आवाहन करतो ॥५२॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६५

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** १,२,४,६,८,१०-१२इंद्र १३-१५ मरुद्गण
छंद- त्रिष्टुप्

कया शुभा सवयसः सनीळाः समान्या मरुतः सं मिमिक्षुः ।
कया मती कुत एतास एतेऽर्चन्ति शुष्मं वृषणो वसूया॥१॥

इंद्रदेव म्हणतात, "समवयस्क, सहनिवासी, बलशाली, सर्वसामान्यांना ओळखण्यास कठीण असणारे मरुद्गण जलधारांचा वर्षाव करून पृथ्वीचे सिंचन करतात. शक्तिशाली मरुद्गण कोणत्या विचाराने प्रेरित होऊन संपत्तीच्या इच्छेने कोणती उपासना करतात?" ॥१॥

कस्य ब्रह्माणि जुजुषुर्युवानः को अध्वरे मरुत आ ववर्त ।
श्येनाँ इव ध्रजतो अन्तरिक्षे केन महा मनसा रीरमाम ॥२॥

सदैव तारुण्यात असलेले मरुद्गण कोणाचे दान स्वीकारतात ? त्यांना यज्ञासाठी कोण प्रेरित करू शकतो? गरुडासारखे आकाशात उंच भ्रमण करणाऱ्या मरुद्गणांना कोणत्या महान स्तोत्राने आपण प्रसन्न करू शकतो?॥२॥

कुतस्त्वमिन्द्र माहिनः सन्नेको यासि सत्पते किं त इत्था ।
सं पृच्छसे समराणः शुभानैर्वोचेस्तन्नो हरिवो यत्ते अस्मे॥३॥

मरुद्गण म्हणतात, " हे सज्जनांचा रक्षक, पूजनीय इंद्रदेवा आपण एकटे कुठे जात आहात? हे अश्वारूढ इंद्रदेवा आमच्या कल्याणाबद्दल आपण विचारपूस

करत असता. आपल्याला जे सांगावयाचे असेल हे ते मोकळ्या मनाने सांगावे ही विनंती."॥३॥

ब्रह्माणि मे मतयः शं सुतासः शुष्म इयर्ति प्रभृतो मे अद्रिः ।
आ शासते प्रति हर्यन्त्युक्थेमा हरी वहतस्ता नो अच्छ॥४॥
इंद्रदेव म्हणतात, "हे मरुद्गणांनो यज्ञामध्ये होणारी स्तुती, सिद्ध केलेला सोमरस, हविष्यान्नाची आहुती हे सर्व माझ्या एकट्यासाठीच आहे. यज्ञकर्त्यांनी माझी स्तुतियुक्त प्रार्थना केल्यावर माझ्या हरी नावाच्या अश्वांवर आरूढ होऊन मी शक्तिशाली वज्राने शत्रूंवर प्रहार करतो." ॥४॥

अतो वयमन्तमेभिर्युजानाः स्वक्षत्रेभिस्तन्वः शुम्भमानाः ।
महोभिरेताँ उप युज्महे न्विन्द्र स्वधामनु हि नो बभूथ ॥५॥
मरुद्गण म्हणतात," हे इंद्रदेवा !अत्यंत शक्तिशाली अश्वांनी सुसज्ज होऊन आम्ही या महान यज्ञामध्ये येण्यासाठी तयार झालो आहोत. हे इंद्रदेवा ! आमच्या समवेत राहून आमच्या शक्तीचा आपण अनुभव घ्यावा."॥५॥

क्व स्या वो मरुतः स्वधासीद्यन्मामेकं समधत्ताहिहत्ये ।
अहं ह्युग्रस्तविषस्तुविष्मान्विश्वस्य शत्रोरनमं वधस्नैः॥६॥
इंद्रदेव म्हणतात," हे मरुद्गणांनो अहि नावाच्या असुराचा एकट्याने वध केला तेव्हा माझ्यासोबत असलेली तुमची शक्ती कुठे होती? मी प्रचंड शक्तिशाली आणि बलवान योद्धा आहे. मी माझ्या शस्त्रांनी सर्व भयानक शत्रूंनाही नतमस्तक होण्यास भाग पाडले आहे॥६ ॥

भूरि चकर्थ युज्येभिरस्मे समानेभिर्वृषभ पौंस्येभिः ।
भूरीणि हि कृणवामा शविष्ठेन्द्र क्रत्वा मरुतो यद्वशाम ॥७ ॥
मरुद्गण म्हणतात," हे शक्तिशाली इंद्रदेवा ! आपण अनेक वीरोचित कर्मे केली आहेत. आम्ही मरुद्गण आपल्या इतकेच शक्तिशाली असल्याने स्वसामर्थ्याने आणि कर्तृत्वाने अनेक आपल्यापेक्षाही उत्तम पराक्रम केले आहेत ॥७ ॥

वधीं वृत्रं मरुत इन्द्रियेण स्वेन भामेन तविषो बभूवान् ।
अहमेता मनवे विश्वश्चन्द्राः सुगा अपश्चकर वज्रबाहुः॥८॥
इंद्रदेव म्हणतात," हे मरुद्गणांनो ! माझ्या स्वतःच्या शक्तीने आणि स्वक्रोधाने बलवान वृत्रासुराचा मी हातात वज्र धरून वध केला. मी मनुष्य आणि सर्व प्राण्यांसाठी आनंददायी जलप्रवाह सुरळीतपणे प्रवाहित केले आहेत ॥८॥

अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु न त्वावाँ अस्ति देवता विदानः ।
न जायमानो नशते न जातो यानि करिष्या कृणुहि प्रवृद्ध ॥९॥
मरुद्गण म्हणतात," हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! आपल्या इतका श्रीमंत आणि ज्ञानी, कोणी नाही हे आम्हाला माहीत आहे. हे महान इंद्रदेवा! तुमच्या कार्याची बरोबरी कोणीही करू शकले नाहीत आणि भविष्यातही कोणी करू शकणार नाही. ॥९॥

एकस्य चिन्मे विभ्वस्त्वोजो या नु दधृष्वान्कृणवै मनीषा ।
अहं ह्युग्रो मरुतो विदानो यानि च्यवमिन्द्र इदीश एषाम्॥१०॥

इंद्रदेव म्हणतात," हे मरुद्गणांनो ! मी माझी सर्व कामे पूर्ण एकाग्रतेने करतो म्हणून माझी कीर्ती सर्वत्र पसरली आहे. माझ्या दिव्य पराक्रमाने मी ज्याच्याकडे जातो त्याच्या सर्वस्वाचा स्वामी बनतो." ॥१०॥

अमन्दन्मा मरुतः स्तोमो अत्र यन्मे नरः श्रुत्यं ब्रह्म चक्र ।
इन्द्राय वृष्णे सुमखाय मह्यं सख्ये सखायस्तन्वे तनूभिः॥११॥
इंद्रदेव म्हणतात," मंद आणि सौम्य स्वरूपातील (अमन्दन्मा)मरुद्गणांनो !आपण माझ्यासाठी रचलेल्या स्तुतियोग्य स्तोत्रांनी मला अभूतपूर्व आनंद झाला आहे. ही माझी स्तोत्रे, तेजस्वी शक्तीने यज्ञ करणाऱ्या भक्तांचे सामर्थ्य आणि ज्ञान वृद्धिंगत करतात"॥११॥

एवेदेते प्रति मा रोचमाना अनेद्यः श्रव एषो दधानाः ।
संञ्चक्ष्या मरुतश्चन्द्रवर्णा अच्छान्त मे छदयाथा च नूनम्॥१२॥
इंद्रदेव म्हणतात," हे अमर्याद कीर्ती असलेल्या,अन्नाच्या सुखाचा उपभोग घेणाऱ्या, सोन्यासारख्या तेजस्वी मरुद्गणांनो! माझ्यावर (इंद्रावर) प्रेमाचा वर्षाव करून माझी कीर्ति सर्वत्र वृद्धिंगत करा" ॥१२॥

को न्वत्र मरुतो मामहे वः प्र यातन सखींरँच्छा सखायः ।
मन्मानि चित्रा अपिवातयन्त एषां भूत नवेदा म ऋतानाम्॥१३॥
अगस्त्य ऋषी म्हणतात, " हे मरुद्गणांनो! तुमची पूजा करणाऱ्या, मित्रतुल्य, हितचिंतक मित्राकडे जा. माझ्या उपदेश पूर्ण स्तोत्रांचे हेतू समजावून सांगा आणि त्यांच्यासाठी तुम्ही संपत्ती मिळवा॥१३॥

आ यद्दुवस्याद्दुवसे न कारुरस्माञ्चक्रे मान्यस्य मेधा ।
ओ षु वर्त्त मरुतो विप्रमच्छेमा ब्रह्माणि जरिता वो अर्चत्॥१४॥

हे मरुद्गणांनो ! स्तोत्रांद्वारे आपली स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांची बुद्धी तेजस्वी करावी. तुमच्या प्रीत्यर्थ स्तोत्रांची रचना करणाऱ्या भक्तांकडे आपण लवकर जाऊन त्यांना आशीर्वाद द्यावा ॥१४॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।
एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥१५॥

हे मरुद्गणांनो ! आम्हा भक्तगणांची ही तेजस्वी स्तोत्रे आपल्यासाठीच रचली आहेत. आमच्या स्तोत्रांद्वारे केलेल्या प्रार्थना ऐकून शरीराला पोषक असलेले, वृद्धत्वावर विजय मिळवण्यासाठी आवश्यक असलेले अन्न बल आणि जयशाली संपत्ती आम्हाला प्रदान करावी ही विनंती ॥१५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६६

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** मरुद्गण **छंद-** १-१३ जगती १४-१५ त्रिष्टुप्

तन्नु वोचाम रभसाय जन्मने पूर्वं महित्वं वृषभस्य केतवे ।
ऐधेव यामन्मरुतस्तुविष्वणो युधेव शक्रास्तविषाणि कर्तन॥१॥
हे गर्जना करणाऱ्या, पर्जन्यवृष्टी करणाऱ्या, युद्धकुशल मरुद्गणांनो ! आपण यज्ञस्थळी येताच प्रज्वलित होणाऱ्या अग्निदेवांचे, युद्धात शत्रूंचा पराभव करणाऱ्या आपल्या प्राचीन पराक्रमाचे वर्णन आम्ही करत आहोत ॥१॥

नित्यं न सूनुं मधु बिभ्रत उप क्रीळन्ति क्रीळा विदथेषु घृष्वयः ।
नक्षन्ति रुद्रा अवसा नमस्विनं न मर्धन्ति स्वतवसो हविष्कृतम् ॥२॥
युद्धामध्ये शत्रूंचा विनाश करणारे, बालकांसारखे आनंदात क्रीडा करणारे मरुद्गण, वडील ज्याप्रेमाने मुलाचे रक्षण करतात त्याचप्रमाणे भक्तगणांचे रक्षण करतात. मरुद्गण यज्ञकर्त्याला कोणताही त्रास देत नाहीत ॥२॥

यस्मा ऊमासो अमृता अरासत रायस्पोषं च हविषा ददाशुषे ।
उक्षन्त्यस्मै मरुतो हिता इव पुरू रजांसि पयसा मयोभुवः॥३॥
यज्ञकर्त्या भक्तांनी हविष्यान्नाची आहुती दिल्याने प्रसन्न होणारे, सर्वांचे रक्षण करणारे , अमर मरुद्गण, आपल्या भक्तांना विपुल प्रमाणात संपत्ती प्रदान करतात. त्या यज्ञकर्त्यांचे मित्र, मरुद्गण मुबलक पाण्याने सिंचन करून सुपीक भूमीला आनंद देतात. ॥३॥

आ ये रजांसि तविषीभिरव्यत प्र व एवासः स्वयतासो अध्रजन् ।
भयन्ते विश्वा भुवनानि हर्म्या चित्रो वो यामः प्रयतास्वृष्टिषु॥४॥
स्वयंचलित अश्वांच्या सहाय्याने भ्रमण करणाऱ्या, हे गतिमान मरुद्गणांनो ! हातात शस्त्र धरलेल्या आपल्या युद्धातील दर्शनामुळे समस्त जग, तसेच मोठमोठे राजे भीतीने थरथर कापतात. आपल्या हालचाली खरोखरच आश्चर्यकारक आहेत ॥४॥

यत्त्वेषयामा नदयन्त पर्वतान्दिवो वा पृष्ठं नर्या अचुच्यवुः ।
विश्वो वो अज्मन्भयते वनस्पती रथीयन्तीव प्र जिहीत ओषधिः ॥५॥
गतिमान मरुद्गणांनो ! जेव्हा आपण पर्वत आणि गुहा ढासळवता किंवा मानवजातीच्या कल्याणासाठी पर्वत शिखरांवर चढता, तेव्हा सृष्टीतील सर्व वनस्पती आणि औषधे रथात बसलेल्या महिलांप्रमाणे अस्वस्थ होतात ॥५॥

यूयं न उग्रा मरुतः सुचेतुनारिष्टग्रामाः सुमतिं पिपर्तन ।
यत्रा वो दिद्युद्रदति क्रिविर्दती रिणाति पश्वः सुधितेव बर्हणा ॥६॥
हे विशाल, शक्तिसंपन्न मरुद्गणांनो ! आपण आपल्या बलवान हातात शस्त्रे धारण करून शत्रु आणि त्यांच्या क्रूर प्राण्यांचाही नाश करता, त्यावेळी आम्हा भक्तांवर आपण उदात्त भावनेने दया करावी आणि आम्हास सुबुद्धी द्यावी ही विनंती ॥६॥

प्र स्कम्भदेष्णा अनवभ्रराधसोऽलातृणासो विदथेषु सुष्टुताः ।
अर्चन्त्यर्कं मदिरस्य पीतये विदुर्वीरस्य प्रथमानि पौंस्या ॥७॥

इंद्रदेवांचा पराक्रम जाणणारे, दानशूर, अविनाशी संपत्ती असलेले ,सर्व शत्रूंचा नाश करणारे, यज्ञांमध्ये स्तुती केलेले मरुद्गण, सोमरस प्राशन करण्याकरिता पूज्य इंद्रदेवांची पूजा करतात ॥७॥

शतभुजिभिस्तमभिह्रुतेरघात्पूर्भी रक्षता मरुतो यमावत ।
जनं यमुग्रास्तवसो विरप्शिनः पाथना शंसात्तनयस्य पुष्टिषु ॥८॥
हे पराक्रमी आणि प्रतिष्ठित मरुद्गणांनो ! ज्या भक्तगणांना आपण विनाशकारी पापांपासून आणि निंदेपासून वाचवले, त्यांना संरक्षण देत अभेद्य शहरात त्यांच्या पुत्र-पौत्रांचे उत्तम तऱ्हेने पालन पोषण करण्यासाठी योग्य बनवावे ही विनंती ॥८॥

विश्वानि भद्रा मरुतो रथेषु वो मिथस्पृध्येव तविषाण्याहिता ।
अंसेष्वा वः प्रपथेषु खादयोऽक्षो वश्चक्रा समया वि वावृते॥९॥
हे वीर मरुद्गणांनो ! आपल्या रथावर सर्व कल्याणकारी वस्तु ठेवल्या आहेत. आपल्या बाहूंवर परस्परांशी स्पर्धा करणारी शक्तिशाली शस्त्रे आहेत. सर्व विश्रांतीस्थळांवर आपल्यासाठी पर्याप्त अन्न आहे आणि आपल्या रथाची चाके विना अडथळा फिरत आहेत ॥९॥

भूरीणि भद्रा नर्येषु बाहुषु वक्षस्सु रुक्मा रभसासो अञ्जयः ।
अंसेष्वेताः पविषु क्षुरा अधि वयो न पक्षान्व्यनु श्रियो धिरे॥१०॥
मानवांचे कल्याण करणाऱ्या, तेजस्वी पंख असणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे वीर मरुद्गणांच्या हातावर दैदिप्यमान अलंकार आहेत. त्यांच्या वक्षस्थळावर चमकदार लखलखीत सुवर्णालंकार असून त्यांनी वज्रासारखी धारदार आयुधे धारण केली आहेत ॥१०॥

महान्तो मह्ना विभ्वो विभूतयो दूरेदृशो ये दिव्या इव स्तृभिः ।
मन्द्राः सुजिह्वाः स्वरितार आसभिः सम्मिश्ला इन्द्रे मरुतः परिष्टुभः॥११॥
महान, तेजस्वी, अफाट ऐश्वर्य असलेले, आकाशातील ताऱ्यांसारखे दूरवरून चमकणारे, आनंदी, मधुर वाणी असलेले, स्तुतीने भरलेले आणि इंद्रदेवांचे सहाय्यक असलेले मरुद्गण आमच्या यज्ञात सहभागी व्हावेत ही विनंती. ॥११॥

तद्वः सुजाता मरुतो महित्वनं दीर्घं वो दात्रमदितेरिव व्रतम् ।
इन्द्रश्चन त्यजसा वि ह्रुणाति तज्जनाय यस्मै सुकृते अराध्वम् ॥१२॥
हे कुलीन कुटुंबात जन्मलेल्या वीर मरुद्गणांनो ! आपले अक्षय्य आणि कल्याणकारी औदार्य, व्रतस्थ अदितीदेवतांच्या औदार्या प्रमाणे सर्वज्ञात आहे. आपले कृपाछत्र प्राप्त झालेल्या भक्तगणांची संपत्ती इंद्रदेव सुद्धा हिरावून घेऊ शकत नाही ॥१२॥

तद्वो जामित्वं मरुतः परे युगे पुरू यच्छंसममृतास आवत ।
अया धिया मनवे श्रुष्टिमाव्या साकं नरो दंसनैरा चिकित्रिरे॥१३॥
यज्ञकर्त्या भक्तांच्या स्तोत्रांचे श्रवण करून त्यांचे रक्षण करणाऱ्या हे मरुद्गणांनो ! आपल्या बंधुत्वाची कीर्ती सर्वत्र पसरली आहे. यापुढेही भक्तगणांचे संरक्षण करून त्यांचे नेतृत्व करावे ही विनंती ॥१३॥

येन दीर्घं मरुतः शूशवाम युष्माकेन परीणसा तुरासः ।
आ यत्ततनन्वृजने जनास एभिर्यज्ञेभिस्तदभीष्टिमश्याम्॥१४॥

हे गतिमान, शूर मरुद्गणांनो ! आमच्या या यज्ञकार्यामुळे आम्हावर प्रसन्न होऊन आपण आम्हाला सर्व शक्ती प्राप्त करावीआणि आम्हाला युद्धात विजय मिळो असा आशीर्वाद द्यावा ही विंनती ॥१४॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।
एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥१५॥

हे मरुद्गणांनो ! आम्ही रचलेली ही सर्व स्तोत्रे आपल्यासाठीच आहेत. यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या प्रार्थना श्रवण करून आम्हा भक्तगणांना अन्न, बल आणि विजयश्री प्रदान करावी ही विनंती ॥१५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६७

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**-१ इंद्र २-११ मरुद्गण **छंद-** त्रिष्टुप्

सहस्रं त इन्द्रोतयो नः सहस्रमिषो हरिवो गूर्ततमाः ।
सहस्रं रायो मादयध्यै सहस्रिण उप नो यन्तु वाजाः॥१॥
हे अश्वयुक्त इंद्रदेवा ! आपल्याकडे असलेली हजारो प्रकारची संरक्षण उपकरणे आमच्या रक्षणासाठी उपलब्ध करून द्यावीत ही विनंती. हे इंद्रदेवा आपल्याकडे असलेले हजारो प्रकारचे अन्न, धन आणि पशु आम्हाला आपण प्रदान करावेत ही विनंती ॥१॥

आ नोऽवोभिर्मरुतो यान्त्वच्छा ज्येष्ठेभिर्वा बृहद्दिवैः सुमायाः ।
अध यदेषां नियुतः परमाः समुद्रस्य चिद्धनयन्त पारे॥२॥
हे अत्यंत कुशल, बुद्धिमान आणि शूर मरुद्गणांनो ! आपल्या "नियुत" नावाच्या उत्कृष्ट अश्वांच्या साहाय्याने समुद्रापलीकडे असलेली संपत्ती घेऊन आणि सर्व संरक्षणाच्या साधनासह आमचे संरक्षण करण्याकरता यावे ही विनंती ॥२॥

मिम्यक्ष येषु सुधिता घृताची हिरण्यनिर्णिगुपरा न ऋष्टिः ।
गुहा चरन्ती मनुषो न योषा सभावती विदथ्येव सं वाक् ॥३॥
विजेप्रमाणे सुवर्णवस्त्र परिधान केलेल्या, जलधारांचा वर्षाव करणाऱ्या ढगांप्रमाणे मरुद्गण सदैव एकत्र संचार करतात. पतीच्या पाठोपाठ जाणाऱ्या

एकनिष्ठ पत्नीप्रमाणे त्यांचा संचार गुप्त असला तरी यज्ञस्थळी त्यांचे स्वरूप विद्वानांच्या भाषणासारखे सुस्पष्ट असते ॥३॥

परा शुभ्रा अयासो यव्या साधारण्येव मरुतो मिमिक्षुः ।
न रोदसी अप नुदन्त घोरा जुषन्त वृधं सख्याय देवाः॥४॥
ज्याप्रमाणे तरुण पुरुष स्त्रियांना भेटतात, त्याचप्रमाणे सुंदर अलंकारांनी सजलेले महान आणि चपळ मरुद्गण विजेच्या सोबत असतात. सर्वांशी मैत्री ठेवणारे महान मरुद्गण देवतांसाठी आकाशात आणि भक्तांसाठी पृथ्वीवर कुठलाही भेदभाव न करता मुसळधार पर्जन्यवृष्टी करतात ॥४॥

जोषद्यदीमसुर्या सचध्यै विषितस्तुका रोदसी नृमणाः ।
आ सूर्येव विधतो रथं गात्त्वेषप्रतीका नभसो नेत्या ॥५ ॥
केस अस्ताव्यस्त झालेली, लोकांचे हित साधणारी पत्नी मरुद्गणांची सेवा करते. ज्याप्रमाणे सूर्यकन्या अश्विनीकुमारांच्या रथावर स्वार झाली, त्याचप्रमाणे तेजस्वी शरीर असलेली मरुद्गणांची पत्नी मरुद्गणांच्या रथावर आरूढ होते ॥५ ॥

आस्थापयन्त युवतिं युवानः शुभे निमिश्लां विदथेषु पज्राम् ।
अर्को यद्वो मरुतो हविष्मान्गायद्गाथं सुतसोमो दुवस्यन् ॥६ ॥
हे चिरतरुण मरुद्गणांनो ! हविष्यान्नाची आहुती आणि सोमरस सिद्ध करून सन्मान प्राप्त यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासाठी स्तोत्रांचे पठण करू लागताच आपल्या विजेसारख्या तेजस्वी नवयौवना पत्नी समवेत रथात बसून आपण यज्ञस्थळी येता.॥६ ॥

प्र तं विवक्मि वक्म्यो य एषां मरुतां महिमा सत्यो अस्ति ।
सचा यदीं वृषमणा अहंयुः स्थिरा चिज्जनीर्वहते सुभागाः॥७ ॥
आम्ही भक्तगण मरुद्गणांच्या सत्य आणि प्रशंसनीय माहात्म्याचे वर्णन करत आहोत. मरुद्गणांच्या माहात्म्यामुळे अहंकारी सौभाग्यशालिनी पृथ्वीदेवता त्यांची अनुयायी होते आणि मनुष्यप्राण्यांवर कृपा करते ॥७ ॥

पान्ति मित्रावरुणाववद्याच्चयत ईमर्यमो अप्रशस्तान् ।
उत च्यवन्ते अच्युता ध्रुवाणि वावृध ईं मरुतो दातिवारः॥८॥
हे मरुद्गणांनो ! मित्रदेव, वरुणदेव, अर्यमा या देवता निंदनीय दोषांचा आणि अयोग्य गोष्टींचा नाश करून या यज्ञाचे रक्षण करतात. हे मरुद्गणांनो ! आपल्या कृपेमुळे आकाशातील ढगांमध्ये जलवृष्टीकारक स्थिर असलेले पाणी योग्य वेळी खाली पडू लागते. आपण दिलेले वरदान सतत वृद्धिंगत होत असते ॥८॥

नही नु वो मरुतो अन्त्यस्मे आरात्ताच्चिच्छवसो अन्तमापुः ।
ते धृष्णुना शवसा शूशुवांसोऽर्णो न द्वेषो धृषता परि ष्ठुः॥९॥
हे मरुद्गणांनो ! आपल्या सामर्थ्याची व्याप्ती कोणत्याही मनुष्याला ज्ञात झाली नाही. आपली शक्ती शत्रूच्या सैन्याला पाण्यासारखी चहूबाजूंनी वेढते आणि त्यांचा नाश करते. ॥९॥

वयमद्येन्द्रस्य प्रेष्ठा वयं श्वो वोचेमहि समर्ये ।
वयं पुरा महि च नो अनु द्यून्तन्न ऋभुक्षा नरामनु ष्यात् ॥१०॥

पुरातन काळापासून आम्ही भक्तगण इंद्रदेवांच्या महानतेची स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत आलो आहोत. वर्तमान काळात आणि भविष्यकाळात सुद्धा पठण करणार आहोत. हे इंद्रदेवा आपण आमच्यावर प्रसन्न व्हावे ही विनंती॥१०॥

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।
एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥११॥

हे आनंदी आणि सन्माननीय मरुद्गणांनो ! या स्तोत्रांचे पठण आपल्यासाठीच केले जात आहे. आम्हा स्तुती करणाऱ्या भक्तगणांची स्तोत्रे श्रवण करून आम्हाला अन्न, तूप, शक्ती आणि विजय मिळवून देणारी संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६८

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**-मरुद्गण **छंद**-जगती ८-१० त्रिष्टुप्

यज्ञायज्ञा वः समना तुतुर्वणिर्धियंधियं वो देवया उ दधिध्वे ।
आ वोऽर्वाचः सुविताय रोदस्योर्महे ववृत्यामवसे सुवृक्तिभिः ॥१॥
हे मरुद्गणांनो ! आपल्या उत्तम संवादामुळे प्रत्येक यज्ञ लवकर पूर्ण होतो. आपले विचार नेहमीच देवत्व निर्देशित असतात. आकाशदेवता आणि पृथ्वीदेवतेच्या स्थिरतेसाठी आणि संरक्षणासाठी आम्ही आपल्याला सर्वोत्तम स्तोत्रांच्या पठणाने यज्ञस्थळी येण्याचे आवाहन करतो ॥१॥

वव्रासो न ये स्वजाः स्वतवस इषं स्वरभिजायन्त धूतयः ।
सहस्रियासो अपां नोर्मय आसा गावो वन्द्यासो नोक्षणः ॥२॥
पाण्याच्या लाटांप्रमाणे किंवा पूजनीय दुभत्या गायींच्या प्रमाणे भक्तगणांवर कृपेचा वर्षाव करणारे, सौंदर्यसंपन्न, स्वयंभू आणि कंपनशील मरुद्गण आम्हा भक्तगणांना पौष्टिक अन्न प्रदान करण्यासाठी प्रकट झाले आहेत ॥२॥

सोमासो न ये सुतास्तृप्तांशवो हृत्सु पीतासो दुवसो नासते ।
ऐषामंसेषु रम्भिणीव रारभे हस्तेषु खादिश्च कृतिश्च सं दधे॥३॥
ज्याप्रमाणे सिद्ध केलेला किंवा न सिद्ध केलेला सोमरस भक्तगणांना तृप्त करतो त्याचप्रमाणे मरुद्गण आपल्या भक्तगणांना प्रसन्न करतात. मरुद्गणांच्या

हातात सुशोभित तलवारी आणि अंगाखांद्यावर, सुंदर मोहक स्त्रियांप्रमाणे (रम्भिण) शस्त्रे विराजमान असतात ॥३॥

अव स्वयुक्ता दिव आ वृथा ययुरमर्त्याः कशया चोदत त्मना ।
अरेणवस्तुविजाता अचुच्यवुर्दूळ्हानि चिन्मरुतो भ्राजदृष्टयः ॥४॥
एकमेकांशी एकरूप होणाऱ्या, तेजोमय आयुधांनी सुसज्ज असलेल्या, धनवान, निष्पाप बलवान शत्रूंना पराभूत करणाऱ्या हे मरुद्गणांनो ! स्वर्ग लोकातून यज्ञस्थळी येऊन आम्हा भक्तांना प्रेरित करावे ही विनंती ॥४॥

को वोऽन्तर्मरुत ऋष्टिविद्युतो रेजति त्मना हन्वेव जिह्वया ।
धन्वच्युत इषां न यामनि पुरुप्रैषा अहन्यो नैतशः ॥५ ॥
पाऊस पाडणाऱ्या ढगांप्रमाणे फिरणाऱ्या किंवा अन्नासाठी फिरणाऱ्या भक्त-गणांप्रमाणे हे विद्युतशस्त्रधारी मरुद्गणांनो! ज्याप्रमाणे जीभ जबड्यावर नियंत्रण ठेवते त्याप्रमाणे आपल्यावर कोण नियंत्रण ठेवतो ते आम्हाला सांगावे ॥५ ॥

क्व स्विदस्य रजसो महस्परं क्वावरं मरुतो यस्मिन्नायय ।
यच्च्यावयथ विथुरेव संहितं व्यद्रिणा पतथ त्वेषमर्णवम् ॥६ ॥
हे मरुद्गणांनो ! आपण विजेच्या साहाय्याने ढगांना विदीर्ण करून ढगांतील जल गवतासारखे पृथ्वीवर पसरवता. त्या प्रचंड जलवृष्टीचा आरंभ आणि शेवट कुठे आहे ते आम्हा भक्तगणांना सांगावे ही विनंती ॥६ ॥

सातिर्न वोऽमवती स्वर्वती त्वेषा विपाका मरुतः पिपिष्वती ।
भद्रा वो रातिः पृणतो न दक्षिणा पृथुज्रयी असुर्येव जञ्जती ॥७॥

हे मरुद्गणांनो ! आपण भक्तगणांना देत असलेले दान, आपल्या संपत्ती इतकेच प्रशंसनीय आहे. आपले दान शक्तिशाली, आनंददायी, तेजस्वी, विशेष फलदायी, तात्काळ परिणामकारक, शत्रूचा नाश करणारे आणि हितकारक आहे. ॥७॥

प्रति ष्टोभन्ति सिन्धवः पविभ्यो यदभ्रियां वाचमुदीरयन्ति ।
अव स्मयन्त विद्युतः पृथिव्यां यदी घृतं मरुतः प्रुष्णुवन्ति ॥८॥
मेघगर्जनेने मरुद्गण जलवृष्टी करताच पृथ्वीवरील नद्या दुथडी वाहू लागतात आणि पृथ्वीवर विजा चमकूं लागतात ॥८॥

असूत पृश्निर्महते रणाय त्वेषमयासां मरुतामनीकम् ।
ते सप्सरासोऽजनयन्ताभ्वमादित्स्वधामिषिरां पर्यपश्यन् ॥९॥
पृश्निदेवतेने एका महान संग्रामासाठी वेगवान मरुद्गणांचे मजबूत आणि तेजस्वी सैन्य अस्तित्वात आणले. त्यानंतर, सर्वांनी अन्न उत्पादन आणि धारण क्षमता वृद्धिंगत झाल्याचा अनुभव घेतला ॥९॥
('पृश्नि' या शब्दाचे संस्कृतमध्ये अनेक अर्थ आहेत, ज्यात ठिपकेदार गाय, किरण आणि पाणी यांचा समावेश आहे, याव्यतिरिक्त, 'पृष्णी' हे भगवान कृष्णाची आई देवकीचे नाव आहे)

एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।
एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥१०॥
हे आनंदी आणि सन्माननीय मरुद्गणांनो ! या स्तोत्रांचे पठण आपल्यासाठीच केले जात आहे. आम्हा स्तुती करणाऱ्या भक्तगणांची स्तोत्रे श्रवण करून आम्हाला अन्न, तूप, शक्ती आणि विजय मिळवून देणारी संपत्ती प्रदान करावी ही विनंती ॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१६९

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता-** इंद्र **छंद**- त्रिष्टुप्, २ -चतुष्पदाविराट्

महश्चित्त्वमिन्द्र यत एतान्महश्चिदसि त्यजसो वरूता ।
स नो वेधो मरुतां चिकित्वान्त्सुम्ना वनुष्व तव हि प्रेष्ठा ॥१॥
महान देवतांचे आणि मरुद्गणांचे रक्षण करणाऱ्या इंद्रदेवा ! आपण निश्चितच महान आहात. मरुद्गणांना आणि आम्हाला परिचित असलेल्या हे इंद्रदेवा ! आमच्यावर अनुग्रह करून आम्हाला सुख प्रदान करावे ही विनंती ॥१॥

अयुज्रन्त इन्द्र विश्वकृष्टीर्विदानासो निष्षिधो मर्त्यत्रा ।
मरुतां पृत्सुतिर्हासमाना स्वर्मीळ्हस्य प्रधनस्य सातौ ॥२॥
हे इंद्रदेवा ! विद्वान मरुद्गणांचे शत्रूंना दूर हाकलून लावणारे सैन्य युद्धामध्ये आनंदाने आपल्याला सहकार्य करते आणि मनुष्यांच्या कल्याणासाठी पर्जन्यवृष्टी करते ॥२॥

अम्यक्सा त इन्द्र ऋष्टिरस्मे सनेम्यभ्वं मरुतो जुनन्ति ।
अग्निश्चिद्धि ष्मातसे शुशुक्वानापो न द्वीपं दधति प्रयांसि ॥३॥
हे इंद्रदेवा ! आपल्या हातातील विशेष आयुध म्हणजे वज्र आमच्यासाठी ढगांवर फेका म्हणजे मरुद्गण,ज्याप्रमाणे यज्ञासाठी अग्नि प्रज्वलित होतो किंवा पाणी एखाद्या बेटाला वेढून टाकते, त्याप्रमाणे ढगातील पाणी मुक्त करतील ॥३॥

त्वं तू न इन्द्र तं रयिं दा ओजिष्ठया दक्षिणयेव रातिम् ।
स्तुतश्च यास्ते चकनन्त वायोः स्तनं न मध्वः पीपयन्त वाजैः ॥४॥
हे दानशूर इंद्रदेवा ! आम्ही भक्तगण ज्या प्रमाणे यज्ञातील पुरोहिताला दक्षिणा देऊन प्रसन्न करतो, त्या प्रमाणे आम्ही आपल्याला जलद वरदान देणाऱ्या स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न करत आहोत. शिशूंच्या वाढीसाठी अन्नाने पोषण केलेल्या स्त्रीच्या स्तनाप्रमाणे आम्हाला संपत्ती प्रदान करून आमचे पोषण करावे ही विनंती ॥४॥

त्वे राय इन्द्र तोशतमाः प्रणेतारः कस्य चिदृतायोः ।
ते षु णो मरुतो मृळयन्तु ये स्मा पुरा गातूयन्तीव देवाः ॥५॥
हे इंद्रदेवा ! आपल्याकडे असलेल्या संपत्तीमुळे यज्ञ करणारे संतुष्ट होऊन यज्ञकार्य पूर्ण करतात. हे इंद्रदेवा ! प्राचीन काळापासून यज्ञाची पुण्यकर्मे करणारे मरुद्गण आम्हाला सुख आणि सौभाग्य देवोत ही विनंती. ॥५॥

प्रति प्र याहीन्द्र मीळ्हुषो नॄन्महः पार्थिवे सदने यतस्व ।
अध यदेषां पृथुबुध्नास एतास्तीर्थे नार्यः पौंस्यानि तस्थुः ॥६॥
हे इंद्रदेवा ! मोठ्या प्रमाणात वृष्टि करण्यासाठी मार्ग दाखवणाऱ्या मरुद्गणांकडे आपण जावे आणि त्यांच्यासोबत आपला पराक्रम दाखवावा ही विनंती. युद्धात पराक्रम दाखवल्याप्रमाणे मरुद्गणांचे अश्व ढगांवर हल्ला करतात. ॥६॥

प्रति घोराणामेतानामयासां मरुतां शृण्व आयतामुपब्दिः ।
ये मर्त्यं पृतनायन्तमूमैऋणावानं न पतयन्त सर्गैः ॥७॥

हे इंद्रदेवा ! कर्जबाजारी मनुष्याला ज्याप्रमाणे शिक्षा दिली जाते, त्याचप्रमाणे युद्ध करणाऱ्या शत्रूंना हरवणाऱ्या आपल्या भयानक वेगाने चालणाऱ्या शत्रूंची संपत्ती हिसकावून घेणाऱ्या मरुद्गणांचा आवाज ऐकू येत आहे ॥७॥

त्वं मानेभ्य इन्द्र विश्वजन्या रदा मरुद्भिः शुरुधो गोअग्राः ।
स्तवानेभिः स्तवसे देव देवैर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥८ ॥

हे विश्वनिर्मिती करणाऱ्या वैभवशाली इंद्रदेवा ! आपण दुःखाचा नाश करणाऱ्या जलयुक्त ढगांना विदीर्ण करावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! स्तुतिपात्र देवतांस आम्ही आपली प्रार्थना करतो. आम्हाला आपल्या कृपेने अन्न, बल आणि विजयश्री मिळू दे ही विनंती ॥८ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७०

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता-** इंद्र **छंद**- १ बृहती २-४ अनुष्टुप् ५- त्रिष्टुप्

न नूनमस्ति नो श्वः कस्तद्वेद यदद्भुतम् ।
अन्यस्य चित्तमभि संचरेण्यमुताधीतं वि नश्यति॥१॥
इंद्रदेव म्हणतात, "आज दिसणाऱ्या सर्व गोष्टी क्षणभंगुर आहेत. त्यांचा नंतर ठाव ठिकाणाही नसेल. जे काम कधी झाले नाही त्याला कोण जाणणार."॥१॥

किं न इन्द्र जिघांससि भ्रातरो मरुतस्तव ।
तेभिः कल्पस्व साधुया मा नः समरणे वधीः॥२ ॥
अगस्त्य ऋषी म्हणतात, " हे इंद्रदेवा आपण माझा वध का करू इच्छिता? मरुद्गण आपले बंधू असून आपण त्यांच्याबरोबर यज्ञस्थळी जाऊन यज्ञातील आपल्या वाट्याचा आनंद घ्यावा. आम्हाला युद्धामध्ये ठार मारू नका."॥२ ॥

किं नो भ्रातरगस्त्य सखा सन्नति मन्यसे ।
विद्मा हि ते यथा मनोऽस्मभ्यमिन्न दित्ससि॥३॥
इंद्रदेव म्हणाले, " अगस्त्यऋषी आमचे मित्र असूनही, तुम्ही अपमान का करत आहात. तुमच्या मनात किती लोभ आहे हे मला चांगलेच माहिती आहे. तुम्ही यज्ञामधील अर्पणातील भाग का देऊ इच्छित नाही?." ॥३॥

अरं कृण्वन्तु वेदिं समग्निमिन्धतां पुरः ।
तत्रामृतस्य चेतनं यज्ञं ते तनवावहै ॥४॥

इंद्रदेव म्हणाले, "हे अगस्त्यऋषी यज्ञकर्त्यांनी अलंकृत केलेल्या यज्ञवेदीमध्ये तुम्ही अग्नि प्रज्वलित करून अमरत्वाच्या प्राप्तीसाठी यज्ञ पुरा करा." ॥४॥

त्वमीशिषे वसुपते वसूनां त्वं मित्राणां मित्रपते धेष्ठः ।
इन्द्र त्वं मरुद्भिः सं वदस्वाध प्राशान ऋतुथा हवींषि॥५ ॥
अगस्त्यऋषि म्हणाले, " धनाचे स्वामी, मित्रांचे मित्र, सर्वांचे स्वामी आणि सर्वांचे आश्रयस्थान, हे इंद्रदेवा ! आपण मरुद्गणांना सांगा की आमचा यज्ञ पूर्ण झाला आहे. योग्य वेळी येऊन त्यांनी आम्ही अर्पण केलेले हविष्यान्न ग्रहण करावे " ॥५ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७१

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता-** १-२ मरुद्गण ३-६ इंद्र आणि मरुद्गण **छंद-** त्रिष्टुप्

प्रति व एना नमसाहमेमि सूक्तेन भिक्षे सुमतिं तुराणाम् ।
रराणता मरुतो वेद्याभिर्नि हेळो धत्त वि मुचध्वमश्वान्॥१॥

हे गतिशील मरुद्गणांनो ! आम्ही नम्रपणे स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत, आपल्यासारख्या वीरांकडून दयेची याचना करत आहोत. आमच्या स्तोत्राच्या पठणाने आपले मन प्रसन्न करून, सर्व वैर विसरून आपल्या अश्वांना रथा पासून मोकळे करावे ही विनंती ॥१॥

एष वः स्तोमो मरुतो नमस्वान्हृदा तष्टो मनसा धायि देवाः ।
उपेमा यात मनसा जुषाणा यूयं हि ष्ठा नमस इद्वृधासः॥२॥

हे तेजस्वी मरुद्गणांनो ! विनम्रभावाने आणि एकाग्रमनाने आपल्यासाठी रचलेली ही स्तोत्रे ध्यानपूर्वक श्रवण करावीत आणि आपण आमच्या जवळ विराजमान व्हावे ही विनंती. आपणच यज्ञातील हविष्यान्न वाढवणारे आहात. ॥२॥

स्तुतासो नो मरुतो मृळयन्तूत स्तुतो मघवा शम्भविष्ठः ।
ऊर्ध्वा नः सन्तु कोम्या वनान्यहानि विश्वा मरुतो जिगीषा॥३॥

स्तुतियुक्त स्तोत्रांच्यां श्रवणाने प्रसन्न होऊन हे मरुद्गणांनो! आम्हाला आनंद आणि सौभाग्य प्रदान करावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! आमच्या या स्तुतीने

प्रसन्न होऊन आम्हाला आनंद प्रदान करावा ही विनंती. हे मरुद्गणांनो ! आपण आमचे उर्वरित आयुष्य विपुल सुखसमृद्धीने भरून टाकावे ही विनंती ॥३॥

अस्मादहं तविषादीषमाण इन्द्राद्भिया मरुतो रेजमानः ।
युष्मभ्यं हव्या निशितान्यासन्तान्यारे चकृमा मृळता नः॥४॥
हे मरुद्गणांनो ! आम्ही या शक्तिशाली इंद्रदेवांच्या भीतीने घाबरलो आहोत; आणि त्यामुळे थरथर कापत आहोत. आपल्यासाठी सिद्ध केलेले हविष्यान्न यज्ञवेदीच्याच्या बाजूला ठेवले आहे. कृपया आमच्यावर न रागावता आम्हाला सुखी करावे ही विनंती ॥४॥

येन मानासश्चितयन्त उस्रा व्युष्टिषु शवसा शश्वतीनाम् ।
स नो मरुद्भिर्वृषभ श्रवो धा उग्र उग्रेभिः स्थविरः सहोदाः ॥५॥
हे इंद्रदेवा ! आपल्या शक्तीने आणि क्षमतेमुळे उषादेवतेची किरणे सर्वत्र प्रकाश पसरवतात आणि सर्व प्राण्यांना जागृत करतात. हे शक्तिशाली इंद्रदेवा ! बलवानांमध्ये सर्वोत्तम मरुद्गणांच्या सहाय्याने आम्हाला आपण अन्न प्रदान करावे ही विनंती ॥५॥

त्वं पाहीन्द्र सहीयसो नृन्भवा मरुद्भिरवयातहेळाः ।
सुप्रकेतेभिः सासहिर्दधानो विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥६॥
हे शत्रूंना मारणाऱ्या, नेत्यांचे रक्षण करणाऱ्या, क्रोधापासून मुक्त असलेल्या हे इंद्रदेवा ! आपण मरुद्गणांसह निवास करता आणि शत्रूंचा नाश करता. आमच्यावर कृपा करून आम्हाला अन्न शक्ती आणि दीर्घ आयुष्य मिळो ही विनंती ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७२

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**मरुद्गण **छंद-**गायत्री

चित्रो वोऽस्तु यामश्चित्र ऊती सुदानवः ।
मरुतो अहिभानवः॥१॥

हे सर्वोत्तम, दानशूर, अक्षय्यतेजाने संपन्न मरुद्गणांनो ! आमच्या यज्ञस्थळी आश्चर्यकारकपणे प्रकट होऊन आमचे संरक्षण करावे ही विनंती ॥१॥

आरे सा वः सुदानवो मरुत ऋञ्जती शरुः ।
आरे अश्मा यमस्यथ॥२॥

हे उदार आणि कृपाळू मरुद्गणांनो ! आपली यशस्वी, तेजस्वी आणि हिंसक शत्रूंवर फेकलेली दगडी शस्त्रे आमच्यापासून दूर राहोत ही विनंती ॥२॥

तृणस्कन्दस्य नु विशः परि वृङ्क्त सुदानवः ।
ऊर्ध्वान्नः कर्त जीवसे ॥३॥

हे श्रेष्ठ, दानशूर मरुद्गणांनो ! आपल्या सामर्थ्यापुढे गवतासारखे (तृणवत) तुच्छ असलेल्या आमच्या पुत्र -पौत्रांना अधोगतीच्या मार्गापासून मुक्त करून त्यांचे जीवनमान उंचवावे आणि त्यांना दीर्घायुषी करावे ही विनंती ॥३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७३

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** त्रिष्टुप्

गायत्साम नभन्यं यथा वेरर्चाम तद्वावृधानं स्वर्वत् ।
गावो धेनवो बर्हिष्यदब्धा आ यत्सद्मानं दिव्यं विवासान्॥१॥

दुभत्या गायींकडून सेवा मिळणाऱ्या, यज्ञामध्ये विराजमान असलेल्या हे इंद्रदेवा ! आकाशात घुमणारे त्रैलोक्यात पसरणारे आपले आवडते सामगायन करून आम्ही यज्ञकर्ते आपली सेवा करत आहोत ॥१॥

अर्चद्वृषा वृषभिः स्वेदुहव्यैर्मृगो नाश्नो अति यज्जुगुर्यात् ।
प्र मन्दयुर्मनां गूर्त होता भरते मर्यो मिथुना यजत्रः॥२॥

तहानलेल्या हरीणाप्रमाणे हविष्यान्नाची इच्छा बाळगणारे बलवान इंद्रदेव यज्ञकर्त्यांच्या यज्ञामध्ये येतात. हे पराक्रमी इंद्रदेवा ! सर्व देवांची स्तुती करणारे यज्ञकर्ते सहकुटुंब आपले यज्ञकर्म यशस्वीरीत्या पूर्ण करतात ॥२॥

नक्षद्धोता परि सद्म मिता यन्भरद्गर्भमा शरदः पृथिव्याः ।
क्रन्ददश्वो नयमानो रुवद्गौरन्तर्दूतो न रोदसी चरद्वाक्॥३ ॥

यज्ञकार्य करण्यासाठी सर्व स्थाने व्यापणारे, आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते मध्ये दूतासारखे भ्रमण करणारे अग्निदेव, इंद्रदेवांसाठी आम्हा यज्ञकर्त्यांच्या हविष्यान्नाची आहुती स्वीकारतात आणि अश्वांप्रमाणे खिंकाळत आणि बैलांप्रमाणे गर्जना करत इंद्रदेवांपर्यंत घेऊन जातात ॥३ ॥

ता कर्माषतरास्मै प्र च्यौत्नानि देवयन्तो भरन्ते ।
जुजोषदिन्द्रो दस्मवर्चा नासत्येव सुग्म्यो रथेष्ठाः॥४॥
आम्ही देवभक्त यज्ञकर्ते स्तोत्रांची रचना करत इंद्रदेवांसाठी हविष्यान्नाच्या नैवद्याची सिद्धता करत आहोत. अश्विनीकुमारांसारखे तेजस्वी, सुंदर आणि सहज उपलब्ध असलेल्या रथावर आरूढ झालेले इंद्रदेव आमच्या स्तोत्रांचे श्रवण करोत ॥४॥

तमु ष्टुहीन्द्रं यो ह सत्वा यः शूरो मघवा यो रथेष्ठाः ।
प्रतीचश्चिद्योधीयान्वृषण्वान्ववव्रुषश्चित्तमसो विहन्ता॥५॥
हे यज्ञकर्त्यांनो ! प्रबल शत्रूंशी युद्ध करणाऱ्या, शूर, श्रीमंत, उत्तम सारथ्य करणाऱ्या, सर्वोत्तम, वज्रधारी आणि अंध:काराचा नाश करणाऱ्या इंद्रदेवांची(मघवा) स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने पूजा करावी ॥५॥

प्र यदित्था महिना नृभ्यो अस्त्यरं रोदसी कक्ष्ये नास्मै ।
सं विव्य इन्द्रो वृजनं न भूमा भर्ति स्वधावाँ ओपशमिव द्याम्॥६ ॥
आपल्या बलसामर्थ्याने आणि महानतेमुळे यज्ञकर्त्यांचे स्वामी इंद्रदेव, संपूर्ण पृथ्वी आणि आकाश व्यापून टाकतात. आपल्या डोक्यावर लीलया शिंगे धारण करणाऱ्या बैलाप्रमाणे इंद्रदेव आकाशलोक आणि पृथ्वीलोक आपल्या शिरावर धारण करतात ॥६॥

समत्सु त्वा शूर सतामुराणं प्रपथिन्तमं परितंसयध्यै ।
सजोषस इन्द्रं मदे क्षोणीः सूरिं चिद्ये अनुमदन्ति वाजैः॥७॥

हे इंद्रदेवा ! युद्धामध्ये जे भक्तगण आपला आश्रय घेतात आणि मरुद्गणासह आहुतीने आपल्याला प्रसन्न करतात त्यांना शक्ती देऊन आणि मार्गदर्शन करून आपण त्यांना आनंदित करता ॥७॥

एवा हि ते शं सवना समुद्र आपो यत्त आसु मदन्ति देवीः ।
विश्वा ते अनु जोष्या भूद्गौः सूरींश्चिद्यदि धिषा वेषि जनान्॥८॥
जेव्हा समुद्र आणि सर्व भूमीवर जलवृष्टि करण्यासाठी सोमयज्ञामध्ये इंद्रदेवांची स्तुती केली जाते तेव्हा ते यज्ञ आनंददायी असतात. जेव्हा ज्ञानी भक्तगण इंद्रदेवांची मनःपूर्वक प्रार्थना करतात, तेव्हा प्रसन्न झालेले इंद्रदेव त्यांना इच्छित फळे देतात. ॥८॥

असाम यथा सुषखाय एन स्वभिष्टयो नरां न शंसैः ।
असद्यथा न इन्द्रो वन्दनेष्टास्तुरो न कर्म नयमान उक्था॥९ ॥
हे इंद्रदेवा ! राजाची स्तुती करणाऱ्या प्रजाजनांप्रमाणे, आपली स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करणाऱ्या, आपले मित्र होण्याची इच्छा बाळगणाऱ्या भक्तगणांच्या सर्व इच्छित ध्येये पूर्ण करावी ही विनंती. हे इंद्रदेवा ! कृपया आमच्या प्रार्थना श्रवण करून आम्हाला लवकरात लवकर आमचे कर्तव्य पार पाडण्याची शक्ती द्यावी ही विनंती. ॥९॥

विष्पर्धसो नरां न शंसैरस्माकासदिन्द्रो वज्रहस्तः ।
मित्रायुवो न पूर्पतिं सुशिष्टौ मध्यायुव उप शिक्षन्ति यज्ञैः ॥१०॥
ज्याप्रमाणे शत्रूंची स्तुती करून सामोपचाराने मैत्री केली जाते, त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण वज्रधारी इंद्रदेवांना आपला मित्र बनवतो. ज्याप्रमाणे

मित्र बनू इच्छिणारे लोक नगराच्या योग्य शासकाची पूजा करतात, त्याप्रमाणे संपत्ती आणि कीर्ती मिळवण्यासाठी आम्ही इंद्रदेवांची पूजा करतो ॥१०॥

यज्ञो हि ष्मेन्द्रं कश्चिदृन्धञ्जुहुराणश्चिन्मनसा परियन् ।
तीर्थे नाच्छा तातृषाणमोको दीर्घो न सिध्रमा कृणोत्यध्वा॥११॥
ज्याप्रमाणे तहानलेला माणूस स्वच्छ पाणी पाहून प्रसन्न होतो, त्याप्रमाणे प्रत्येक यज्ञविधी इंद्रदेवांना प्रसन्न करतो. वाईट हेतु आणि श्रद्धा नसलेला मनुष्य इंद्रदेवांपासून दूर जातो ॥११॥

मो षू ण इन्द्रात्र पृत्सु देवैरस्ति हि ष्मा ते शुष्मिन्नवयाः ।
महश्चिद्यस्य मीळ्हुषो यव्या हविष्मतो मरुतो वन्दते गीः॥१२॥
महान युद्धामध्ये मरुद्गणांबरोबर फिरणाऱ्या हे शक्तिशाली इंद्रदेवा! आम्हाला टाकून जाऊ नका. यज्ञामधील आपला हविष्यान्नाचा वाटा वेगळा ठेवला आहे. त्याचा आपण स्वीकार करावा ही विनंती ॥१२॥

एष स्तोम इन्द्र तुभ्यमस्मे एतेन गातुं हरिवो विदो नः ।
आ नो ववृत्याः सुविताय देव विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥१३॥
हे अश्वसंपन्न, देवस्वरूप इंद्रदेवा ! आम्ही पठण करत असलेली ही सर्व स्तोत्रे आपल्यासाठीच आहेत. या स्तोत्रांच्या भावना ओळखून आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य प्रदान करावे ही विनंती ॥१३॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७४

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** त्रिष्टुप्

त्वं राजेन्द्र ये च देवा रक्षा नृन्पाह्यसुर त्वमस्मान् ।
त्वं सत्पतिर्मघवा नस्तरुत्रस्त्वं सत्यो वसवानः सहोदाः॥१॥
हे इंद्रदेवा ! आपण विश्वाचे अधिपती आहात. दैवीशक्तीच्या मदतीने आपण मानवाचे रक्षण करता. आपण सज्जनांचे, वीरांचे रक्षणकर्ते आहात. आपण सत्याचे वाहक, सर्वांचे आश्रयदाते आणि शक्ती देणारे आहात ॥१॥

दनो विश इन्द्र मृध्रवाचः सप्त यत्पुरः शर्म शारदीर्दर्त् ।
ऋणोरपो अनवद्यार्णा यूने वृत्रं पुरुकुत्साय रन्धीः ॥२॥
हे इंद्रदेवा! आपण शरदऋतूतील वस्तीसाठी योग्य असलेल्या शत्रूंच्या सात शहरांचा नाश केलात त्याच वेळी आपण कठोर भाषा बोलणाऱ्या शत्रू सैनिकांचाही नाश केलात. हे आनंददायी इंद्रदेवा ! तरुण "पुरुकुत्स" राजाच्या कल्याणासाठी वृत्रासुराचा वध करून जलधारा प्रवाहित केल्या ॥२॥

अजा वृत इन्द्र शूरपत्नीर्द्यां च येभिः पुरुहूत नूनम् ।
रक्षो अग्निमशुषं तूर्वयाणं सिंहो न दमे अपांसि वस्तोः॥३ ॥
अनेकांनी स्तुती केलेल्या हे इंद्रदेवा ! आपण मरुद्गणांसारख्या अनुयायांसह चालून जाऊन शत्रूंची अभेद्य शहरे जिंकता. अरण्यातील सिंहाप्रमाणे रौद्ररूप

धारण करून आपण चंचल आणि प्रज्वलित अग्नीचे रक्षण करावे ही विनंती ॥३ ॥

शेषन्नु त इन्द्र सस्मिन्योनौ प्रशस्तये पवीरवस्य मह्ना ।
सृजदर्णांस्यव यद्युधा गास्तिष्ठद्धरी धृषता मृष्ट वाजान् ॥४॥
हे इंद्रदेवा ! आपला गौरव वाढवण्यासाठीच वज्राच्या प्रहाराने आपले शत्रू धारातीर्थी पडले. आपण शस्त्रे धारण करून अश्वांनी ओढलेल्या रथावर आरूढ होऊन शत्रूंनी अडवलेल्या जलवाहिन्या प्रवाहित केल्यात आणि अन्नधान्य वाढवलेत ॥४॥

वह कुत्समिन्द्र यस्मिञ्चाकन्त्स्यूमन्यू ऋज्रा वातस्याश्वा ।
प्र सूरश्चक्रं वृहतादभीकेऽभि स्पृधो यासिषद्वज्रबाहुः॥५॥
हे इंद्रदेवा ! कुत्सऋषींच्या यज्ञातील हविष्यान्न भक्षण करण्याच्या इच्छेच्या पूर्तीसाठी आपले सरळ मार्गी, वायूच्या गतीने धावणारे अश्व आपल्या रथाला जोडावे ही विनंती. सूर्यदेव आपल्या रथाचे चक्र यज्ञस्थळी आणून देवोत आणि इंद्रदेव हातात वज्र धारण करून शत्रू सैन्याला सामोरे जावोत ॥५॥

.

जघन्वाँ इन्द्र मित्रेरूञ्चोदप्रवृद्धो हरिवो अदाशून् ।
प्र ये पश्यन्नर्यमणं सचायोस्त्वया शूर्ता वहमाना अपत्यम् ॥६॥
हे अश्वांचे स्वामी इंद्रदेवा! आपण मोठ्या उत्साहाने आपल्या मित्रांचे शत्रू आणि यज्ञकर्म न करणाऱ्या दुष्टांचा वध केला. हे इंद्रदेवा ! आपल्याला हविष्यान्नाची आहुती देणाऱ्यांना संतुष्ट करत संतती आणि शौर्य द्यावे ही विनंती ॥६॥

रपत्कविरिन्द्रार्कसातौ क्षां दासायोपबर्हणीं कः ।
करत्तिस्रो मघवा दानुचित्रा नि दुर्योणे कुयवाचं मृधि श्रेत् ॥७॥
हे इंद्रदेवा ! ऋषींनी आपली स्तुती केल्यानंतर आपण दासांचा (शत्रूंचा) वध केला आणि शत्रूंना पृथ्वीच्या मातीवर लोळवले. हे इंद्रदेवा ! आपण राजा दुर्योणीच्या कल्याणासाठी कुयवाच असुराचा वध करून खडकाळ, सपाट, आणि जलमय अशा तीन प्रकारच्या भूमीला अन्न, संपत्ती आणि आनंददायी गोष्टींनी सजविले ॥७॥

सना ता त इन्द्र नव्या आगुः सहो नभोऽविरणाय पूर्वीः ।
भिनत्पुरो न भिदो अदेवीर्ननमो वधरदेवस्य पीयोः॥८॥
हे इंद्रदेवा ! आपली जुन्या काळातील शौर्यपूर्ण कृत्यांची स्तुति ऋषि करत आहेत. आपण युद्ध थांबवण्यासाठी आसुरी शक्तींना दाबले आणि आपल्या पराक्रमाने असुरांच्या अभेद्य शक्तींचा आणि शत्रूंच्या शहरांचा नाश केला. आपण हिंसक शत्रूंच्या शस्त्रांची तीक्ष्णता कमकुवत केली ॥८॥

त्वं धुनिरिन्द्र धुनिमतीऋणोरपः सीरा न स्रवन्तीः ।
प्र यत्समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति॥९॥
हे इंद्रदेवा ! आपण शत्रूंना भयभीत करणारे आहात . आपण वाहत्या नद्यांप्रमाणे पाण्याचे अमर्याद भांडार उघडले आहे. समुद्राला विपुलप्रमाणात जलयुक्त करून यदु आणि तुर्वसुचे रक्षण केले ॥९॥
(तुर्वसु हा देवयानी आणि ययातीचा दुसरा मुलगा आणि यदुचा धाकटा भाऊ होता.)

त्वमस्माकमिन्द्र विश्वध स्या अवृकतमो नरां नृपाता ।

स नो विश्वासां स्पृधां सहोदा विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥१०॥

हे इंद्रदेवा! आपण नेहमीच आमच्यासारख्या प्रामाणिक प्रजेचे सर्वोत्तम रक्षक आहात . आपण आमच्या सैन्याची क्षमता वाढवावी, जेणे करून अन्न, संपत्ती आणि दीर्घायुष्य मिळेल ॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७५

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** १ बृहती, २-५ अनुष्टुप् ; ६त्रिष्टुप्

मत्स्यपायि ते महः पात्रस्येव हरिवो मत्सरो मदः।
वृषा ते वृष्ण इन्दुर्वाजी सहस्रसातमः॥१ ॥

हे अश्वयुक्त इंद्रदेवा ! अत्यंत हितकारक, श्रेष्ठ, आनंद वाढवणारा, बलवर्धक, शक्तिशाली सोमरस ठेवल्या बरोबर आपण प्राशन करता आणि आनंदित होता म्हणून आम्ही यज्ञकर्ते आपणास सोमरस अर्पण करत आहोत ॥१ ॥

आ नस्ते गन्तु मत्सरो वृषा मदो वरेण्यः ।
सहावाँ इन्द्र सानसिः पृतनाषाळमर्त्यः॥२॥

हे इंद्रदेवा ! आपल्यासाठी सिद्ध केलेला, हर्षवर्धक, बलवर्धक, शक्तिशाली सामर्थ्ययुक्त शत्रुशक्तींचा नाश करणारा आणि अविनाशी सोमरस आपण प्राशन करावा ही विनंती ॥२॥

त्वं हि शूरः सनिता चोदयो मनुषो रथम् ।
सहावान्दस्युमव्रतमोषः पात्रं न शोचिषा॥३॥

हे वीर आणि परोपकारी इंद्रदेवा ! आपण आपल्या भक्तगणांच्या इच्छांना चांगल्या प्रकारे प्रेरणा देता. प्रज्वलित अग्निमध्ये टाकलेल्या जळणाऱ्या पात्रा प्रमाणे आपण अनैतिकांचा नाश करावा ही विनंती ॥३॥

मुषाय सूर्यं कवे चक्रमीशान ओजसा ।
वह शुष्णाय वधं कुत्सं वातस्याश्वैः॥४॥
स्वतःच्या सामर्थ्याने सूर्यदेवांच्या रथाच्या चाकाचे हरण करणाऱ्या, तीव्र बुद्धी असलेल्या, हे शक्तिशाली इंद्रदेवा ! शुष्णासुराचा वध करण्यासाठी हातात वज्र धरुन वायूच्या वेगाने धावणाऱ्या अश्वांच्या मदतीने आपण कुत्सऋषींच्या जवळ जावे ही विनंती ॥४॥

शुष्मिन्तमो हि ते मदो द्युम्निन्तम उत क्रतुः ।
वृत्रघ्ना वरिवोविदा मंसीष्ठा अश्वसातमः॥५॥
हे इंद्रदेवा ! आपली प्रसन्नता सर्वांना शक्ती देते. आपल्या उदात्त कर्मामुळे मुबलक प्रमाणात अन्न मिळते. अश्वदान करणाऱ्या हे इंद्रदेवा ! आपण, वृत्रासुराचा वध करणारी तसेच ऐश्वर्य देणारी शस्त्रे आम्हाला प्रदान करावीत ही विनंती . ॥५॥

यथा पूर्वेभ्यो जरितृभ्य इन्द्र मय इवापो न तृष्यते बभूथ ।
तामनु त्वा निविदं जोहवीमि विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥६॥
हे इंद्रदेवा! ज्या प्रमाणे तहानलेल्या व्यक्तीला शीतल जलाने आनंद होतो, त्या प्रमाणे आपण प्राचीन ऋषींना आनंद आणि प्रेम देणारे म्हणून ओळखले जाता. म्हणूनच आम्ही आपली स्तुती करतो त्यामुळे आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य मिळते ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७६

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** अनुष्टुप् ; ६त्रिष्टुप्

मत्सि नो वस्यइष्टय इन्द्रमिन्दो वृषा विश ।
ऋघायमाण इन्वसि शत्रुमन्ति न विन्दसि॥१॥

हे शत्रु नाशक, दैवीशक्तीने व्यापून टाकणाऱ्या, दुर्गुणी शत्रूंना जवळ न येऊ देणाऱ्या हे सोमदेवा ! आपण इंद्रदेवांच्या शरीरात प्रवेश करून आणि इंद्रदेवांना प्रसन्न करून आम्हाला विपुल धन प्राप्ती करून द्यावी ही विनंती ॥१॥

तस्मिन्ना वेशया गिरो य एकश्चर्षणीनाम् ।
अनु स्वधा यमुप्यते यवं न चर्कृषद्वृषा॥२॥

सर्व प्राण्यांचे एक मात्र आश्रयस्थान असलेल्या इंद्रदेवांना यज्ञकर्ते भक्तगण हविष्यान्नाचा नैवेद्य दाखवतात. ज्याप्रमाणे शेतकरी जव कापतो, त्याप्रमाणे शत्रूंचा नाश करणाऱ्या शक्तिशाली इंद्रदेवांची आम्ही प्रार्थना करतो .॥२॥

यस्य विश्वानि हस्तयोः पञ्च क्षितीनां वसु ।
स्पाशयस्व यो अस्मध्रुग्दिव्येवाशनिर्जहि॥३॥

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि निषाद या पाच प्रकारच्या लोकांना सर्व प्रकारचे अन्न प्रदान करणाऱ्या हे इंद्रदेवा ! आमच्या विश्वासघाती शत्रूंना विजेसारख्या वज्राने नष्ट करावे ही विनंती ॥३॥

असुन्वन्तं समं जहि दूणाशं यो न ते मयः ।
अस्मभ्यमस्य वेदनं दद्धि सूरिश्चिदोहते॥४ ॥
हे इंद्रदेवा ! आपल्यासाठी सोमरस सिद्ध न करणाऱ्या, दुष्कर्म करणाऱ्या आणि ज्यांच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण आहे अशा लोकांचा आपण संहार करून त्यांची संपत्ती आपल्या भक्तगणांना प्रदान करावी ही विनंती ॥४ ॥

आवो यस्य द्विबर्हसोऽर्केषु सानुषगसत् । आजाविन्द्रस्येन्दो प्रावो वाजेषु वाजिनम् ॥५॥
हे सोमदेवा ! आपण स्तोत्रांच्या पठणाच्या वेळी नेहमी उपस्थित राहून यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करत आला आहात. हे इंद्रदेवांचे रक्षण करणाऱ्या सोमदेवा! धनप्राप्तीसाठी केलेल्या युद्धामध्ये यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती ॥५॥

यथा पूर्वेभ्यो जरितृभ्य इन्द्र मय इवापो न तृष्यते बभूथ ।
तामनु त्वा निविदं जोहवीमि विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥६॥
हे इंद्रदेवा !आपण ज्याप्रमाणे तहानलेल्यांना पाणी दिलेत आणि दुःखी मनुष्यांना आनंद दिलात त्याचप्रमाणे आपली प्रार्थना करणाऱ्या प्राचीन भक्तांना सुखदायी आणि आनंददायी आशीर्वाद दिला आहे. आपल्या कृपेने आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य मिळो ही विनंती. ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७७

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** त्रिष्टुप् ;

आ चर्षणिप्रा वृषभो जनानां राजा कृष्टीनां पुरुहूत इन्द्रः ।
स्तुतः श्रवस्यन्नवसोप मद्रिग्युक्त्वा हरी वृषणा याह्यर्वाङ्॥१॥
मनुष्यमात्रांची कामना पूर्ण करणाऱ्या, शक्तिशाली पुरुषांचे अधिपति असणाऱ्या, हविष्यान्नाची इच्छा बाळगणाऱ्या हे इंद्रदेवा ! रथाला जोडलेल्या बलवान अश्वांसह आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥१॥

ये ते वृषणो वृषभास इन्द्र ब्रह्मयुजो वृषरथासो अत्याः ।
ताँ आ तिष्ठ तेभिरा याह्यर्वाङ्हवामहे त्वा सुत इन्द्र सोमे॥२॥
हे इंद्रदेवा ! बलवान, शक्तिशाली, नुसत्या संकेताने जोडल्या जाणारे अश्व आपल्या रथाला जोडून, त्या रथावर आरूढ होऊन, आमच्या यज्ञात सिद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी येण्याचे आम्ही आवाहन करत आहोत ॥२॥

आ तिष्ठ रथं वृषणं वृषा ते सुतः सोमः परिषिक्ता मधूनि ।
युक्त्वा वृषभ्यां वृषभ क्षितीनां हरिभ्यां याहि प्रवतोप मद्रिक्॥३॥
हे कामना पूर्ण करणाऱ्या इंद्रदेवा ! आपले बलशाली अश्व रथाला जोडून त्यावर आरूढ होऊन आपल्यासाठी सिद्ध केलेल्या मधुर पदार्थ मिसळलेल्या

सोमरसाचे प्राशन करण्यास आपल्या यज्ञकर्त्या भक्तांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥३॥

अयं यज्ञो देवया अयं मियेध इमा ब्रह्माण्ययमिन्द्र सोमः ।
स्तीर्णं बर्हिरा तु शक्र प्र याहि पिबा निषद्य वि मुचा हरी इह॥४ ॥
हे बलवान इंद्रदेवा ! देवांना अर्पण करण्यासाठी असलेले हे यज्ञीय पशु, हा सिद्ध केलेला सोमरस आणि पसरलेले दर्भासन आपल्यासाठीच आहेत. हे शतक्रतु ! आपल्या अश्वांना मोकळे करून, सोमरस प्राशन करण्यासाठी दर्भासनावर आसनस्थ व्हावे ही विनंती ॥४ ॥

ओ सुष्टुत इन्द्र याह्यर्वाङुप ब्रह्माणि मान्यस्य कारोः ।
विद्याम वस्तोरवसा गृणन्तो विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥५॥
हे इंद्रदेवा ! आमच्या स्तुतियुक्त स्तोत्राच्या मंत्रांचा स्वीकार करावा आणि आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. दररोज स्तुतीस्तोत्रांचे पठण करून आपली स्तुती करणाऱ्या भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण कराव्यात, त्यांना संपत्ती, शक्ती आणि दीर्घायुष्य प्राप्त करावे ही विनंती ॥५॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७८

ऋषी- अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता -**इंद्र **छंद-** त्रिष्टुप् ;

यद्ध स्या त इन्द्र श्रुष्टिरस्ति यया बभूथ जरितृभ्य ऊती ।
मा नः कामं महयन्तमा धग्विश्वा ते अश्यां पर्याप आयोः॥१ ॥
हे इंद्रदेवा ! आपल्या भक्तांचे रक्षण करणारी सुख-समृद्धी आपण आम्हाला प्रदान करावी आणि आम्हाला महान बनवण्याची आपली इच्छा समाप्त करू नये ही विनंती ॥१॥

न घा राजेन्द्र आ दभन्नो या नु स्वसारा कृणवन्त योनौ ।
आपश्चिदस्मै सुतुका अवेषन्गमन्न इन्द्रः सख्या वयश्च ॥२॥
एकमेकांचे भाऊ-बहिण असलेल्या रात्र आणि दिवस ह्यांनी केलेल्या यज्ञकार्याचे राजा इंद्रदेव नष्ट न करता त्याचे रक्षण करोत ही विनंती. हविष्यान्न देणाऱ्या भक्तगणांना इंद्रदेव मैत्री आणि सर्वोत्तम पौष्टिक अन्न देवोत ही विनंती ॥२॥

जेता नृभिरिन्द्रः पृत्सु शूरः श्रोता हवं नाधमानस्य कारोः ।
प्रभर्ता रथं दाशुष उपाक उद्यन्ता गिरो यदि च त्मना भूत्॥३॥
लष्करी शक्तीच्या मदतीने युद्धात विजयी होणारे इंद्रदेव, संकटात असलेल्या भक्तांची हाक ऐकून आपला रथ थांबवतात. इंद्रदेव भक्तीने प्रार्थना करणाऱ्या भक्तांची साधना वृद्धिंगत करतात॥३॥

एवा नृभिरिन्द्रः सुश्रवस्या प्रखादः पृक्षो अभि मित्रिणो भूत् ।
समर्य इषः स्तवते विवाचि सत्राकरो यजमानस्य शंसः॥४॥
शांत, यशस्वी इंद्रदेव, मनुष्यांशी मैत्रीपूर्ण वागत असलेल्या यज्ञकर्त्या भक्तांच्या आहुती स्वीकारतात. स्तोत्र व प्रार्थनांचा पूर्ण प्रतिसाद देणारे, यजमानांचे शुभचिंतक इंद्रदेव युद्धामध्ये आपल्या मित्रांचे संरक्षण करतात.॥४॥

त्वया वयं मघवन्निन्द्र शत्रूनभि ष्याम महतो मन्यमानान् ।
त्वं त्राता त्वमु नो वृधे भूर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥५ ॥
हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! आम्ही आपल्या सहकार्याने मोठमोठे अहंकारी शत्रू देखील पराभूत करू. आपण आमचे रक्षक आणि पालनकर्ते व्हावे आणि आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य मिळावे ही विनंती ॥५ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१७९

ऋषी- १-२ लोपा मुद्रा३-४ अगस्त्य५-६ अगस्त्य शिष्य **देवता -**रति **छंद-** त्रिष्टुप्, ५-बृहती

पूर्वीरहं शरदः शश्रमाणा दोषा वस्तोरुषसो जरयन्तीः ।
मिनाति श्रियं जरिमा तनूनामप्यू नु पत्नीर्वृषणो जगम्युः ॥१॥

देवी लोपामुद्रा म्हणते, "हे अगस्त्यऋषि ! गेली अनेक वर्षं मी प्रत्येक दिवशी, रात्रंदिवस आपली सेवा करण्याची कठोर तपश्चर्या करत आहे. आता वार्धक्यामुळे माझ्या गात्रांचे सौंदर्य नष्ट होऊ लागले आहे. तरीही अशा अवस्थेत आपल्यासारख्या वीर्यवान पुरुषांनी माझ्यासारख्या स्त्रीकडे संभोगा साठी का जावे?" ॥१॥

ये चिद्धि पूर्व ऋतसाप आसन्त्साकं देवेभिरवदन्नृतानि ।
ते चिदवासुर्नह्यन्तमापुः समू नु पत्नीर्वृषभिर्जगम्युः ॥२॥

देवी लोपामुद्रा म्हणते," सत्याच्या आचरणात गुंतलेले, व्रतस्थ, प्राचीन ऋषि योग्य वेळी मुले जन्माला घालण्याचे काम करत असत. आश्रमात, आजन्म ब्रह्मचारी राहण्याचे त्यांना साधले नाही. तपस्या करणाऱ्या पत्नी, सुख उपभोगण्यास सक्षम असलेल्या त्यांच्या पतींकडे जात असत."॥२॥

न मृषा श्रान्तं यदवन्ति देवा विश्वा इत्स्पृधो अभ्यश्नवाव ।
जयावेदत्र शतनीथमाजिं यत्सम्यञ्चा मिथुनावभ्यजाव ॥३॥

अगस्त्यऋषी उत्तरले," आत्तापर्यंतची आपली तपश्चर्या व्यर्थ गेली नाही. आपल्या तपश्चर्येने देव आपले रक्षण करत आहेत. आपण सर्व सुखांचा आनंद

घेण्यास सक्षम आहोत. आपण योग्य पद्धतीने पुत्रोत्पत्ती केल्यास आपण कठीण संसार युद्धात विजयी होऊ." ॥३॥

नदस्य मा रुधतः काम आगन्नित आजातो अमुतः कुतश्चित् ।
लोपामुद्रा वृषणं नी रिणाति धीरमधीरा धयति श्वसन्तम् ॥४॥
अगस्त्यऋषी उत्तरले," हे पत्नी, नदीचा प्रवाह सर्व बाजूंनी अडवून ठेवल्याप्रमाणे, स्वतःवर नियंत्रण ठेवून निर्माण होणारी शक्ती, संततीची इच्छा करण्यास उद्युक्त करत आहे. हे लोपामुद्रा ! वीर्यवान, श्वास नियंत्रित करण्यास सक्षम असलेल्या माझ्यासारख्या धैर्यवान, महान पुरुषाचा भोग घेऊन आनंद घ्यावा." ॥४॥

इमं नु सोममन्तितो हृत्सु पीतमुप ब्रुवे ।
यत्सीमागश्चकृमा तत्सु मृळतु पुलुकामो हि मर्त्यः ॥५॥
अगस्त्यऋषींचा शिष्य म्हणतो ," मनःपूर्वक प्राशन केलेल्या सोमरसाची मी प्रार्थना करतो की मनात अनेक इच्छा निर्माण होणाऱ्या माझ्यासारख्या माणसाच्या हातून होणाऱ्या पापांपासून सोमरस माझे रक्षण करो." ॥५॥

अगस्त्यः खनमानः खनित्रैः प्रजामपत्यं बलमिच्छमानः ।
उभौ वर्णावृषिरुग्रः पुपोष सत्या देवेष्वाशिषो जगाम ॥६॥
अगस्त्यऋषींचा शिष्य म्हणतो, "कठोर तपस्वी अगस्त्यऋषींनी त्यांच्या संशोधन क्षमतेच्या मदतीने संतती निर्माण करणाऱ्या आणि तपश्चर्येद्वारे शक्ती प्राप्त करणाऱ्या दोन्ही प्रकारच्या वासनायुक्त आणि आत्मसंयमी पुरुषांचे पोषण केले आणि देवांकडून खरे आशीर्वाद प्राप्त केले. ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८०

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** – अश्विनीकुमार **छंद-** त्रिष्टुप्,

युवो रजांसि सुयमासो अश्वा रथो यद्वां पर्यर्णांसि दीयत् ।
हिरण्यया वां पवयः प्रुषायन्मध्वः पिबन्ता उषसः सचेथे ॥१॥

हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या रथाला जोडलेले आणि नियंत्रणात असलेले अश्व अंतरिक्षात नियमांनुसार भ्रमण करतात, त्यावेळी आपल्या रथाच्या स्वर्णमयी चाकातून मधुर सोमरस स्रवू लागतो. हा मधुर सोमरस प्राशन करून आपण दोघे उषादेवते सोबत भ्रमण करता ॥१॥

युवमत्यस्याव नक्षथो यद्विपत्मनो नर्यस्य प्रयज्योः ।
स्वसा यद्वां विश्वगूर्ती भराति वाजायेट्टे मधुपाविषे च ॥२॥

सर्वांकडून कौतुक केले जाणाऱ्या, मधुर सोमरस प्राशन करणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! सतत चालणारे, आकाशात भ्रमण करणारे, मानवांच्या हिताचे आपल्या दोघांचे आगमन सर्वांच्या अगोदर अंतरिक्षात प्रविष्ट होते. त्यावेळी आपली भगिनी उषादेवता आपल्याला मदत करते आणि यज्ञकर्ते भक्तगण शक्ती आणि अन्न वाढवण्यासाठी आपली प्रार्थना करतात ॥२॥

युवं पय उस्रियायामधत्तं पक्वमामायामव पूर्व्यं गोः ।
अन्तर्यद्वनिनो वामृतप्सू ह्वारो न शुचिर्यजते हविष्मान् ॥३॥

हे सत्यपालक अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी गायींमध्ये दूध निर्माण करून ते परिपक्व आणि पौष्टिक केले. या आपल्या कार्यामुळे, ज्या काळजीने चोर जंगलातील झाडांमध्ये लपतो त्याप्रमाणे यज्ञकर्ते भक्तगण आपल्या दोघांची उपासना करतात ॥३॥

युवं ह घर्मं मधुमन्तमत्रयेऽपो न क्षोदोऽवृणीतमेषे ।
तद्वां नरावश्विना पश्वइष्टी रथ्येव चक्रा प्रति यन्ति मध्वः ॥४॥

हे नेतृत्व संपन्न अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी अत्रिऋषींना आनंद देण्यासाठी गरम, मधुर दुधाच्या नद्या प्रवाहित केल्या होत्या. या आपल्या कार्यामुळे रथाच्या चक्राप्रमाणे द्रुतगतीने यज्ञ आणि सोमरस आपल्यापर्यंत पोहोचतो ॥४॥

आ वां दानाय ववृतीय दस्रा गोरोहेण तौग्र्यो न जिव्रिः ।
अपः क्षोणी सचते माहिना वां जूर्णो वामक्षुरंहसो यजत्रा ॥५॥

हे शत्रुनाशक, पूजनीय अश्विनीकुमारांनो ! तुग्रपुत्र भुज्यूने आपल्याला बोलावले होते त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपणास बोलावत आहोत. आमच्यावर कृपा करून आम्हाला वृद्धत्वाच्या वेदनांपासून मुक्त करावे आणि दीर्घायुषी करावे ही विनंती ॥५॥

नि यद्युवेथे नियुतः सुदानू उप स्वधाभिः सृजथः पुरंधिम् ।
प्रेषद्वेषद्वातो न सूरिरा महे ददे सुव्रतो न वाजम् ॥६ ॥

हे श्रेष्ठ, दानशूर अश्विनीकुमारांनो ! जेव्हा आपण दोघेही आपल्या नियुत नाव असलेल्या अश्वाला रथाला जोडता तेव्हा आपण पृथ्वीला अन्नाने समृद्ध

करता. यज्ञकर्ते भक्तगण आपणाला वायुसारखे तत्परतेने प्रसन्न करून श्रेष्ठ कर्म करणाऱ्या व्यक्तींसारखे अन्न प्राप्त करतात ॥६ ॥

वयं चिद्धि वां जरितारः सत्या विपन्यामहे वि पणिर्हितावान् ।
अधा चिद्धि ष्माश्विनावनिन्द्या पाथो हि ष्मा वृषणावन्तिदेवम् ॥७॥
हे शक्तीसंपन्न, आनंददायी अश्विनीकुमारांनो! आम्ही आपले खरे साधक आहोत म्हणून आपल्या प्रख्यात गुणांचे आम्ही वर्णन करतो. आपण यज्ञ न करणाऱ्या धनी लोकांचा त्याग करावा आणि देवगणांसमवेत सिद्ध केलेला सोमरस प्राशन करावा ही विनंती ॥७॥

युवां चिद्धि ष्माश्विनावनु द्यून्विरुद्रस्य प्रस्रवणस्य सातौ ।
अगस्त्यो नरां नृषु प्रशस्तः काराधुनीव चितयत्सहस्रैः ॥८ ॥
हे अश्विनीकुमारांनो! त्रैलोक्य श्रेष्ठ सुप्रसिद्ध अगस्त्यऋषी, गर्जना करणाऱ्या जलप्रवाहाला उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याला शंखाच्या आवाजा सारखे वादन करून आपल्याला जागृत करत आहेत॥८ ॥

प्र यद्वहेथे महिना रथस्य प्र स्यन्द्रा याथो मनुषो न होता ।
धत्तं सूरिभ्य उत वा स्वश्व्यं नासत्या रयिषाचः स्याम ॥९॥
हे सत्याचे पालन करणाऱ्या आणि गतिशील अश्विनीकुमारांनो ! आपण दोघेही आपल्या सर्वोत्तम रथावर आरूढ होऊन वेगाने यज्ञकर्त्या भक्तगणांकडे जावे आणि आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम अश्व आणि विपुल ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥९॥

तं वां रथं वयमद्या हुवेम स्तोमैरश्विना सुविताय नव्यम् ।
अरिष्टनेमिं परि द्यामियानं विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥१०॥

हे अश्विनीकुमारांनो ! उत्कृष्ट अशा आपल्या आकाश आणि पृथ्वी मध्ये भ्रमण करणाऱ्या रथाला स्तोत्रांच्या पठणाने आम्ही आवाहन करत आहोत. आपण आम्हाला अन्न, बल आणि दीर्घ आयुष्य प्रदान करावे ही विनंती ॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८१

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** – अश्विनीकुमार **छंद-** जगती ६,८ त्रिष्टुप्,

कदु प्रेष्टाविषां रयीणामध्वर्यन्ता यदुन्निनीथो अपाम् ।
अयं वां यज्ञो अकृत प्रशस्तिं वसुधिती अवितारा जनानाम्॥१॥
हे मानवजातीचे रक्षण करणाऱ्या आणि समृद्धी देणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपल्या प्रीत्यर्थ हा यज्ञ सिद्ध केला आहे. आपण यज्ञासाठी पाणी, धान्य आणि घनसंपत्ती घेऊन कधी प्रगट होणार आहात? ॥१॥

आ वामश्वासः शुचयः पयस्पा वातरंहसो दिव्यासो अत्याः ।
मनोजुवो वृषणो वीतपृष्ठा एह स्वराजो अश्विना वहन्तु॥२॥
हे अश्विनीकुमारांनो ! शुद्ध, दिव्य, वाऱ्यासारखे आणि मनासारखे वेगवान, शक्तिशाली, पाणी पिणारे, धष्टपुष्ट स्वयंप्रकाशी अश्व आपणा दोघांना आमच्या यज्ञस्थळी घेऊन येवोत ॥२॥

आ वां रथोऽवनिर्न प्रवत्वान्त्सुप्रवन्धुरः सुविताय गम्याः ।
वृष्णः स्थातारा मनसो जवीयानहम्पूर्वो यजतो धिष्ण्या यः॥३॥
उच्च स्थानाला पात्र असलेल्या, भक्कम रथावर आरूढ झालेल्या हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या मनासारखा गतिमान, पृथ्वी इतका लांबरुंद, सतत अग्रणी असलेल्या आपल्या रथावर आरूढ होऊन आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥३॥

इहेह जाता समवावशीतामरेपसा तन्वा नामभिः स्वैः ।
जिष्णुर्वामन्यः सुमखस्य सूरिर्दिवो अन्यः सुभगः पुत्र ऊहे॥४॥
निर्दोष शरीर असलेल्या आणि जगात खूप प्रशंसा मिळवलेल्या हे अश्विनीकुमारांनो! आपल्या पैकी एक जण विजयी सुमुख यज्ञाचा आरंभकर्ता आणि दुसरा सर्वोत्तम ऐश्वर्य धारण करणारा दिव्य जगाचा पुत्र आहे ॥४॥

प्र वां निचेरुः ककुहो वशाँ अनु पिशङ्गरूपः सदनानि गम्याः ।
हरी अन्यस्य पीपयन्त वाजैर्मथ्रा रजांस्यश्विना वि घोषैः॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्यातील एकाचा सूर्यासारखा सोनेरी पिवळाधमक रथ आपल्या इच्छेनुसार यज्ञभूमीवर येवो आणि दुसऱ्याचा रथ मानवी स्तुतीने आणि त्याच्या अश्वांना मंथन केलेले अन्न अर्पण करून प्रसन्न होवो. ॥५॥

प्र वां शरद्वान्वृषभो न निष्षाट् पूर्वीरिषश्चरति मध्व इष्णन् ।
एवैरन्यस्य पीपयन्त वाजैर्वेषन्तीरूर्ध्वा नद्यो न आगुः॥६॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या दोघांपैकी एक जण, सामर्थ्यशाली शत्रूंचा पराभव करून अन्नधान्यामध्ये मधुर रसाची उत्पत्ती करणारे आहात, तर दुसरे, अन्नधान्य समृद्ध करणाऱ्या ऊर्ध्वगामी, काठोकाठ भरलेल्या नद्यांचे जलप्रवाह आमच्याकडे घेऊन येणारे आहात. आपण दोघांनीही आमच्या जवळ यावे ही विनंती ॥६॥

असर्जि वां स्थविरा वेधसा गीर्बाळ्हे अश्विना त्रेधा क्षरन्ती ।
उपस्तुताववतं नाधमानं यामन्नयामञ्छृणुतं हवं मे॥७ ॥

कामात प्रवीण असणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! प्राचीन काळापासून प्रचलित असलेली, तीन प्रकारची स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्या दोघांसाठी रचली गेली आहेत. आपण भ्रमण करत असताना किंवा एका जागी स्थिर बसलेले असताना या स्तोत्रांचे श्रवण करून आपल्या इच्छित फळाची इच्छा करणाऱ्या भक्तांचे रक्षण करावे ही विनंती ॥७ ॥

उत स्या वां रुशतो वप्ससो गीस्त्रिबर्हिषि सदसि पिन्वते नॄन् ।
वृषा वां मेघो वृषणा पीपाय गोर्न सेके मनुषो दशस्यन्॥८ ॥
हे शक्तिशाली अश्विनीकुमारांनो! तीन ठिकाणी दर्भ अंथरून सजवलेल्या यज्ञगृहात स्तुती करणारी ही स्तोत्रे आपल्याला प्रसन्न करतात. ज्याप्रमाणे गायी पौष्टिक दूध देऊन मनुष्यांना तृप्त करतात, त्याप्रमाणे आपण मेघामधून जलवर्षाव करून मनुष्यांना तृप्त करता. आपण आम्हास समृद्धी प्रदान करावी ही विनंती ॥८ ॥

युवां पूषेवाश्विना पुरंधिरग्निमुषां न जरते हविष्मान् ।
हुवे यद्वां वरिवस्या गृणानो विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥९ ॥
हे अश्विनीकुमारांनो! बुद्धिमान पूषन् देवांप्रमाणे हविष्यान्नाची आहुति देणारे, यज्ञकर्ते भक्तगण, उषादेवता आणि अग्निदेवता यांच्या समवेत आपली स्तोत्रांच्या पठणाने स्तुती करत आहेत. त्यांच्या प्रार्थना स्वीकारून भक्तगणांना अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य आपण प्रदान करावे ही विनंती ॥९ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८२

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** – अश्विनीकुमार **छंद**-जगती ६,८ त्रिष्टुप्,

अभूदिदं वयुनमो षु भूषता रथो वृषण्वान्मदता मनीषिणः ।
धियंजिन्वा धिष्ण्या विश्पलावसू दिवो नपाता सुकृते शुचिव्रता॥१॥
हे बुद्धिमान यज्ञकर्त्यांनो ! अश्विनीकुमारांचा बलवान, वीर्यवान रथ यज्ञस्थळी अवतीर्ण होत आहे. विश्पलेचे कल्याण करणाऱ्या, शुद्ध आणि सद्गुणी स्तुतीस पात्र, आदित्याचे नातू अश्विनीकुमारांना पाहून त्यांना सामोरे जाऊन संतुष्ट करावे ॥१॥

इन्द्रतमा हि धिष्ण्या मरुत्तमा दस्रा दंसिष्ठा रथ्या रथीतमा ।
पूर्णं रथं वहेथे मध्व आचितं तेन दाश्वांसमुप याथो अश्विना॥२॥
शत्रूंचा नाश करणाऱ्या, स्तुतीस पात्र, इंद्रदेव आणि मरुद्गणांचे सर्वोत्तम गुण असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण सारथ्यांमध्ये सर्वोत्तम सारथ्य करणारे आहात . मधाने भरलेल्या रथात आरूढ होऊन हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्यांकडे यावे ही विनंती ॥२॥

किमत्र दस्रा कृणुथः किमासाथे जनो यः कश्चिदहविर्महीयते ।
अति क्रमिष्टं जुरतं पणेरसुं ज्योतिर्विप्राय कृणुतं वचस्यवे॥३॥
हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो ! आपल्याला हविष्यान्न अर्पण न करणाऱ्या, गर्विष्ठ, कवडीचुंबक माणसांकडे आपण का जाता? त्यांच्याजवळ का निवास

करता? त्यांचा त्याग करून सद्गुणांनी स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्यांना प्रकाश प्रदान करावा ही विनंती. ॥३॥

जम्भयतमभितो रायतः शुनो हतं मृधो विदथुस्तान्यश्विना ।
वाचंवाचं जरितू रत्निनीं कृतमुभा शंसं नासत्यावतं मम॥४॥
हे सत्यवादी अश्विनीकुमारांनो! कुत्र्यांसारख्या हिंसक अत्याचारीं आणि आम्हाला मारायला येणाऱ्या सर्वांचा नाश करावा, तसेच आपण दोघेही आमच्या स्तोत्रातील प्रत्येक श्लोक संपत्ती आणि समृद्धीने भरावा आणि आमच्या स्तुतियोग्य स्तोत्रांचे रक्षण करावे ही विनंती. ॥४॥

युवमेतं चक्रथुः सिन्धुषु प्लवमात्मन्वन्तं पक्षिणं तौग्र्याय कम् ।
येन देवत्रा मनसा निरूहथुः सुपप्तनी पेतथुः क्षोदसो महः॥५ ॥
हे अश्विनीकुमारांनो! आपल्या शक्तीने मजबूत वल्हे असलेली, पक्ष्यांसारखी आकाशात उडणारी नौका बनवलीत. कुशलनावाड्या प्रमाणे आकाशातून प्रवास करत, मनाच्या वेगाने समुद्राच्या मध्यभागी पोहोचून आपण दोघांनी राजा तुग्राच्या मुलाचे, भुज्यूचे रक्षण केले ॥५ ॥

अवविद्धं तौग्र्यमप्स्वन्तरनारम्भणे तमसि प्रविद्धम् ।
चतस्रो नावो जठलस्य जुष्टा उदश्विभ्यामिषिताः पारयन्ति॥६ ॥
समुद्राच्या मध्यभागी, अंधारात, निराधार पाण्यात, पडलेल्या राजा तुग्राच्या मुलाला, भुज्युला मुक्त करण्यासाठी अश्विनीकुमारांनी चार नौका पाठवून त्याची समुद्रातून मुक्तता केली ॥६ ॥

कः स्विद्वृक्षो निःष्ठितो मध्ये अर्णसो यं तौग्र्यो नाधितः पर्यषस्वजत् ।
पर्णा मृगस्य पतरोरिवारभ उदश्विना ऊहथुः श्रोमताय कम्॥७ ॥

जीवाची याचना करणाऱ्या राजा तुग्राच्या मुलाने, भुज्यूने समुद्राच्या पाण्याच्या मध्यभागी कोणत्या झाडाचा आश्रय घेतला? मरणाच्या दारात असलेल्या मृगाला अचानक फुटलेल्या पंखांमुळे आधार मिळतो, त्याप्रमाणे अश्विनीकुमारांनी भुज्यूला वर उचलले. या आपल्या परोपकारी कृतीने अश्विनीकुमारांनो आपण दोघांनी प्रसिद्धी मिळवली ॥७ ॥

तद्वां नरा नासत्यावनु ष्याद्यद्वां मानास उचथमवोचन् ।
अस्मादद्य सदसः सोम्यादा विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥८॥

हे नेतृत्व, गुणसंपन्न अश्विनीकुमारांनो! आपल्या भक्तांनी स्तुतियुक्त पठण केलेल्या स्तोत्रांचे श्रवण करून प्रसन्न व्हावे आणि भक्तांना अन्न बल आणि ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥८॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८३

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** – अश्विनीकुमार **छंद-** त्रिष्टुप्,

तं युञ्जाथां मनसो यो जवीयान्त्रिवन्धुरो वृषणा यस्त्रिचक्रः ।
येनोपयाथः सुकृतो दुरोणं त्रिधातुना पतथो विर्न पर्णैः ॥१॥
हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो ! आपल्या मनापेक्षा वेगवान, तीन चाके असलेल्या, तीन धातूंनी मढवलेल्या आणि इच्छा पूर्ण करणाऱ्या रथाला अश्व जोडा. ज्याप्रमाणे पक्षी आपल्या पंखांनी वेगाने उडतो त्या प्रमाणे आपण त्या रथावर आरूढ होऊन यज्ञकर्त्या भक्तांकडे जावे ही विनंती ॥१॥

सुवृद्रथो वर्तते यन्नभि क्षां यत्तिष्ठथः क्रतुमन्तानु पृक्षे ।
वपुर्वपुष्या सचतामियं गीर्दिवो दुहित्रोषसा सचेथे॥२॥
सदैव सत्कर्मासाठी तयार असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! आपण यज्ञातील हविष्यान्न स्वीकारण्यासाठी आपल्या सुंदर गतिमान रथावर आरूढ होऊन यज्ञस्थळी यावे ही विनंती. आपले गुणगान करणारी स्तोत्रे आपल्याला आनंदी करोत. आपण दोघेही, स्वर्गकन्या उषादेवते सोबत भ्रमण करता॥२॥

आ तिष्ठतं सुवृतं यो रथो वामनु व्रतानि वर्तते हविष्मान् ।
येन नरा नासत्येषयध्यै वर्तिर्याथस्तनयाय त्मने च ॥३॥
हे नेतृत्व गुण संपन्न अश्विनीकुमारांनो ! हविष्यान्नाच्या अर्पणांनी भरलेला रथ आपण दोघांना कर्तव्य पार पाडण्यासाठी घेऊन जातो. त्या सुंदर रथावर आरूढ होऊन, यज्ञ करणाऱ्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या घरी जाऊन त्यांना यज्ञ करण्यास प्रेरित करावे ही विनंती. ॥३॥

मा वां वृको मा वृकीरा दधर्षीन्मा परि वर्क्तमुत माति धक्तम् ।
अयं वां भागो निहित इयं गीर्दस्राविमे वां निधयो मधूनाम्॥४ ॥
हे शत्रुनाशक अश्विनीकुमारांनो ! आपल्यासाठी हविष्यान्न सिद्ध करून ठेवले आहे. ही स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्यासाठीच आहेत. आमचा आपण त्याग करू नका आणि इतर कोणावर ही आपल्या आशीर्वादाचा वर्षाव करू नका ही विनंती. आपल्या कृपेने हिंसक लांडगा (वृक) तसेच लांडगी (वृकी) आमच्यावर हल्ला करू नयेत ही विनंती ॥४ ॥

युवां गोतमः पुरुमीळ्हो अत्रिर्दस्रा हवतेऽवसे हविष्मान् ।
दिशं न दिष्टामृजूयेव यन्ता मे हवं नासत्योप यातम्॥५ ॥
हे अश्विनीकुमारांनो ! गौतमऋषी, पुरुमीळऋषी आणि अत्रिऋषी, हविष्यान्नाची आहुती देत आपल्या दोघांचे संरक्षणासाठी आवाहन करत आहेत. ज्याप्रमाणे सोपा मार्ग अनुसरण करणारा सहजपणे इच्छित स्थळी पोहोचतो, त्याचप्रमाणे आमचा धावा ऐकून आपण आमच्या जवळ यावे ही विनंती ॥५ ॥

अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि ।
एह यातं पथिभिर्देवयानैर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥६॥
हे अश्विनीकुमारांनो! आपल्या कृपेमुळे आमच्या जीवनातील अंध:कारावर आम्ही मात करू शकू. ही सर्व स्तोत्रे आपल्यासाठीच रचली आहेत. देवांच्या दिव्य मार्गावरून आपण आमच्या सन्निध्यात यावे आणि आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य मिळू द्यावे ही विनंती ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८४

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता** – अश्विनीकुमार **छंद-** त्रिष्टुप्,

ता वामद्य तावपरं हुवेमोच्छन्त्यामुषसि वह्निरुक्थैः ।
नासत्या कुह चित्सन्तावर्यो दिवो नपाता सुदास्तराय॥१॥

दिव्य जगाचे आणि सत्याचे रक्षक असलेल्या हे अश्विनीकुमारांनो ! जेव्हा उषादेवता अंधार दूर करतात तेव्हा स्तोत्रांचे पठण करत, यज्ञवेदी मध्ये अग्नि प्रज्वलित करत आम्ही, आपण कोठेही असलात तरीही आपल्याला यज्ञकर्त्या भक्तांच्या कल्याणासाठी सर्वोत्तम दान देणाऱ्याकरीता आमंत्रित करत आहोत आणि भविष्यातही आपल्याला आमंत्रित करू ॥१॥

अस्मे ऊ षु वृषणा मादयेथामुत्पणींर्हितमूर्म्या मदन्ता ।
श्रुतं मे अच्छोक्तिभिर्मतीनामेष्टा नरा निचेतारा च कर्णैः॥२॥

हे नेतृत्वसंपन्न, पराक्रमी, योग्य भक्तगणांचा शोध घेणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आमच्या स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न होऊन आम्हाला चांगले आशीर्वाद द्यावे आणि पणींचा (लोभी फसवणूक करणाऱ्यांचा) नाश करावा ही विनंती ॥२॥

श्रिये पूषन्निषुकृतेव देवा नासत्या वहतुं सूर्यायाः ।
वच्यन्ते वां ककुहा अप्सु जाता युगा जूर्णेव वरुणस्य भूरेः॥३॥

हे उदार, सत्यवादी(नासत्य), पोषण करणाऱ्या अश्विनीकुमारांनो! सूर्यकन्या उषादेवतांना बाणाच्या सरळ मार्गी गतीप्रमाणे आपण घेऊन यावे ही विनंती.

आपल्या अश्वांची प्रशंसा, समुद्रातून उत्पन्न झालेल्या शक्तिशाली वरुणदेवांच्या प्राचीन रथाच्या अश्वांप्रमाणे केली जाते ॥३॥

अस्मे सा वां माध्वी रातिरस्तु स्तोमं हिनोतं मान्यस्य कारोः ।
अनु यद्वां श्रवस्या सुदानू सुवीर्याय चर्षणयो मदन्ति ॥४॥
हे दानशूर अश्विनीकुमारांनो! मधुर सोमरसाने भरलेल्या भांड्यांसह मान्यवर यज्ञकर्त्या भक्तांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे श्रवण करून, प्रसन्न होऊन अन्नाची इच्छा असणाऱ्या आमच्यावर कृपा करावी ही विनंती ॥४॥

एष वां स्तोमो अश्विनावकारि मानेभिर्मघवाना सुवृक्ति ।
यातं वर्तिस्तनयाय त्मने चागस्त्ये नासत्या मदन्ता॥५॥
हे वैभवशाली, सत्यनिष्ठ अश्विनीकुमारांनो ! ही सुंदर पाप नाशक स्तोत्रे आपल्या दोघांसाठी रचली आहेत. या स्तोत्रांमुळे प्रसन्न होऊन आपल्या सर्व परिवारासह अगस्त्यऋषींच्या यज्ञस्थळी आपल्या भक्तगणांच्या पुत्र-पौत्र प्राप्तीसाठी यावे ही विनंती ॥५॥

अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि ।
एह यातं पथिभिर्देवयानैर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥६॥
हे अश्विनीकुमारांनो! आपल्या कृपेने आम्ही भक्तगणांनी अज्ञानरूपी अंधारातून मुक्तता मिळवली आहे म्हणूनच ही सर्व स्तोत्रे आपल्यासाठीच रचली गेली आहेत. देवमार्गावरून आपण आमच्याकडे यावे आणि आम्हाला शीघ्र अन्न ,शक्ती आणि दीर्घायुष्य मिळू द्यावे ही विनंती ॥६॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८५

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**– द्यावा(आकाश) पृथ्वी **छंद-** त्रिष्टुप्,

कतरा पूर्वा कतरापरायोः कथा जाते कवयः को वि वेद ।
विश्वं त्मना बिभृतो यद्ध नाम वि वर्तेते अहनी चक्रियेव॥१ ॥

हे द्रष्ट्यांनो! पृथ्वीदेवता आणि आकाशदेवता कशा अस्तित्वात आल्या. या दोघींपैकी कोण प्रथम अस्तित्वात आली आणि कोणते नंतर अस्तित्वात आली? ह्या दोघी संपूर्ण विश्वाला धारण करतात आणि चाकांसारखे फिरत दिवस आणि रात्र निर्माण करतात. ॥१ ॥

भूरिं द्वे अचरन्ती चरन्तं पद्वन्तं गर्भमपदी दधाते ।
नित्यं न सूनुं पित्रोरुपस्थे द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात्॥२ ॥

अचल आणि पादरहित असूनही पृथ्वीदेवता आणि आकाशदेवता हालचाल करणाऱ्या आणि पाय असलेल्या असंख्य प्राण्यांना आधार देतात. पुत्राला मदत करणाऱ्या माता-पित्यासारखे हे पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आपण आमचे पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥२॥

अनेहो दात्रमदितेरनर्वं हुवे स्वर्वदवधं नमस्वत् ।
तद्रोदसी जनयतं जरित्रे द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात्॥३ ॥

हे पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आदितीदेवींची पापरहित, अविनाशी, हिंसारहित,अन्नाने परिपूर्ण, तेजस्वी आणि नम्रता प्रदान करणाऱ्या

संपत्तीसाठी प्रार्थना करावी, आणि पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥३॥

अतप्यमाने अवसावन्ती अनु ष्याम रोदसी देवपुत्रे ।
उभे देवानामुभयेभिरह्वां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात्॥४॥
दैवीशक्तींची निर्मिती करणाऱ्या, पीडित नसलेल्या हे पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आपण आपल्या संरक्षणात्मक शक्तींद्वारे दिवस-रात्र प्राण्यांचे रक्षण करत आमच्यावर कृपा करता. आपण आमचे पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती॥४॥

संगच्छमाने युवती समन्ते स्वसारा जामी पित्रोरुपस्थे ।
अभिजिघ्रन्ती भुवनस्य नाभिं द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥५॥
बहिणीसारखे सहकार्य करणाऱ्या चिरतरुण पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आपण परमात्म्याच्या आज्ञेत राहून विश्वाच्या नाभीला आश्रय देता. आपण आमचे पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥५॥

उर्वी सद्मनी बृहती ऋतेन हुवे देवानामवसा जनित्री ।
दधाते ये अमृतं सुप्रतीके द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥६॥
विस्तीर्ण आणि विशाल, सुखस्वरूप आणि जलधारक दैवीस्वरूप असलेल्या पृथ्वीदेवतेचे आणि आकाशदेवतेचे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञकार्यासाठी आवाहन करतो. आपण आमचे पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥६ ॥

उर्वी पृथ्वी बहुले दूरेअन्ते उप ब्रुवे नमसा यज्ञे अस्मिन् ।

दधाते ये सुभगे सुप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥७ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, विशाल सीमा असणाऱ्या, महान, सुंदर स्वरूपात असलेल्या, कृपेची देणगी देणाऱ्या, सर्वांचे निवास स्थान असणाऱ्या उर्वीची (धरणीमातेची), पृथ्वीदेवतेची आणि आकाशदेवतेची या यज्ञस्थळी विनम्र भावनेने प्रार्थना करत आहोत. आपण आमचे पापांसून रक्षण करावे ही विनंती ॥७ ॥

देवान्वा यच्चकृमा कच्चिदागः सखायं वा सदमिज्जास्पतिं वा ।
इयं धीर्भूया अवयानमेषां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥८॥
हे पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तांकडून किंवा आमच्या सख्यासोयऱ्यां कडून अनवधानाने झालेल्या पापांचे या यज्ञाद्वारे परिमार्जन करावे ही विनंती. आपण आमचे पापांसून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥८॥

उभा शंसा नर्या मामविष्टामुभे मामूती अवसा सचेताम् ।
भूरि चिदर्यः सुदास्तरायेषा मदन्त इषयेम देवाः ॥९॥
मानवजातीसाठी कल्याणकारी आणि स्तुतियोग्य हे पृथ्वीदेवतांनो आणि आकाशदेवतांनो ! आपण आमचे रक्षण करावे ही विनंती. हे दैवीशक्तींनो! यज्ञकर्त्या भक्तांच्या दानशील स्वभावाचे रक्षण करण्यासाठी आम्हाला विपुल संपत्ती प्रदान करावी ही विनंती ॥९॥

ऋतं दिवे तदवोचं पृथिव्या अभिश्रावाय प्रथमं सुमेधाः ।
पातामवद्याद्दुरितादभीके पिता माता च रक्षतामवोभिः ॥१०॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या सुबुद्धीने पृथ्वीदेवतेच्या आणि आकाशदेवतेच्या महानतेचे गुणगान करण्यासाठी स्तोत्रांची रचना करत आहोत. पितृरुपी आकाशदेवता आणि मातृरुपी पृथ्वीदेवता संरक्षण साधनांनी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करोत ही विनंती ॥१०॥

इदं द्यावापृथिवी सत्यमस्तु पितर्मातर्यदिहोपब्रुवे वाम् ।
भूतं देवानामवमे अवोभिर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम्॥११॥

पितृरुपी आकाशदेवते आणि मातृरुपी पृथ्वीदेवते ! आम्ही या यज्ञात आपल्यासाठी करत असलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणांने प्रसन्न होऊन आम्हाला उत्तम फळ द्यावे ही विनंती. आपण आमचे संरक्षण करावे आणि आम्हाला अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य द्यावे ही विनंती ॥११ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८६

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**– विश्वेदेव **छंद-** त्रिष्टुप्,

आ न इळाभिर्विदथे सुशस्ति विश्वानरः सविता देव एतु ।
अपि यथा युवानो मत्सथा नो विश्वं जगदभिपित्वे मनीषा॥१॥
सर्व कल्याणकारी हे अग्निदेवा आणि हे सवितादेवते ! आपण आमच्या स्तोत्रांच्या पठणाने प्रसन्न होऊन, हविष्यान्न ग्रहण करण्यासाठी आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. हे तरुण विश्वेदेवांनो आमच्या यज्ञस्थळी येऊन आमच्यावर कृपाकरून आम्हाला आणि समस्त विश्वाला आनंदी करावे ही विनंती ॥१॥

आ नो विश्व आस्क्रा गमन्तु देवा मित्रो अर्यमा वरुणः सजोषाः ।
भुवन्यथा नो विश्वे वृधासः करन्त्सुषाहा विथुरं न शवः ॥२॥
आपल्या शत्रूंवर हल्ला करणारे आणि एकमेकांवर प्रेम करणारे मित्रदेव, वरुणदेव आणि अर्यमा हे सर्व विश्वेदेव आमच्या यज्ञामध्ये येऊन आमचा उत्कर्ष करण्यास मदत करोत ही विनंती. शत्रूंवर विजय मिळविण्याची शक्ती असलेल्या या देवतांनी आमची शक्ती क्षीण करू नये ही विनंती ॥२॥

प्रेष्ठं वो अतिथिं गृणीषेऽग्निं शस्तिभिस्तुर्वणिः सजोषाः ।
असद्यथा नो वरुणः सुकीर्तिरिषश्च पर्षदरिगूर्तः सूरिः ॥३॥

शत्रूसंहारक, सर्वांशी प्रेमाने बोलणारे आणि वागणारे, अतिथींसारख्या आदरणीय हे अग्निदेवा !आम्ही स्तोत्रांच्या पठणाने आपली स्तुती करत आहोत. गौरवशाली कीर्तीचे वरुणदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अन्न आणि योग्य कीर्ती देवोत ही विनंती ॥३॥

उप व एषे नमसा जिगीषोषासानक्ता सुदुघेव धेनुः ।
समाने अहन्विमिमानो अर्कं विषुरूपे पयसि सस्मिन्नूधन् ॥४॥
हे संपूर्ण विश्वावर राज्य करणाऱ्या दैवीशक्तींनो ! दुभती गाय सकाळी आणि संध्याकाळी ज्याप्रमाणे गुराख्याकडे येते, त्याचप्रमाणे आम्ही, सकाळ-संध्याकाळ पापांवर विजय मिळविण्यासाठी, स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणासाठी आपल्या समोर उपस्थित होतो ॥४॥

उत नोऽहिर्बुध्न्यो मयस्कः शिशुं न पिप्युषीव वेति सिन्धुः ।
येन नपातमपां जुनाम मनोजुवो वृषणो यं वहन्ति ॥५॥
अहिर्बुध्न्य (विद्युत् रूपी अग्नी) देवता आमचे कल्याण करो. आपल्या बाळाचे पालनपोषण करण्यासाठी जाणाऱ्या आईप्रमाणे पाण्याने भरलेल्या नद्या आमच्या सान्निध्यात येवोत. मनाच्या वेगाने भ्रमण करणाऱ्या जलपुत्राची आम्ही पूजा करतो ॥५॥
(अहिर्बुद्धी ही एक प्राचीन वैदिक देवता आहे, जी उत्तर भाद्रपद नक्षत्राची प्रमुख देवता म्हणून ओळखली जाते).

उत न ईं त्वष्टा गन्त्वच्छा स्मत्सूरिभिरभिपित्वे सजोषाः ।
आ वृत्रहेन्द्रश्चर्षणिप्रास्तुविष्टमो नरां न इह गम्याः ॥६ ॥

ज्ञानी लोकांशी प्रेमाने वागणारा त्वष्टादेव, यज्ञकर्त्या भक्तांना तृप्त करणारे आणि वृत्रासुराच्या वधासाठी सर्वांनी स्तुती केलेले इंद्रदेव आमच्या यज्ञस्थळी येवोत आणि आमच्या सत्कर्मांमध्ये आम्हाला मदत करोत ही विनंती ॥६ ॥

उत न ईं मतयोऽश्वयोगाः शिशुं न गावस्तरुणं रिहन्ति ।
तमीं गिरो जनयो न पत्नीः सुरभिष्टमं नरां नसन्त ॥७ ॥
ज्याप्रमाणे गायी त्यांच्या वासरांना चाटतात आणि प्रेम प्रगट करतात, त्याचप्रमाणे अश्वाइतक्या वेगवान बुद्धी असलेल्या इंद्रदेवांबद्दल असलेले आमचे प्रेम आम्ही प्रगट करतो. ज्याप्रमाणे स्त्रिया आपल्या पतीला आकर्षित करतात त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण तेजस्वी इंद्रदेवांना आकर्षित करतो ॥७ ॥

उत न ईं मरुतो वृद्धसेनाः स्मद्रोदसी समनसः सदन्तु ।
पृषदश्वासोऽवनयो न रथा रिशादसो मित्रयुजो न देवाः ॥८ ॥
असाधारण अश्वांनी युक्त अशा सुसज्ज रथांवर विराजमान असलेले, रक्षकांप्रमाणे शत्रूंचा नाश करणारे, मित्रांसारखे प्रेमळ, पराक्रमी, मरुद्गण तसेच पृथ्वीदेवता आणि आकाशदेवता आमच्या यज्ञस्थळी येवोत ही विनंती ॥८ ॥

प्र नु यदेषां महिना चिकित्रे प्र युञ्जते प्रयुजस्ते सुवृक्ति ।
अध यदेषां सुदिने न शरुर्विश्वमेरिणं प्रुषायन्त सेनाः ॥९ ॥
आम्हा यज्ञकर्त्यांच्या उत्कृष्ट स्तुतीने प्रसन्न होऊन मरुद्गण त्यांच्या रथांना अश्व जोडतात. ज्याप्रमाणे दिवसा प्रकाश सर्वत्र पसरतो त्याप्रमाणे शुभदिवशी मरुद्गणांच्या ओसाड जमिनीवर पाण्याने सिंचन करून तिला सुपीक बनविण्याच्या कार्याची कीर्ती सर्वत्र वृद्धिंगत होते ॥९ ॥

प्रो अश्विनाववसे कृणुध्वं प्र पूषणं स्वतवसो हि सन्ति ।
अद्वेषो विष्णुर्वात ऋभुक्षा अच्छा सुम्नाय ववृतीय देवान् ॥१० ॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! रक्षणासाठी अश्विनीकुमार,पूषन् देव, द्वेषरहित असलेले विष्णुदेव, वायुदेव आणि इंद्रदेवांची स्तुती करावी. भक्तगण या सर्व देवतांच्या समूहाची आनंद मिळवण्यासाठी प्रार्थना करतात ॥१० ॥

इयं सा वो अस्मे दीधितिर्यजत्रा अपिप्राणी च सदनी च भूयाः ।
नि या देवेषु यतते वसूयुर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥११ ॥
हे पूज्य विश्वेदेवांनो ! आपला तेजस्वी प्रकाश आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या इच्छा पूर्ण करतो आणि त्यांना आश्रय देतो. आम्हा यज्ञकर्त्या भक्तांना अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य मिळू दे ही विनंती ॥११ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८७

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**– अन्न

छंद- १ अनुष्टुप् गर्भा उष्णिक् २,४,८ ते १० गायत्री ३,५,७ अनुष्टुप् ११ अनुष्टुप् बृहती

पितुं नु स्तोषं महो धर्माणं तविषीम् ।
यस्य त्रितो व्योजसा वृत्रं विपर्वमर्दयत् ॥१ ॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सर्वांचे पालन-पोषण करणाऱ्या, शक्तिशाली अन्नदेवांची स्तुती करत आहोत. अन्नदेवांच्या शक्तीमुळेच यशस्वी इंद्रदेवांनी वृत्रासुराचे तुकडे तुकडे केले ॥१ ॥

स्वादो पितो मधो पितो वयं त्वा ववृमहे ।
अस्माकमविता भव ॥२॥

हे स्वादिष्ट, पौष्टिक आणि गोड रसांचे पोषण करणाऱ्या अन्नदेवेते ! आपण आमचे रक्षणकर्ते आहात ॥२॥

उप नः पितवा चर शिवः शिवाभिरूतिभिः ।
मयोभुरद्विषेण्यः सखा सुशेवो अद्वयाः॥३॥

हे सर्वांचे पालन करणाऱ्या अन्नदेवा ! आपण कल्याणकारी, आनंददायी, द्वेषमुक्त, मित्रांसारखा शुभचिंतक मत्सर आणि द्वेषातून मुक्त आहात. आपल्या पोषक तत्वांनी सुसज्ज होऊन आमच्याकडे यावे ही विनंती ॥३॥

तव त्ये पितो रसा रजांस्यनु विष्ठिताः ।

दिवि वाता इव श्रिताः ॥४ ॥

हे सर्वांना समृद्ध करणाऱ्या अन्नदेवा ! ज्याप्रमाणे हवा सर्व अंतरिक्षामध्ये पसरली आहे त्याप्रमाणे आपला पोषक रस संपूर्ण जगात पसरलेला आहे॥४॥

तव त्ये पितो ददतस्तव स्वादिष्ठ ते पितो ।

प्र स्वाद्मानो रसानां तुविग्रीवा इवेरते ॥५॥

हे पौष्टिक अन्नदेवा ! यज्ञकर्ते भक्तगण प्रार्थना करून आपल्याला आनंद देतात आणि आपली पौष्टिक शक्ती वाढवतात. जे यज्ञकर्ते भक्तगण आपल्या अमृतमय रसांचे सेवन करतात ते उंच मान करून सर्वत्र भ्रमण करतात ॥५॥

त्वे पितो महानां देवानां मनो हितम् ।

अकारि चारु केतुना तवाहिमवसावधीत्॥६॥

हे अन्नदेवा ! सर्व महान देवतांचे मन आपल्यासाठी तळमळत असते. आपल्या सर्वोच्च पोषण आणि संरक्षणात्मक शक्तीच्या मदतीने इंद्रदेवांनी असुरांचा वध केला ॥६॥

यददो पितो अजगन्विवस्व पर्वतानाम् ।

अत्रा चिन्नो मधो पितोऽरं भक्षाय गम्याः॥७॥

हे सर्व विश्वाचे पोषण करणाऱ्या अन्नदेवा ! जेव्हा जलयुक्त ढगांचे शुभपाणी आपल्यापर्यंत पोहोचते तेव्हा आपण पोषण करण्यासाठी या विश्वात मुबलक प्रमाणात उपलब्ध होता ॥७॥

यदपामोषधीनां परिंशमारिशामहे । वातापे पीव इद्भव॥८ ॥

हे शरीर जेव्हा जल आणि औषधी तत्वांनी तयार झालेले अन्न ग्रहण करते, तेव्हा शरीर निरोगी आणि बलवान बनते ॥८ ॥

यत्ते सोम गवाशिरो यवाशिरो भजामहे । वातापे पीव इद्भव ॥९॥

हे सुखस्वरूप अन्नदेवा ! जेव्हा जव, हळद इत्यादींचे सेवन गाईचे दूध, तूप इत्यादी पौष्टिक पदार्थांसोबत केले जाते तेव्हा शारीरिक आरोग्य मजबूत होते. ॥९॥

करम्भ ओषधे भव पीवो वृक्क उदारथिः । वातापे पीव इद्भव ॥१०॥

हे पौष्टिक, आरोग्यप्रद तसेच इन्द्रिय सामर्थ्य वृद्धिंगत करणाऱ्या अन्नदेवा ! शिजवलेले अन्न खाल्ल्याने शारीरिक आरोग्य सुधारते ॥१०॥

तं त्वा वयं पितो वचोभिर्गावो न हव्या सुषूदिम ।
देवेभ्यस्त्वा सधमादमस्मभ्यं त्वा सधमादम् ॥११॥

हे अन्नदेवा !ज्याप्रमाणे आम्ही गायींकडून दूध सेवन करतो, त्या प्रमाणे आपली स्तुती करून आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याकडून अन्नरसाचे सेवन करतो ॥११॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८८

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी

देवता– १ सुसमिध्द अग्नि २ तनूनपात् अग्नि ३ इळ अग्नि ४ बर्हि ५ यज्ञद्वार ६ उषासानक्त

७ दैव्यो होतारौ ८ तिस्रः देव्यः (सरस्वती , इळा , भारती) ९ त्वष्ट १० वनस्पति ११ स्वाह **छंद**-गायत्री

समिद्धो अद्य राजसि देवो देवैः सहस्रजित् । दूतो हव्या कविर्वह ॥१॥

हे हजारो शत्रूंवर विजय मिळवणाऱ्या, ज्ञानसंपन्न, तेजस्वी स्वरूपात प्रज्वलित झालेल्या, देवांचा दूत असलेल्या अग्निदेवा ! आपण आमच्या हविष्यान्नाचा नैवेद्य देवांपर्यंत घेऊन जावे ही विनंती ॥१॥

तनूनपादृतं यते मध्वा यज्ञः समज्यते । दधत्सहस्रिणीरिषः ॥२॥

हजारो प्रकारच्या अन्न संपत्ती देणाऱ्या पूज्य अग्निदेवांना (तनूनपात्) यज्ञकर्ते भक्तगण मधुर नैवेद्यांच्याा सहाय्याने प्रसन्न करतात ॥२॥

आजुह्वानो न ईड्यो देवाँ आ वक्षि यज्ञियान् । अग्ने सहस्रसा असि ॥३॥

यज्ञकर्त्या भक्तांना हजारो प्रकारची संपत्ती दान देणाऱ्या हे अग्निदेवा(इळ) ! अनेक पूजनीय देवतांनी आमच्या यज् स्थळी यावे ही विनंती ॥३॥

प्राचीनं बर्हिरोजसा सहस्रवीरमस्तृणन् । यत्रादित्या विराजथ ॥४॥

हे आदित्यांनो ! आपण प्राचीन काळापासून आसनस्थ होत असलेले आपले अग्निसारखे तेजस्वी दर्भासन यज्ञकर्त्यांनी मंत्रोच्चारांसह पसरवले आहे ॥४॥

विराट् सम्राड्विभ्वीः प्रभ्वीर्बह्वीश्च भूयसीश्च याः ।
दुरो घृतान्यक्षरन् ॥५॥
विराट, तेजस्वी, प्रभावशाली, प्रचंड शक्तिमान, यज्ञद्वारदेवता अग्निदेवांच्या ज्वाळा प्रज्वलित करतात ॥५॥

सुरुक्मे हि सुपेशसाधि श्रिया विराजतः । उषासावेह सीदताम् ॥६ ॥
सुंदर अलंकाराने सजवलेल्या, देखणे रूप असलेल्या, रूपवती रात्रदेवते आणि उषादेवते आपण दोघीही आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥६ ॥

प्रथमा हि सुवाचसा होतारा दैव्या कवी । यज्ञं नो यक्षतामिमम् ॥७॥
सर्वात उत्तम, शक्तिशाली वाणी असलेले, दैवी गुणांनी संपन्न आणि बुद्धिमान अग्निदेवा आमचा यज्ञ संपन्न करावा ही विनंती॥७॥

भारतीळे सरस्वति या वः सर्वा उपब्रुवे । ता नश्चोदयत श्रिये ॥८॥
हे भारती, इळा आणि सरस्वती देवींनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तोत्रांच्या पठणाने आवाहन करत आहोत. आम्हाला ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥८॥

त्वष्टा रूपाणि हि प्रभुः पशून्विश्वान्त्समानजे ।
तेषां नः स्फातिमा यज ॥९॥

पृथ्वीवरील सर्व प्राण्यांना रंगरूप आणि आकार देण्यास सक्षम असलेल्या त्वष्टादेवा !आमचे पशुधन वाढवावे ही विनंती ॥९॥

उप त्मन्या वनस्पते पाथो देवेभ्यः सृज । अग्निर्हव्यानि सिष्वदत् ॥१०॥

हे वनस्पतिदेवते ! आपण देवांसाठी अन्न तयार करावे ही विनंती.
अग्निदेवांद्वारे आमचे हविष्यान्न स्वादिष्ट होवो ॥१०॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१८९

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**–अग्नि **छंद-त्रिष्टुप्**

अग्ने नय सुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥१॥
हे दिव्य गुण संपन्न अग्निदेवा ! आपल्याला सर्व ज्ञानमार्ग ज्ञात आहेत. म्हणून त्यागाचे फळमिळविण्यासाठी योग्य मार्गावर जाण्याचे आम्हाला मार्गदर्शन करावे ही विनंती . दुष्टतेला जन्मदेणारे पाप आमच्यातून दूर करावे ही विनंती. आम्ही आपली वारंवार प्रार्थना करतो ॥१॥

अग्ने त्वं पारया नव्यो अस्मान्त्स्वस्तिभिरति दुर्गाणि विश्वा ।
पूश्च पृथ्वी बहुला न उर्वी भवा तोकाय तनयाय शं योः ॥२॥
नित्य नाविन्यपूर्ण असणाऱ्या आणि अत्यंत प्रशंसनीय अग्निदेवा ! आपल्या कृपेने आम्ही सर्व प्रकारच्या अवघड पापकर्मांपासून आणि दुःखदायी कष्टांपासून मुक्त होऊ. ही पृथ्वी आणि शहरे आम्हा सर्वांसाठी श्रेष्ठ आणि विस्तारलेली व्हावीत आणि आमची संतती आनंदी राहावी ही विनंती ॥२॥

अग्ने त्वमस्मद्युयोध्यमीवा अनग्नित्रा अभ्यमन्त कृष्टीः ।
पुनरस्मभ्यं सुविताय देव क्षां विश्वेभिरमृतेभिर्यजत्र ॥३ ॥
हे अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सर्व व्याधी दूर कराव्यात ही विनंती. यज्ञ न करणारे नेहमीच रोगाने आणि व्याधींनी ग्रस्त असतात. हे यज्ञास

पात्र असलेल्या तेजस्वी अग्निदेवा ! अमर देवांसह आमच्या कल्याणाच्या इच्छेने आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥३ ॥

पाहि नो अग्ने पायुभिरजस्रैरुत प्रिये सदन आ शुशुक्वान् ।
मा ते भयं जरितारं यविष्ठ नूनं विदन्मापरं सहस्वः ॥४॥
हे अग्निदेवा ! आपण आपल्या संरक्षणात्मक शक्तींनी आमचे रक्षण करावे आणि आपल्या प्रिय यज्ञस्थळी प्रज्वलित होऊन सर्वांना प्रकाशमान करावे ही विनंती. हे अग्निदेवा ! आपले सर्व यज्ञकर्ते भक्तगण आपल्या सामर्थ्यामुळे सर्व संकटात भयमुक्त राहोत ॥४॥

मा नो अग्नेऽव सृजो अघायाविष्यवे रिपवे दुच्छुनायै ।
मा दत्वते दशते मादते नो मा रीषते सहसावन्परा दाः ॥५ ॥
हे अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना हिंसक, भुकेल्या आणि दुःख देणाऱ्या शत्रूच्या स्वाधीन करू नकोस ही विनंती. दंश करणाऱ्या सर्पांच्या रूपातील शत्रूंच्या आधीन करू नकोस आणि आम्हाला हिंसक असुरांच्या बंधनांमध्ये टाकू नकोस ही विनंती ॥५ ॥

वि घ त्वावाँ ऋतजात यंसद्गृणानो अग्ने तन्वे वरूथम् ।
विश्वाद्रिरिक्षोरुत वा निनित्सोरभिह्रुतामसि हि देव विष्पट् ॥६ ॥
हे यज्ञामध्ये प्रज्वलित झालेल्या पूजनीय अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या उत्कृष्ट स्तोत्रांच्या पठणनाद्वारे शारीरिक दृष्ट्या बलवान होतो आणि हिंसक, निंदक, दुष्ट लोकांपासून आमचे रक्षण होते. हे अग्निदेवा ! वाईट विचारांनी ग्रस्त आणि वाईट पद्धतीने वागणाऱ्या दुष्कर्म्यांना आपण निश्चितच शिक्षा करता॥६ ॥

त्वं ताँ अग्न उभयान्वि विद्वान्वेषि प्रपित्वे मनुषो यजत्र ।
अभिपित्वे मनवे शास्यो भूर्मर्मृजेन्य उशिग्भिर्नाक्रः ॥७ ॥
हे यज्ञ करण्यास पात्र असलेल्या अग्निदेवा! यज्ञ करणाऱ्यांना आणि न करणाऱ्यांना आपण चांगल्या प्रकारे ओळखता. हे आक्रमक अग्निदेवा! शिक्षण देणाऱ्या ऋत्विजांप्रमाणे यज्ञकर्त्या भक्तांना प्रात:काली ज्ञान द्यावे ही विनंती ॥७ ॥

अवोचाम निवचनान्यस्मिन्मानस्य सूनुः सहसाने अग्नौ ।
वयं सहस्रमृषिभिः सनेम विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥८ ॥
ही सर्व स्तोत्रे यज्ञाचा निर्माता, शत्रूंचा नाश करणाऱ्या अग्निदेवांसाठी इंद्रियांच्या रूपातील ऋषींनी सक्षम करून रचली आहेत. हे अग्निदेवा आम्हाला हजारो प्रकारची संपत्ती, अन्न, शक्ती आणि दीर्घायुष्य प्रदान करावे ही विनंती ॥८ ॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१९०

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**– बृहस्पति **छंद**-त्रिष्टुप्

अनर्वाणं वृषभं मन्द्रजिह्वं बृहस्पतिं वर्धया नव्यमर्कैः ।
गाथान्यः सुरुचो यस्य देवा आशृण्वन्ति नवमानस्य मर्ताः॥१॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! हार न मानणाऱ्या, फलदायी, गोड बोलणाऱ्या, शक्तिशाली, स्तुतीस पात्र असलेल्या बृहस्पतिदेवांची, तेजस्वी स्तुतीस पात्र असलेल्या स्तोत्रांचे आपण श्रवण करावे ॥१॥

तमृत्विया उप वाचः सचन्ते सर्गो न यो देवयतामसर्जि ।
बृहस्पतिः स ह्यञ्जो वरांसि विभ्वाभवत्समृते मातरिश्वा॥२ ॥

सृष्टीची निर्मिती करणारे, मानवाची निर्मिती करणारे, जल उत्पादक, फलदायी, यज्ञस्थळी अवतीर्ण होणाऱ्या मातरिश्वाबृहस्पतिदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्त्रोत्रांच्या पठणाने उपासना करतो ॥२ ॥

उपस्तुतिं नमस उद्यतिं च श्लोकं यंसत्सवितेव प्र बाहू ।
अस्य क्रत्वाहन्यो यो अस्ति मृगो न भीमो अरक्षसस्तुविष्मान्॥३॥

सूर्यदेवांच्या प्रकाश देणाऱ्या, सर्वत्र पसरणाऱ्या किरणांप्रमाणे बृहस्पतिदेव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा आणि हविष्यान्नाचा स्वीकार करतात. बृहस्पतिदेवांच्या विरोध नसलेल्या शक्तीमुळे सूर्यदेव दिवसा सिंहासारखे शक्तिशाली बनतात ॥३॥

अस्य श्लोको दिवीयते पृथिव्यामत्यो न यंसद्यक्षभृद्विचेताः ।
मृगाणां न हेतयो यन्ति चेमा बृहस्पतेरहिमायाँ अभि द्यून् ॥४ ॥
बृहस्पतिदेवांची कीर्ती आकाशलोक आणि पृथ्वीलोकांमध्ये सर्वत्र पसरलेली आहे. बृहस्पतिदेव शीघ्रगामी अश्वासारखे ज्ञान असलेल्या व्यक्तींचे पालन-पोषणकर्तेआणि सहाय्यकारी आहेत. बृहस्पतिदेवांची शस्त्रे कपटी आणि फसवणूक करणाऱ्या शत्रूंचा वध करतात ॥४ ॥

ये त्वा देवोस्रिकं मन्यमानाः पापा भद्रमुपजीवन्ति पज्राः ।
न दूढ्ये अनु ददासि वामं बृहस्पते चयस इत्पियारुम् ॥५ ॥
हे बृहस्पतिदेवा ! आपण, धनाचा गर्व करणाऱ्या पापी दुर्बुद्धिग्रस्तांना ऐश्वर्य देत नाही. आपल्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांवर आपण कृपा करावी ही विनंती ॥५ ॥

सुप्रैतुः सूयवसो न पन्था दुर्नियन्तुः परिप्रीतो न मित्रः ।
अनर्वाणो अभि ये चक्षते नोऽपीवृता अपोर्णुवन्तो अस्थुः ॥६ ॥
हे बृहस्पतिदेवा ! आपण सन्मार्गावर चालणाऱ्या आणि उत्तम संपत्तीने परिपूर्ण असलेल्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे श्रेष्ठ मार्गदर्शक आणि त्यांच्यासाठी दुष्टांवर नियंत्रण ठेवणाऱ्या मित्रांसारखे आहात . सरळमार्गी अज्ञानी यज्ञकर्त्या भक्तगणांना आपण ज्ञानाच्या मार्गावर नेता ॥६ ॥

सं यं स्तुभोऽवनयो न यन्ति समुद्रं न स्रवतो रोधचक्राः ।
स विद्वाँ उभयं चष्टे अन्तर्बृहस्पतिस्तर आपश्च गृध्रः ॥७ ॥

राजाकडे धाव घेणाऱ्या प्रजाजनांप्रमाणे अथवा किनारे मोडणाऱ्या नद्यांसारखे समुद्राजवळ जाणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तोत्रे बृहस्पतिदेवांकडे पोहोचत असतात. ज्ञानी बृहस्पतिदेव जलवृष्टि आणि जलधारा यांच्यावर नियंत्रण ठेवतात ॥७॥

एवा महस्तुविजातस्तुविष्मान्बृहस्पतिर्वृषभो धायि देवः ।
स नः स्तुतो वीरवद्धातु गोमद्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥८॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, अत्यंत प्रसिद्ध, शक्तिमान, महत्त्वपूर्ण आणि सुखदायक बृहस्पतिदेवांची प्रार्थना करतो. हे बृहस्पतिदेवा ! आमची स्तुती ऐकून आम्हाला धैर्यवान पुत्र-पौत्र आणि संपत्ती प्रदान करावे ही विनंती. हे बृहस्पतिदेवा! आम्हाला अन्न, शक्ती व दीर्घायुष्य प्राप्त होवो ही विनंती ॥८॥

ऋग्वेद संहिता

।। अथ प्रथमं मण्डलम् ।।

सूक्त१९१

ऋषी -अगस्त्य मैत्रा वरुणी **देवता**– अप्, तृण, सूर्य

छंद-अनुष्टुप् १०-१२ महापंक्ती१३ महाबृहती

कङ्कतो न कङ्कतोऽथो सतीनकङ्कतः ।
द्वाविति प्लुषी इति न्यदृष्टा अलिप्सत॥१॥

काही विषारी, काही विषरहित आणि काही जलचर जीव, कमी विषारी असतात, जे दृश्यही असतात आणि अदृश्यही ! ते दोघेही शरीरात दाह निर्माण करतात. त्यांचे विष आमच्यामध्ये भिनते ॥१॥

अदृष्टान्हन्त्यायत्यथो हन्ति परायती ।
अथो अवघ्नती हन्त्यथो पिनष्टि पिंषती॥२॥

विषारी प्राण्यांनी डसलेल्या व्यक्तीवर हे कुस्करून आणि कुटून तयार केलेले हे औषध विषाच्या परिणामांना निष्क्रिय करते ॥२॥

शरासः कुशरासो दर्भासः सैर्या उत ।
मौञ्जा अदृष्टा वैरिणाः सर्वे साकं न्यलिप्सत॥३॥

या विषारी प्राण्यांपैकी सरपटणारे काही गवतामध्ये, काही सरपटणारे नद्या आणि तलावांच्या काठावर वाढणाऱ्या गवतामध्ये लपतात. काही विषारी प्राणी मुंज आणि कुल गवतामध्ये लपून आपल्याला दंश करतात ॥३॥

('मुंज' नावाच्या दर्भाच्या गवताची दोरी बटुला बांधत, कुल गवत हे एक विशिष्ट प्रकारचे गवत असून ते टोपल्या बनवण्यासाठी वापरले जाते.)

नि गावो गोष्ठे असदन्नि मृगासो अविक्षत ।

नि केतवो जनानां न्यदृष्टा अलिप्सत ॥४॥

जेव्हा गायी गोठ्यांमध्ये, इतर प्राणी त्यांच्या निवासस्थानी आणि थकलेले मनुष्य विश्रांती घेतात तेव्हा अदृश्य विषारी प्राणी बाहेर पडतात आणि दंश करतात ॥४॥

एत उ त्ये प्रत्यदृश्रन्प्रदोषं तस्करा इव ।

अदृष्टा विश्वदृष्टाः प्रतिबुद्धा अभूतन ॥५॥

रात्रीच्या वेळी हे अदृश्य विषाणु चोरांसारखे फिरू लागतात, त्यांचा परिणाम आपल्यावर दृश्यमान होतो म्हणून हे मनुष्या त्यांच्यापासून सावध रहा ॥५॥

द्यौर्वः पिता पृथिवी माता सोमो भ्रातादितिः स्वसा ।

अदृष्टा विश्वदृष्टास्तिष्ठतेलयता सु कम्॥६॥

हे विषाणूंनो ! आकाश तुमचा पिता आहे, पृथ्वी तुमची माता आहे, सोम तुमचा भाऊ आहे आणि अदिती तुमची बहीण आहे, म्हणून तुम्ही अदृश्य असला तरी, तुम्ही सर्वांना पाहू शकता. तुम्ही कोणालाही इजा न करता आनंदाने वावरा. ॥६॥

ये अंस्या ये अङ्ग्याः सूचीका ये प्रकङ्कताः ।

अदृष्टाः किं चनेह वः सर्वे साकं नि जस्यत॥७ ॥

सरपटणाऱ्या सर्पांप्रमाणे, पायांवर चालणाऱ्या शतपाद असलेले, विंचवाच्या सुयांसारखे डसणारे, अदृश्य आणि विषारी, ह्या सर्व विषारी प्राण्यांनी एकत्रित होऊन आम्हाला हानी पोहोचवू नये ॥७॥

उत्पुरस्तात्सूर्य एति विश्वदृष्टो अदृष्टहा।
अदृष्टान्त्सर्वाञ्जम्भयन्त्सर्वाश्च यातुधान्यः ॥८॥

संपूर्ण विश्वाला पाहणारे, अदृश्य विषारी प्राण्यांचा नाश करणारे सूर्यदेव पूर्वेला उगवतात. सूर्यदेव अदृश्य, विषारी विषाणूंना आणि सर्व प्रकारच्या दुष्ट राक्षसांना हाकलून लावतात ॥८॥

उदपप्तदसौ सूर्यः पुरु विश्वानि जूर्वन्।
आदित्यः पर्वतेभ्यो विश्वदृष्टो अदृष्टहा॥९॥

संपूर्ण विश्व पाहणारे आणि अदृश्य विषारी प्राण्यांचा नाश करणारे सूर्यदेव उगवत असताना सर्व हानिकारक (विषारी) प्राणी दुर्बळ होऊन लपून जातात ॥९॥

सूर्ये विषमा सजामि दृतिं सुरावतो गृहे।
सो चिन्नु न मराति नो वयं मरामारे अस्य योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार ॥१०॥

ज्याप्रमाणे कलाल (दारू बनवणारा) चामड्याच्या भांड्यात दारू ओततो त्याप्रमाणे आम्ही सूर्यदेवांकडे विष फेकतो. या विषामुळे सूर्यदेव मरत नाहीत, आम्हीही मरणार नाही. अश्वारूढ सूर्यदेव या विषाचा नाश करतील किंवा त्यांना अवगत असलेल्या मधु विद्येच्या सहाय्याने विषाला मधुर करतील ॥१०॥

इयत्तिका शकुन्तिका सका जघास ते विषम् ।
सो चिन्नु न मराति नो वयं मरामारे अस्य योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार ॥११॥

कपिंजली नावाच्या पक्षिणीने विष पचवले आणि ती मेली नाही त्याचप्रमाणे या विषाने आम्हीही मरणार नाही. अश्वारूढ सूर्यदेव या विषाचा नाश करतील किंवा त्यांना अवगत असलेल्या मधु विद्येच्या सहाय्याने विषाला मधुर करतील ॥११॥

त्रिः सप्त विष्पुलिङ्गका विषस्य पुष्यमक्षन् ।
ताश्चिन्नु न मरन्ति नो वयं मरामारे अस्य योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार ॥१२॥

एकवीस पक्ष्यांनी हे विष पचविले आहे आणि ते मेले नाहीत. त्याचप्रमाणे या विषाने आम्हीही मरणार नाही. अश्वारूढ सूर्यदेव या विषाचा नाश करतील किंवा त्यांना अवगत असलेल्या मधु विद्येच्या सहाय्याने विषाला मधुर करतील ॥१२॥

नवानां नवतीनां विषस्य रोपुषीणाम् ।
सर्वासामग्रभं नामारे अस्य योजनं हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार॥१३॥

विषांवर प्रतिरोधक म्हणून नव्वण्णव प्रकारची औषधे आपणा सर्वांना माहिती आहेत. त्यांच्या वापराने सर्व प्रकारच्या विषबाधा बऱ्या होऊ शकतात . अश्वारूढ सूर्यदेव या विषाचा नाश करतील किंवा त्यांना अवगत असलेल्या मधु विद्येच्या सहाय्याने विषाला मधुर करतील॥१३॥

त्रिः सप्त मयूर्यः सप्त स्वसारो अग्रुवः ।

तास्ते विषं वि जभ्रिर उदकं कुम्भिनीरिव ॥१४॥

हे विषग्रस्ता ! घागरीत पाणी वाहून नेणाऱ्या स्त्रियांप्रमाणे, एकवीस मोर आणि सात नद्या तुमच्यातील विष काढून टाकतील ॥१४॥

इयत्तकः कुषुम्भकस्तकं भिनद्म्यश्मना ।

ततो विषं प्र वावृते पराचीरनु संवतः ॥१५॥

हे विषग्रस्ता ! लहान नकुलाने (मुंगुसाने) विषबाधा शोषून घेतल्यानंतर त्याला दगडाने मी मारून टाकीन. त्याचे विष सर्व दिशांना पसरेल ॥१५॥

कुषुम्भकस्तदब्रवीद्गिरेः प्रवर्तमानकः ।

वृश्चिकस्यारसं विषमरसं वृश्चिक ते विषम् ॥१६ ॥

डोंगरावरून येणारा मुंगूस म्हणाला, "मला डसलेल्या विंचवाचे विष निरुपयोगी आहे. हे विंचवा, तुझे विष निरुपयोगी आहे."॥१६ ॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.
प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे नववे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६०पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), डॉ. अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१३), **डॉ. वृषाली जोशी (६०)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१३), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२),

आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (३०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (९), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (८), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (७), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (४) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(४), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे(३), सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(३), स्वाती वर्तक(२), भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), कैलास बडगुजर, प्रा श्रीपाद काळे(६), चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(२), श्रेणिक सरडे (६) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’ई’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)